**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**राखून ठेवलेला ता.प्र.क्र.7032 बाबत**

**सभापती :** मी सदनाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सोमवार, दिनांक 20 जुलै, 2015 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेल्या श्री.शरद रणपिसे व इतर वि.प.स.यांच्या "धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्नाबाबत मुख्यमंत्री महोदयांकडून आपण उत्तराची अपेक्षा ठेवली आहे. तथापि, मुख्यमंत्री महोदयांकडून असा निरोप आला आहे की, थोड्या वेळात ते सभागृहात पोहोचत आहेत. त्यामुळे हा प्रश्न आपण थोडावेळ बाजूला ठेऊ आणि नियमित तारांकित प्रश्नांवर चर्चा सुरु करु

--------------

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:**तोंडी उत्तरे

**मुंबई शहरातील विविध भागातील बी.डी.डी चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(1) *७७९१ श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.जयंत पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील विविध भागातील बी.डी.डी चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्याकरिता गृहनिर्माण विभागातर्फे आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास कोणामार्फत करण्यात येणार आहे, तसेच या योजनेंतर्गत किती चौरस फुटाच्या सदनिका देण्यात येणार आहेत,
(3) तसेच, बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(4) उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.
(2), (3) व (४) मुंबई शहरातील कामगार वर्गासाठी वरळी, ना.म.जोशी मार्ग, नायगाव व शिवडी या ठिकाणी सन १९२१ ते १९२५ या कालावधीत बांधण्यात आलेल्या २०७ मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळीचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (9) मधील तरतूदीनुसार करण्यांत येणार आहे. त्याअनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, बी.डी.डी.चाळीचा प्रश्न सातत्याने या सभागृहात उपस्थित करण्यात येत आहे व त्यावर त्या त्या वेळी शासनातर्फे उत्तर देण्यात आले असले तरी त्याप्रमाणे कृती मात्र केलेली नाही. बी.डी.डी.चाळींच्या बांधकामांना 90 ते 95 वर्षांचा कालावधी झाला आहे. हे बांधकाम एवढी वर्षे टिकले आहे, याबाबतचे क्रेडिट ब्रिटिशांना दिले पाहिजे. सध्या ज्याप्रमाणे इमारतींची बांधकामे होत आहेत, त्यानुसार साधारणपणे 30 ते 35 वर्षात या

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791.......

श्री.किरण पावसकर........

इमारतींची पुर्नबांधणी करावी लागते. मला हे सांगावयाचे आहे की, शासनाने या चाळीतील रहिवाशांचा अंत पाहू नये. या चाळीत साधारणपणे 10 ते 17 हजार कुटुंबे रहात आहेत. शासनाने या तारांकित प्रश्नाला उत्तर देत असताना हा प्रस्ताव विचाराधीन आहे, असे म्हटले आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी मी काही माहिती सभागृहाला देऊ इच्छितो. सन 2007 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी बी.डी.डी.चाळीचा विकास क्लस्टर योजनेअंतर्गत करण्यासंबंधीचा अध्यादेश जारी केला होता. सन 2007 मध्ये पुनर्विकासाला मान्यता मिळाली. त्यानंतर सन 2014 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम 33 (9) अंतर्गत 4 एफ.एस.आय.देऊन हा विकास करण्यासंबंधीचा अध्यादेश जारी केला.

सभापती महोदय, आता बी.डी.डी.चाळ रहिवासी संघटनेची अशी मागणी आहे की, त्यांना 567 चौ.फु.ची सदनिका मिळावी आणि म्हाडाकडून विकास न करता तो खाजगी विकासकांमार्फत करावा. याचा अर्थ असा आहे की, शासनाच्या म्हाडा प्राधिकरणावर त्यांचा विश्वास नाही.

सभापती महोदय, राज्याचे माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी बी.डी.डी.चाळीच्या भाडेकरु संघटनेच्या शिष्टमंडळा बरोबर दिनांक 4 जून, 2015 रोजी बैठक घेतली होती आणि या बैठकीमध्ये शिष्टमंडळाने सविस्तर मागण्या केल्या आहेत. त्यांची मागणी अशी होती की, तेथील रहिवाशांना 267 चौ.फु.च्या सदनिका मिळाव्यात. किमान क्षेत्रफळ 27.88 चौ.फु.म्हणजे 300 चौ.फु.चे घर मिळावे. क्षेत्रफळ 10 हेक्टरपेक्षा जास्त असल्यामुळे 30 टक्के म्हणजे ते 90 चौ.फु.जास्त मिळते आणि सप्टेंबर, 2014 ते 3 वर्षाच्या कालावधीत प्रकल्पास मंजुरी मिळाल्यास 10 टक्के म्हणजे ते पुन्हा 30 चौ.फु.मिळत आहे आणि फंजीबल 35 टक्के पकडले तर 547 म्हणजे 567 चौ.फु.चे घर मिळावे, हे त्यामागील लॉजीक आहे. शासनानेच 4 एफएसआयचा अध्यादेश काढला असून त्याप्रमाणे हे कॅलक्युलेशन केलेले आहे. परंतु, भाडेकरुंची मागणी जास्त क्षेत्रफळाची आहे, अतिरिक्त आहे, त्यामुळे ती मान्य करता येणार नाही, असे होणार नाही.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791.......

श्री.किरण पावसकर........

सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, बी.डी.डी.चाळ विकास प्रकल्प पूर्ण करु, असे शासनाचे म्हणणे आहे. या विकासाला किती कालावधी लागणार आहे, भाडेकरु संघाने सांगितल्याप्रमाणे म्हाडातर्फे विकास न करता खाजगी विकासकांमार्फत तो करणार आहात का ?

सभापती महोदय, या प्रस्तावावर सन 2007 मध्ये विचार सुरु झाला असून आता आपण सन 2015 मध्ये आहोत. त्यामुळे हा विकास पूर्णत्वास नेण्यास नक्की किती कालावधी लागणार आहे ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सन 2007 मध्ये प्रथमत: हा प्रस्ताव तत्कालीन मंत्रिमंडळासमोर आला होता व त्यावेळपासून तो विचाराधीन आहे. त्यानंतर तत्कालीन उप मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 22/10/2007 रोजी एक बैठक झाली व त्यामध्ये बी.डी.डी.चाळ रहिवासी संघ आणि बी.डी.डी.चाळ हक्क संरक्षण समिती यांनी आपापले प्रस्ताव शासनासमोर मांडले. त्यानंतर तत्कालीन प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती उप मुख्यमंत्री महोदयांनी गठीत केली. सन 2005 मध्ये प्राधिकरणाच्या अध्यक्षतेखाली एक तांत्रिक समिती नियुक्त करण्यात आली आणि या समितीने सन 2005 मध्ये शासनाला आपला अहवाल सादर केला. या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम, महसूल, नगर विकास, नियोजन आणि वित्त या विभागांचे अभिप्राय घेण्यात आले व ते सन 2007 मध्ये मंत्रिमंडळाला सादर करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सन 2008 मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली. (अडथळा.....)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तपशिलवार प्रश्न विचारला असून त्यांना तारीखवार माहिती देणे आवश्यक आहे. या प्रश्नाची व्यापकता फार मोठी आहे. त्यांनी तपशिलवार माहिती विचारली म्हणून मी तारीखवार माहिती देत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, दिनांक 14/08/2008 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत काही शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या होत्या व त्यास सन 2009 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री

...5....



ता.प्र.क्र.7791.......

श्री.प्रकाश महेता........

महोदयांनी मान्यता दिली होती. म्हाडातर्फेच हा विकास प्रकल्प राबविण्यात यावा, यास तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती. त्यानंतर सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया, नवीन मंत्रिमंडळाचे गठण व अनुषंगिक बाबींमुळे हा प्रस्ताव सन 2009 मध्ये मंत्रिमंडळापुढे येऊ शकला नाही. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची बैठक दिनांक 23/05/2011 रोजी झाली. गृहनिर्माण विभागाने सप्टेंबर, 2011 मध्ये मंत्रिमंडळाच्या मान्यतेने नव्याने प्रस्ताव सादर केला. तथापि, दिनांक 21/06/2012 रोजी मंत्रालय इमारतीला लागलेल्या आगीत या संदर्भातील फाईल व कागदपत्रे नष्ट झाली. सन 1999 पासून या प्रस्तावाबाबतची प्रक्रिया सुरु झाली आणि सन 2012 मध्ये लागलेल्या आगीत या प्रस्तावासंबंधीची कागदपत्रे नष्ट झाली. त्यानंतर उपलब्ध कागदपत्रानुसार पुन्हा हा प्रस्ताव जीवित करण्यात आला. या पूर्वीच्या आणि आताच्या सरकारच्या धोरणानुसार या विकास प्रकल्पासंबंधी म्हाडा हीच नोडल एजन्सी राहणार आहे, हे स्पष्ट आहे.

सभापती महोदय, हा प्रकल्प कशा प्रकारे कार्यान्वित करावा, या संबंधी सर्वांची मते जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री महोदय स्वत: दिनांक 7 मे, 2015 रोजी म्हाडा कार्यालयात आले होते. त्यावेळी या विभागाचे आमदार, खासदार, गृहनिर्माण राज्यमंत्री महोदय आणि मी स्वत: उपस्थित होतो. या बैठकीत आतापर्यंत या प्रस्तावावर कशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली, याबाबतचा आढावा घेण्यात आला.

सभापती महोदय, आता बी.डी.डी.चाळ विकास प्रकल्पाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. 90 दिवसांच्या आत बी.डी.डी.चाळ विकास प्रकल्पाचे कार्य सुरु करण्याच्या दिशेने सरकारची वाटचाल सुरु आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किमान 6 वर्षांचा कालावधी लागणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, गृहनिर्माण मंत्री महोदयांनी सन 2007 पासूनचा या प्रकल्पासंबंधीचा पूर्ण पाढा या ठिकाणी वाचला आणि तो खराही आहे. हे सर्व सांगत असताना 90 दिवसांच्या आत या प्रकल्पाचे काम सुरु करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले आहे. मला माफ

...6....



ता.प्र.क्र.7791.......

श्री.भाई जगताप........

करा. पण आमचा यावर विश्वास नाही. त्याचे कारणही आपण समजून घ्यावे. मंत्री महोदयांनी या प्रकल्पासंदर्भात एक बैठक आयोजित केली होती. मी विधानसभेचा सदस्य असताना आणि आता विधानपरिषदेचा सदस्य असताना या विषयावर सभागृहात झालेल्या चर्चेत माझी मते मांडली होती. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनीही आता आपली मते मांडली आहेत. हा विषय विरोधी सदस्यांचा आहे किंवा सत्तारुढ सदस्यांचा आहे, असे नाही तर तो बी.डी.डी.चाळीचा आहे. परंतु, आम्हाला या बैठकीला बोलाविण्यात आले नाही. हा त्या आक्षेपाचा मुद्दाही नाही.

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791........

श्री.भाई जगताप........

आक्षेपाचा मुद्दा असा आहे की, या इमारतींना जवळपास 95 ते 97 वर्षे झालेली आहेत. आता त्या ठिकाणी एखादा खिळा जरी ठोकला तरी ते कोसळते. रिपेअरिंगसाठी येणारा फंड वापरला जात नाही, तो फंड परत गेलेला आहे. आपण याबाबत विभागाकडे विचारणा करावी. आता आमदारांनी पुन्हा फंड मागितला आहे, अशी माझी माहिती आहे आणि ती माहिती खरी आहे. आपण सन 2009 मध्ये पॉलिसी निर्णय घेतला की, या चाळींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने म्हाडा एजन्सी असावी. कारण, त्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर बोंबाबोंब झाली होती की, तुम्ही खाजगी विकासकांना देत आहात वगैरे. आता सरकारच्या अखत्यारित आल्यानंतर आपण सांगत आहात की, 90 दिवसात हे सर्व होणार आहे. आपण 6 वर्षाचा कालावधी सांगत आहात. त्या इमारतींची अवस्था वाईट आहे. दुर्दैवाने एखादी इमारत पडली आणि मनुष्य हानी झाली तर आपण जागे होतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन हे 3 महिने आणि पुढील 6 वर्षापर्यंत या इमारती कशा काय राहतील आणि आपण तेथील नागरिकांना कशा प्रकारे सुरक्षिततेची हमी देणार आहोत ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आता पर्यंतचा सरकारी योजनांच्या संदर्भातील अनुभव लक्षात घेता, मग त्यामध्ये आपण सर्वच जबाबदार आहोत. मी कोणाकडे अंगुलिनिर्देश करणार नाही. तेथे 87 एकर जागा आहे आणि त्या जागेवर 204 इमारती आहेत. त्या ठिकाणी पोलीस लाईन आहे. त्याबाबत बरीच आंदोलने झालेली आहेत. त्यावेळी मुख्यमंत्री आणि मंत्री महोदयांनी देखील आग्रहाने सांगितले होते. मी तेथील पोलीस लाईनमध्ये राहिलो आहे. तेथे माझे बालपण गेले आहे. तेथे अनेक वर्षापासून राहणारे पोलीस, सरकारी कर्मचारी.......

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी भाषण करीत नाही, माझ्या भावना आहेत. मागील अनेक वर्षे आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना आणि आता विरोधी पक्षात असताना देखील मी माझ्या भावना यासाठी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, तेथील पोलीस महिला रस्त्यावर आल्या होत्या. त्यांनी अनेक वेळा मोर्चे काढले होते. आपण कित्येक वेळा त्याला सामोरे गेलो होतो. मुख्यमंत्री महोदय पॉलिसी निर्णय घेऊन पोलीस हाऊसिंगसाठी 4 एफएसआय मिळतो. माझा प्रश्न

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791........

श्री.भाई जगताप........

असा आहे की, एक तर आपण या कालावधीत हे कशा प्रकारे करणार आहात ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तेथे राहणारे जे सरकारी कर्मचारी आहेत त्यांना आपण कायम स्वरुपी घरे देणार आहात काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. 90 दिवसाचा कालावधी आहे. आम्ही काही लोकांबरोबर, संस्थांबरोबर चर्चा करुन पर्यावरण विभागाकडून मत मागविले आहे. त्यासाठी 90 दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला की, सरकारी कर्मचारी असो किंवा पोलीस वसाहतीमध्ये राहणारे लोक असोत, (...अडथळा...) आपण पुन्हा प्रश्न विचारा, काही अडचण नाही. सरकारी कर्मचारी असो किंवा त्या विभागात जे पोलीस राहतात त्यांना बीडीडीचे भाडेकरु समजून त्यांना शंभर टक्के न्याय दिला जाईल, त्यांना तेथे घर मिळणार आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन 2001 मध्ये ही योजना सुरु झाली. बीडीडी चाळीतील रहिवाशांचा हा 14 वर्षाचा वनवास आहे. मागील 14 वर्षात या योजनेला गती मिळाली नाही. मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी सांगितले की, आम्ही 3 महिन्यात योजना सादर करु आणि 6 वर्षात बांधकाम करु. मी मागील अधिवेशनात या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांनी बीडीडी चाळीला भेट दिली होती. त्यांनी बीडीडी चाळीची पाहणी केली आणि त्यावेळी या संदर्भात सादरीकरण देखील करण्यात आले होते. बीडीडी चाळीची दुरवस्था झालेली आहे. आज तेथील नागरिक आणि तेथे राहणारे पोलीस विभागाचे लोक प्रचंड तणावाखाली राहत आहेत. मागील 14 वर्षापासून ही योजना रखडली आहे. या संदर्भातील फाईल नव्हती, असे मंत्री महोदयांनी सांगितले. माझी विनंती आहे की, मंत्री महोदयांनी हा 14 वर्षाचा वनवास संपवून हे काम लवकरात लवकर करावे. तसेच मुंबई शहरात ज्याप्रमाणे बीडीडी चाळी आहेत त्याप्रमाणे बीआयटी चाळी देखील आहेत. त्या चाळी ब्रिटीशकालीन आहेत. त्या चाळींना देखील 100 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासन बीआयटी चाळींना देखील याचा लाभ देणार आहे काय ?

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791........

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, बीडीडी आणि बीआयटी चाळ देखील यामध्येच आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, या 3 महिन्याच्या कालावधीत एखादा अपघात झाला तर काय करावयाचे ? तेथील सर्वेक्षण झालेले आहे. तात्कालिक 3 महिन्यात काही होणार नाही यासंबंधी किंवा नवीन योजना सुरु होईपर्यंत रिपेअरिंगसाठी जो काही खर्च करण्याची आवश्यकता असेल तेथे रिपेअरिंग करण्याची शासनाची तयारी आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम 33 (9) मधील तरतुदीनुसार सदर चाळीचा विकास करण्यात येणार आहे. सदर तरतुदीन्वये बीडीडी चाळीतील सध्याचे आकारमान पाहता जास्तीत जास्त 300 चौ.फुट अधिक फंजिबल अशी 400 चौ.फुटाची सदनिका मिळू शकेल. तेथील रहिवाशी अनेक वर्षापासून 160 चौ.फुटाच्या सदनिकेत राहतात. त्यांच्या वंशपरत्वे एका कुटुंबाची अनेक कुटुंबे झाली आहेत. अशा परिस्थितीत तेथील रहिवाशांची 450 ते 500 चौ.फुट अधिक फंजिबल अशी रास्त मागणी आहे.शासन या संदर्भात स्थानिकांबरोबर सल्लामसलत करून धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, जी 90 दिवसांची वेळ मागितली आहे त्या वेळेत अनेक लोकांबरोबर चर्चा करणे आणि 90 दिवसाच्या आत ज्या सन्माननीय सदस्यांना, म्हणजे या अगोदर संबंधित आमदार, खासदारांबरोबर बैठक झालेलीच आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप बीडीडी चाळीमध्ये राहत होते. त्यानंतर ते घाटकोपर येथे राहत होते. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप लहानपणापासून अनेक ठिकाणी राहिले आहेत. त्यांचे बालपण बीडीडी चाळीत गेले आणि ते युवाकाळात घाटकोपर येथे राहत होते. त्यानंतर ते तिसऱ्या ठिकाणी राहावयास गेले. आम्ही एकत्र शिक्षण घेतले आहे. मी सांगू इच्छितो की, संबंधित संस्था आणि संबंधित लोकांची मुख्यमंत्री महोदयांबरोबर संयुक्त बैठक घेऊन आताच्या परिस्थितीत आपण ज्यावेळी एकत्र विकास करतो त्यामध्ये किती स्क्वेअर फुटाचे घर, किती बांधकाम आणि त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या,



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791........

श्री.प्रकाश महेता..........

मग केंद्र शासनाच्या परवानग्या वगैरे हे सर्व तपासून आपण अंतिम किती फुटाचे घर देता येईल, हे निश्चित करणार आहोत आणि ते निश्चित करीत असताना बीडीडी, बीआयटी, धारावी असे एकत्रित निश्चित करावयाचे आहे. कारण, विषय असा आहे की, मागील शासन सत्तेवर असताना लोकांनी 160 स्क्वेअर फुटाऐवजी 225 स्क्वेअर फुटाचे घर देण्याची मागणी केली. त्यावेळी शासन 225 स्क्वेअर फुटाचे घर देण्यास तयार होऊ शकले नाही. परंतु, ज्यावेळी शासन 225 स्क्वेअर फुटाचे घर देण्यास तयार झाले त्यावेळी लोकांनी 300 स्क्वेअर फुटाच्या घराची मागणी केली. ज्यावेळी शासन 300 स्क्वेअर फुटाचे घर देण्यास तयार झाले त्यावेळी लोकांनी 400 स्क्वेअर फुटाच्या घराची मागणी केली. म्हणून जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने त्या कुटुंबांचा समावेश होईल या पद्धतीने शासन प्रयन करील.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न सुरु होऊन आता 19 मिनिटे झालेली आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराला माझी हरकत आहे. आपण धारावीसाठी वेगळे प्राधिकरण केले आहे. आपण जर यामध्ये धारावीचा समावेश केला तर बीडीडी चाळीची डेव्हलपमेंट होणारच नाही, ही वस्तुस्थिती आहे आणि याची आपल्याला देखील माहिती आहे. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत.....

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप मी आपल्याला एक मिनिट थांबवितो. मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. आपल्याला अनुक्रमानुसार धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत राखून ठेवण्यात आलेला प्रश्न चर्चेला घ्यावयाचा आहे. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न सुरु होऊन आता जवळपास 19 मिनिटे झालेली आहेत. गृहनिर्माण मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले की, आपण मुख्यमंत्री महोदयांबरोबर बैठक घेणार आहोत. आपण 15 दिवसात ही बैठक घ्यावी. आपल्या ज्या काही हरकती असतील त्या आपण तेथे सविस्तरपणे मांडाव्यात. मी 10-15 वर्षापासून बीडीडी चाळी संदर्भात ऐकलेले आहे. मी स्वः बीडीडी चाळी बघितलेल्या आहेत.

यानंतर श्री.खर्चे वि.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791...

**सभापती....**

याबाबत सरकारने डिसेंबरच्या अधिवेशनापर्यंत सर्वंकष पॉलिसी तयार करावी, असे केले तर हे अत्यंत चांगले उत्तर ठरेल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, म्हाडाच्या अंतर्गत ही जमीन आहे. तेथील इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. या इमारतीची देखभाल दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. याबाबत माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांच्यासोबत आमची बैठक झाली आहे. त्यासाठी 80 कोटी रूपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या इमारतीचा पुनर्विकास करण्याचा विचार आता करण्यात येत आहे. या दोन्ही बाबींची सांगड घालण्यासाठी शासनाकडे प्रॉपर मास्टर प्लॅन आहे काय ? तसे नसेल तर 80 कोटी रूपये पाण्यात जातील. जी इमारत आज दुरूस्त केली तिला उद्या डिमॉलिश करावी लागेल. यासंदर्भातील संपूर्ण मास्टर प्लॅन शासनाकडे तयार आहे काय ? या इमातीचे बांधकाम करण्यासाठी सहा वर्षाचा कालावधी लागेल असे आपण सांगितले आहे, आता जगात नवीन टेक्नॉलॉजी उपलब्ध आहे. सिंगापूर येथे एका वर्षात 25 हजार घरांची निर्मिती केली जाते. बांधकामाचा कालावधी कमी करण्यासाठी राज्य शासन योग्य ती पावले उचलणार आहे काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 80 कोटी रूपये पाण्यात जाणार नाहीत. लोक देखील पाण्यात जाणार नाहीत, याची सांगड घालून योग्य ते काय करता येईल ते करण्यात येईल. (अडथळा....)

**सभापती** : आपण असे करु या की, राखून ठेवलेला प्रश्न चर्चेला घेऊन माननीय मुख्यमंत्री महोदयांना मोकळे करून देऊ. त्यानंतर प्रश्न क्रमांक 1 व 3 परत घेऊ.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात इमारतीचे बांधकाम करण्यासाठी 6 वर्षाचा कालावधी लागेल असे सांगण्यात आले आहे. नवीन टेक्नॉलॉजीचे सादरीकरण शासनाने पाहिले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितल्याप्रमाणे हा कोणत्याही पक्षाचा प्रश्न नाही. विरोधी पक्षात असताना व सत्ताधारी पक्षात असताना यासाठी काय केले असा प्रश्न नाही. मुंबईच्या बीडीडी व

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7791...

श्री.प्रकाश महेता....

बीआयटी चाळीचा महत्वाचा प्रश्न आहे. आपण सर्वांनी एकत्र मिळून हा प्रश्न सोडविण्याची इच्छाशक्ती दाखविली तर जो प्रोजेक्ट सहा वर्षात होणार आहे तो चार वर्षात देखील होऊ शकतो. लोकांना समजविण्यासाठी आपल्याकडून संपूर्ण सहकार्याची अपेक्षा आहे. कमीत कमी कालावधीत म्हणजे सहा वर्षाचे काम चार वर्षात कसे करता येईल याचा शासन निश्चित विचार करणार आहे.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक (3) 7781 या विषयाच्या संदर्भात आहे तेव्हा यावर सविस्तर चर्चा करण्यात येईल.

-------------

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दिनांक 20 जुलै 2015 रोजी उत्तरासाठी ठेवलेल्या तारांकित प्रश्नाच्या यादीतील राखून ठेवलेला विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक 7032**

**"धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत"**

**विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक 7032**

**श्री.शरद रणपिसे,, श्री.संजय दत्त, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.रामहरी रुपनवार, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.स.स, तारांकित प्रश्न क्रमांक 2667 ला दिनांक 20 मार्च, 2015 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(2) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व या संदर्भात कोणत्या स्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे ?

**श्री.विष्णू सवरा** (1) नाही,

(2) प्रश्न उद्‌भवत नाही,

(3) धनगर जातीचा मे,1990 पूर्वी इतर मागासवर्गीयांच्या यादीत समावेश होता, मे, 1990 पासून भटक्या जमाती 'क' मध्ये धनगर जातीचा तिच्या उप/तत्सम जातीसह समावेश करुन 3.5 % इतके आरक्षणाचा लाभ शासकीय नोकरी, शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश यासाठी अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच या जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतिगृहाच्या सवलती इ.लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

धनगर समाजाला अनूसूचित जमातीच्या यादीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत महाअधिवक्ता यांचे अभिप्राय विधी व न्याय विभागामार्फत प्राप्त झालेले आहेत, त्यानुषंगाने, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले असून ते प्राप्त झाल्यावर प्रचलित कार्यपध्दतीनुसार त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, विरोधी पक्ष हा प्रश्न राजकीय करु इच्छित नाही. या राज्याचे व देशाचे नेते आदरणीय श्री.शरद पवार यांना केंद्रीय आदिवासी मंत्री महोदयांनी पत्र



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032...

श्री.शरद रणपिसे...

लिहिले आहे. त्या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही मागविला आहे, परंतु राज्य सरकारने तो आमच्याकडे पाठविला नाही. त्या दिवशी मी सभागृहात असा उप प्रश्न विचारला होता की, ॲडव्होकेट जनरल यांनी केरळच्या एका संस्थेचा हवाला दिला होता. कोर्टाच्या निर्णयाबाबत शिफारस करुन आदिवासी विकास विभागामार्फत केंद्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडे पाठवावी. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले होते की, या अगोदर चर्चा झाली त्यावेळी आदिवासी मंत्री महोदयांनी आदिवासींप्रमाणे धनगर समाजाला आरक्षण मिळणार नाही अशी भूमिका स्पष्टपणे मांडली होती. माननीय मुख्यमंत्री महोदय आम्ही अजिबात राजकारण करीत नाही. 'पण बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' आपण असा शब्द दिला होता की, 15 दिवसात याबाबत मी निर्णय घेतो. आपण कदाचित 15 दिवस बोलला नसाल, याबाबत मी निर्णय घेतो, माझे शासन कटिबध्द आहे, असे आपण सांगितले होते. धनगर आरक्षणाचा प्रश्न केंव्हा मार्गी लागणार आहे. ही शिफारस केंद्र शासनाकडे केंव्हा पाठविण्यात येणार आहे. या आरक्षणाची पूर्तता कोणत्या कायद्याने व कशी करण्यात येणार आहे. या प्रश्नांची उत्तरे सभागृहाला मिळाली पाहिजेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सर्वात पहिल्यांदा मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचे आभार मानतो, त्याचे कारण असे आहे की, त्यांनी असे सांगितले की, या प्रश्नाचे आम्हाला राजकारण करावयाचे नाही. या प्रश्नाबाबत राज्य सरकारची भूमिका काय आहे ती मी सांगतो. राज्य सरकारची अधिकृत भूमिका अशी आहे की, आदिवासी समाजाचे आरक्षण कमी न करता धनगर समाजाला एस.टी.चे आरक्षण देण्यास राज्य सरकार अनुकूल आहे, राज्य सरकारच्या या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. (अडथळा...) माझ्याकडे आदिवासी मंत्री महोदयांचे उत्तर आहे ते मी पूर्ण वाचले आहे. त्यांनी असे कोठेही म्हटलेले नाही. हा निर्णय घेण्याचे आम्ही जेव्हा ठरविले त्यावेळी मराठा आरक्षणाच्या संदर्भात उच्च न्यायालयातून त्या विरोधात निकाल आला. धनगर समाजाच्या नेत्यांसोबत बैठक झाली त्यावेळी आम्ही असा निर्णय घेतला की, यासंदर्भात जी कार्यवाही करावयाची आहे ती नीट अभ्यास करुन पूर्णपणे कायद्यात बसवून केली पाहिजे. यासाठी ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्यात आले आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032...

श्री.देवेंद्र फडणवीस..

सांगितले आहे की, राज्य सरकारने ही शिफारस करावी पण त्याकरिता राज्य सरकारने एक अभ्यास करुन घ्यावा. हे सांगण्याचे कारण असे होते की, मुळात मागणी अशी आहे की, धनगर समाजाला वेगळे आरक्षण देण्याची आवश्यकता नाही. धनगर समाजाचा समावेश क्रमांक 36 वर ऑलरेडी आहे. क्रमांक 36 वरील 'धनगर' किंवा 'धनगड' हे एकच आहेत, ओरॉन किंवा धनगड याची उपजात धनगर असल्यामुळे आदिवासी मंत्री महोदयांनी या संदर्भातील प्रोसिजर सांगितली आहे. यामध्ये दोन भाग आहेत, काही लोकांचे म्हणणे असे आहे की, धनगर समाजाचा नव्याने समावेश करा. तसा समावेश करावयाचा असेल तर आदिवासी विकास मंत्री महोदयांनी सांगितलेली पूर्ण प्रोसिजर नव्याने करावी लागणार आहे. घटनेप्रमाणे ती प्रोसिजर कशी आहे ती त्यांनी सभागृहाला सांगितली आहे. दुसरे असे आहे की, 'धनगर' आणि 'धनगड' हे एकच आहेत, अशी भूमिका मांडली जात आहे. याबाबत शिफारस केली पाहिजे अशी मागणी साधारणपणे सर्वांची आहे. या संदर्भातील स्वतंत्र अभ्यास केंद्र शासनाकडे पाठवावा लागेल. राज्य सरकारचे नुसते एक पत्र 'धनगर' आणि 'धनगड' हे एकच आहेत असे पाठवून हे होणार नाही. मागच्या काळात अशाच प्रकारचा प्रसंग निर्माण झाला असता माननीय सभापती यांच्याकडे एक बैठक झाली होती. त्या बैठकीत असा निर्णय झाला की, 'धनगर' आणि 'धनगड' एकच असल्यामुळे राज्य सरकारने या संदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावा. तो प्रस्ताव पाठविण्याच्या दृष्टीने सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात दिनांक 12/07/2005 रोजी एक बैठक झाली होती. या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत धनगर जातीचा समावेश का करता येत नाही, याबाबत बिहार, ओरिसा व झारखंड या राज्यांनी त्यांच्या राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत धनगर जातीचा कोणत्या निकषाच्या आधारे समावेश केला आहे. याबाबतची राज्यनिहाय सविस्तर माहिती व त्याबाबतचा अहवाल तसेच बिहार, ओरिसा व झारखंड राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश केलेल्या धनगर जातीचा कोणत्या निकषाच्या आधारे समावेश केला हे पाहण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संशोधक पथक एप्रिल, 2006 मध्ये पाठविण्यात आले होते. त्याचा निकष असा होता की, 'धनगर' आणि 'धनगड' हे एकच आहेत आणि त्या ओरॉनच्या उपजाती आहेत, अशा प्रकारच्या आधारावर त्यांना सर्वेक्षण करण्यास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032...

श्री.देवेंद्र फडणवीस..

सांगितले होते. त्यानुसार या पथकाने सर्वेक्षण अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, ओरॉन, धनगर व धनगड यांच्या चालीरीती रुढी, परंपरा, देवदेवता व पारंपारिक व्यवसाय भिन्न नसून एकच आहेत, मात्र महाराष्ट्र राज्यातील धनगर जातीच्या चालीरीती, रुढी पंरपरा, देवदेवता व पारंपारिक व्यवसाय हा धनगड जमातीपेक्षा भिन्न असून या दोन्ही जमाती एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. असा अहवाल त्यांनी ऑलरेडी दिलेला आहे. आता नवीन अहवाल शिफारशीसोबत पाठविला जाणार आहे. जुना अहवाल ऑलरेडी केंद्र शासनाकडे पाठवून आपली केस कमकुवत करुन ठेवली आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032......

श्री.देवेंद्र फडणवीस....

आपण ऑलरेडी धनगर व धनगड़ हे एक नाहीत, या संदर्भात माननीय ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतल्यानंतर त्यांनी हेच सांगितले की, याच्या पुष्ठयर्थ तुम्हाला पुरावे द्यावे लागतील, त्याचे संशोधन द्यावे लागेल, त्या शिवाय धनगर व धनगड़ हे एक आहेत हे इस्टॅब्लिश होणार नाही. म्हणून त्या बाबत आपण पुन्हा पुरावे तयार करण्याकरिता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दिपकराव साळुंखे)**

सांगितले आहे. त्यांना हेही सांगितले आहे की, युनिलॅटरली त्यांनी हे करावयाचे नसून धनगर समाजातील ज्यांनी या संदर्भात संशोधन केले आहे, त्यांनी जे पुरावे दिले आहेत ते सर्व पुरावे आपण ग्राह्य मानून त्यावर देखील त्यांनी अहवाल द्यावा. या पलीकडे जाऊन राज्य सरकारची ही भूमिका आहे की, राज्य सरकार या सोबत टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस सारख्या स्वायत्त संस्थेकडून देखील या संदर्भातील जे काही पुरावे आहेत त्याचा अहवाल करावयास तयार आहे. हे दोन्ही अहवाल प्राप्त करुन आपण शिफारस केली तर ती शिफारस ग्राह्य मानली जाईल. केवळ राज्य सरकारकडून कोणाला तरी खूष करण्याकरिता साधे पत्र शिफारस म्हणून पाठविले तर ते योग्य होणार नाही. म्हणून ज्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांना पत्र मिळाले, आजही त्या अनुषंगाने तुम्ही पत्र लिहिले तर त्या पत्राबाबत उत्तर हेच येईल की, महाराष्ट्रामध्ये ही जमात समाविष्ट नाही. महाराष्ट्र सरकारचा कोणताही प्रस्ताव नाही. यापूर्वी

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

दिलेला प्रस्ताव मागील काळात सरकारने परत घेतला होता. आज नव्याने प्रस्ताव दिला नाही याचे कारण हेच आहे की, तो प्रस्ताव तयार करण्याकरिता माननीय ॲडव्होकेट जनरल यांनी जे सांगितले त्या कार्यवाहीची पूर्तता आपण करीत आहोत. ते करुन राज्य सरकार या संदर्भात योग्य ती शिफारस करणार आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आदिवासी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण देण्यात येणार आहे. घटनेनुसार आरक्षणाचे प्रमाण 52 टक्के एवढे मर्यादित आहे. राज्यामध्ये धनगर समाजाची लोकसंख्या 14 टक्के आहे. म्हणजे धनगर समाजाला आरक्षण द्यायचे झाले तर आरक्षणाचे प्रमाण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032......

श्री.देवेंद्र फडणवीस....

64 टक्क्यावर जाईल आणि ते घटनाबाह्य ठरणार आहे. घटनेच्या आधीन राहून आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण कसे देण्यात येणार आहे? मराठा, धनगर आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणाचा विषय राजकारणासाठी आहे. जोपर्यंत घटनेनुसार आरक्षणाचे प्रमाण 52 टक्क्यापर्यंत मर्यादित आहे, ते प्रमाण वाढविल्याशिवाय शासन कोणत्याही समाजाला नव्याने आरक्षण देऊ शकत नाही, ही गोष्ट खरी आहे काय, त्या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, जेव्हा आपण 52 टक्क्याच्या मर्यादेचा विचार करतो त्यावेळी एस.सी., एस.टी.ला ते लागू नाही. आरक्षणावरील पहिला अधिकार एस.सी. आणि एस.टी.ला आहे. लोकसंख्येनुसार तुम्हाला ते आरक्षण देता येते. त्याची विभागणी करता येत नाही. एस.सी., एस.टी. समाजाला आरक्षणाचा अधिकार आहे. त्यामध्ये 52 टक्क्याची कोणतीही अडचण येणार नाही. राज्य सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात कॉन्शस भूमिका घेतली. 52 टक्क्याच्या पलीकडे जाऊन आरक्षण देता येणार नाही. ज्याप्रमाणे तामीळनाडू सरकारने त्यांच्याकडे ओबीसी समाज 76 टक्के आहे म्हणून त्यांना 76 टक्के आरक्षण मान्य केले. मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दल आपल्याकडून जी काही पूर्तता झाली त्याच्या पुष्ठ्यर्थ जो अहवाल दिला पाहिजे, सेन्ससची आकडेवारी दिली पाहिजे होती, माहिती द्यावयास पाहिजे होती ती न देता कार्यवाही केली गेली. त्यामुळे हायकोर्टाने ते स्ट्रक्ट डाऊन केले. आपण सुप्रीम कोर्टात थेट भूमिका घेतली की, महाराष्ट्र राज्यात मराठा समाज मागासवर्गीय आहे. मागासवर्गीयांकरिता आरक्षण देण्याएवढी लोकसंख्या आमच्याकडे आहे. आम्ही जनरल आरक्षणातून वाटा देत नाही अशी भूमिका सुप्रीम कोर्टात घेतली. त्यामुळे माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे कोणतीही अडचण यामध्ये येणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या सभागृहामध्ये संवेदनशील प्रश्नाची चर्चा होत असताना आम्ही मान्य करतो की, या प्रश्नामध्ये कोणतेही राजकारण नाही. राज्य सरकारने या विषयाचे राजकारण करून निवडणुका लढविल्या ही गोष्टी कशी नाकारता येईल? तरी देखील आम्हाला या विषयाचे राजकारण करावयाचे नाही. माननीय मुख्यमंत्री उत्तर देत असताना या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032......

श्री.भाई जगताप....

प्रश्नाची सोडवणूक करण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहेत. परंतु एका प्रश्नाचे उत्तर देण्याचे ते सातत्याने टाळत आहेत असा माझा आरोप आहे. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला कसा न्याय देणार आहात याचे उत्तर आलेले नाही, ते उत्तर येणे अपेक्षित आहे. या विषयाबाबत 2005, 2007 व 2009 मध्ये जे अहवाल सादर झाले ते माननीय मुख्यमंत्र्यांना तोंडपाठ आहेत. त्याचा आधार घेऊन विरोधी पक्षात असताना त्यांनी सभागृहात भाषणे केली होती. परंतु या विषयाबाबत मार्ग काढण्याची जी भूमिका आहे ती संदिग्ध वाटते. राज्यातील आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आश्वासित केल्याप्रमाणे आरक्षण कधी लागू होणार आहे? या संदर्भात जी प्रक्रिया सांगितली ती योग्य आहे. ती प्रक्रिया पूर्ण करुन केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला पाहिजे तो प्रस्ताव केव्हा पाठविण्यात येईल आणि धनगर समाजाला आरक्षण कसे दिले जाईल?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना नेहमीच संदिग्धता वाटेल. मी त्यांचे समाधान कधीच करु शकत नाही. ते या प्रश्नामध्ये राजकारण नाही म्हणतात आणि संदिग्धता व्यक्त करतात. त्यांचे समाधान होऊ शकत नाही. मी हेच सांगितले की, एस.सी., एस.टी.च्या संदर्भात there is no limitation. त्यामुळे या ठिकाणी आदिवासी समाजाला संपूर्ण प्रोटेक्ट करुन एक टक्काही त्यामध्ये वाटेकरी न करता आरक्षण देणे शक्य आहे. या संदर्भात राज्य सरकारची भूमिका अनुकूल आहे. आम्ही काहीही झाले तरी आदिवासी समाजाचे एक टक्काही आरक्षण कोणाला देणार नाही, त्यामध्ये वाटेकरी देणार नाही. या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांच्याशी चर्चा झालेली आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी हे कशाप्रकारे करता येईल या अनुषंगाने सगळया गोष्टी आम्हाला सुचविल्या आहेत. कालावधीच्या संदर्भात सांगण्यात आले आहे. आपण ऑलरेडी अहवाल तयार करावयास दिला आहे. अनेकदा असे अहवाल एकतर्फी होतात म्हणून त्यांना जाणीवपूर्वक सांगितले आहे की, धनगर समाजातील वेगवेगळया नेत्यांनी किंवा संशोधकांनी जो अभ्यास केला, यापूर्वी जो अहवाल दिला ते संशोधन किंवा तो अहवाल विचारात घेतला नाही आणि एकतर्फी अहवाल तयार झाला, म्हणून त्यांना सांगितले आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032......

श्री.देवेंद्र फडणवीस....

की, आपण सर्वांना बोलवावे, त्यांनी काय संशोधन केले ते ऑन मेरिट वेट करुन घ्यावे. या व्यतिरिक्त काही शंका असेल तर राज्य सरकार पॅरालल दुसरा अहवाल टीआयएसएस सारख्या संस्थेकडून देखील तयार करुन घेईल. अहवाल तयार करावयास किती वेळ लागेल, त्याचा कालावधी आज निश्चितपणे सांगता येणार नाही. परंतु हा अहवाल लवकरात लवकर तयार करावयास सांगितले जाईल. अहवाल आल्यानंतर या संदर्भातील कार्यवाही केली जाईल. या पलीकडे अधिक सकारात्मक उत्तर देता येत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, विरोधी पक्षाने या प्रश्नामध्ये राजकारण करावयाचे ठरविले तर सरकारचा नाईलाज आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सत्तेत आल्यानंतर अशाप्रकारे उत्तर देणे योग्य आहे की अयोग्य आहे हे त्यांनीच ठरवावे. मला आठवते, बारामती येथे धनगर समाजाचे सर्व नेते आणि धनगर समाज उपोषणाला बसले होते, त्यांचे उपोषण सोडताना त्यावेळचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर एका महिन्याच्या आत पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला एस.टी.च्या सवलती देऊ. हे राजकारण होते की नाही?

नंतर इ.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032...

श्री.धनंजय मुंडे...

हे राजकारण होते की नव्हते. हे राजकारण होते. आज सरकार येऊन जवळ जवळ 9 महिने झाल्यानंतर सुद्धा धनगर समाज सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे ते वाक्य कधी पूर्ण होईल आणि आम्हाला एस.टी.चे आरक्षण कधी मिळेल याची वाट पाहत आहे. एकीकडे उत्तरामध्ये सांगितले की, एस.टी.च्या कुठल्याही आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण दिले जाईल. दुसऱ्या सूचीमध्ये धनगर समाज एस.टी.मध्ये आहेच. तो राज्यात नाही. मग राज्यातील धनगर समाजाला केंद्राच्या दुसऱ्या सूचीप्रमाणे एस.टी.चे आरक्षण द्यायचे असेल तर त्या एस.टी.च्या आरक्षणाला धक्का लागणार नाही काय ? आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांचे पूर्ण उत्तर ऐकलेले आहे. आज आम्हाला उत्तर नको. आपले अहवाल काय आहे ते नको आहे.धनगर समाजाशी राजकारण आम्ही नाही तर आपण केले आहे. आम्हाला फक्त एकच पाहिजे आहे. आम्हाला आरक्षण पाहिजे आहे. धनगर समाजाला आरक्षण देणार हा आपलाच शब्द आहे. आपण आपला शब्द कधी पूर्ण करणार आहात हे उत्तर महाराष्ट्रातील धनगर समाजाला पाहिजे आहे. ते उत्तर सन्माननीय मुख्यमंत्री देतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मला अत्यंत आनंद आहे की, आज धनगर समाजाच्या नावाने जे कंठशोष करीत आहेत. त्यांच्यापैकी एकही जण ज्यावेळी धनगर समाजाचे लोक उपोषणाला बसले होते तोंड दाखवायला देखील गेले नव्हते.

.... (गोंधळ)...

आम्ही गेलो होतो. हे तोंड दाखवायला गेले नाहीत.

.... (गोंधळ)...

प्रत्यक्ष बारामतीमध्ये उपोषण सुरूअसताना हे तोंड दाखवायला देखील गेले नाहीत. हो आम्ही तेथे गेलो होतो. छाती ठोकपणे गेलो होतो.

.... (गोंधळ)...

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032...

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, आम्ही तेथे छाती ठोकपणे जाऊन सांगितले की, यांना धनगर समाजाला आरक्षण द्यायचे नाही. यांना केवळ राजकारण करायचे आहे. यांना केवळ एवढेच पाहिजे आहे की,....

.... (गोंधळ)...

हे पत्र त्यांनी पाठवून दिले....

.... (गोंधळ)...

**उप सभापती :** आपण मुख्यमंत्र्यांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हे रिजेक्ट होऊन आले पाहिजे. मग यांना कंठशोष करता आला पाहिजे. हे मगरमछ के आसू आहेत. त्यांनी आता रडणे बंद केले पाहिजे. धनगर समाजाला ज्यांनी खऱ्या अर्थाने अन्याय केला आहे ते हेच आहे. आम्ही नव्हे. आम्ही निश्चितपणे धनगर समाजाला न्याय देऊ. यासंदर्भातील सगळी कार्यवाही व आम्ही काय काय केले आहे ते मी येथे सांगितले आहे.

.... (गोंधळ)...

त्यामुळे आता राजकीय दृष्ट्या आपण नॉन प्लस होत आहोत हे लक्षात आल्यानंतर येथे गोंधळ करणे सुरू करण्यात आले आहे. विरोधी पक्षाने कितीही गोंधळ केला तरी धनगर समाजाला हे माहीत आहे की, 15 वर्षामध्ये कशा प्रकरे समाजाला बनावट आश्वासने दिली आहेत आणि त्यांचा अपमान केला.

.... (गोंधळ)...

हे शासन कमिटेड आहे. कार्यवाही सुरू आहे. ते कार्यवाहीनुसार आम्ही करू

.... (गोंधळ)...

=================



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे. प्रश्न क्रमांक 7846...

.... (गोंधळ)...

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, एवढ्या गोंधळामध्ये आम्ही प्रश्न कसा काय पुकारणार आणि त्याचे उत्तर कसे काय मिळणार ? या प्रश्नाला न्यायच मिळणार नाही.

.... (गोंधळ)...

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, छापल्या प्रमाणे.....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सभागृहात गोंधळ सुरू असल्यामुळे प्रश्न क्रमांक 7846 ला न्याय मिळणार नाही. आम्ही एवढ्या गोंधळामध्ये प्रश्न कसा काय पुकारणार.

.... (गोंधळ)...

**उप सभापती :** प्रश्न क्रमांक 7781, श्री.नरेंद्र पाटील .....

.... (गोंधळ)...

सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.45 ते 10.50 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:**तोंडी उत्तरे

**सभापती :** सभागृहात या अगोदर आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.7791 वर चर्चा पूर्ण झाल्यानंतर राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.7032 वर चर्चा झाली असून आता तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.7846 घेण्यात येईल.

***राज्यात भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ***

***(२) * ७८४६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत पाटीलल: सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

*(१) राज्यातील सरकारी निमसरकारी कार्यालयात विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या ाअधिकारी व कर्मचारी यांच्यावर मागील काही महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधककविभागाने धाडी टाकून अनधिकृत मालमत्ता जप्त केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, अनधिकृत व गैरमार्गाने मिळविलेल्या मालमत्तेबाबत शासनाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,*
*(३) तसेच लाचलुचपत प्रकरणी शासन त्वरीत निर्णय घेत नसल्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढून दिवसेंदिवस गुन्ह्यात मोठया प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,*
*(४) असल्यास, उक्त प्रकारांना आळा घालणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(५) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*प्रा.राम शिंदे,श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या करिता :* (१) *लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे दि.* ०१.०१.२०१५ *ते दि.*०७.०७.२०१५ *या कालावधीत एकूण* ६३६ *लाचेच्या सापळा प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये एकूण* ८२० *आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाद्वारे सन* २०१५ *मध्ये अपसंपदेचे एकूण* २१ *गुन्हे दाखल आले आहेत.*
*(२) आरोपी लोकसेवक यांच्या अनधिकृत मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्यात येऊन चौकशीत अपसंपदा निष्पन्न झाल्यास संबंधित आरोपी लोकसेवकांविरुध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात येतो. मा. न्यायालयाच्या आदेशाने आरोपी लोकसेवक यांची अपसंपदा शासनाकडून जप्त केली जाते.*
*(३) शासकीय लोकसेवकांविरुध्द भ्रष्टाचारासंदर्भात तक्रार करण्यास विविध पर्याय उपलब्ध झाल्याने जानेवारी ते जुलै-* २०१४ *च्या तुलनेत जानेवारी ते जुलै-* २०१५ *मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणांमध्ये* ६ *टक्क्यांनी वाढ झाली आहे.*

*...२...*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7846......

***(४) व (५) भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना भ्रष्टाचारासंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत www.acbmaharashtra.gov.in संकेतस्थळ, www.acbmaharashtra.netuहे मोबाईल ॲप व www.facebook.com/maharashtraACBuया फेसबुक पेजवर तक्रार करण्याची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली असून भ्रष्टाचारासंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत टोल फ्री क्र. १०६४ सुरु करण्यात आला आहे. तसेच जनतेच्या संपर्कात येणाऱ्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत तसेच सरकारी कामकाजाकरीता कागदपत्रे/दस्ताऐवज स्विकारणे व देणे हे डिजीटल पध्दतीने करण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व कार्यालयांना करण्यात आले असून सरकारी कामाकरीता लागणारे शासकीय शुल्क रोख स्वरुपात न घेता बँकेकडून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्यास सुचविण्यात आले आहे.***

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या दृष्टीने मी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आम्ही अनेक वेळा ऐकत आलो आहे की, महाराष्ट्र शासनाच्या बजेटमधील 25 ते 30 टक्के तरतूद भ्रष्टाचारामध्ये निघून जात असल्यामुळे विकासाची कामे योग्य प्रमाणात होत नाहीत. शासकीय कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ज्या पध्दतीने भ्रष्टाचार केला जातो तो भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने बंधने घातलेली आहेत की, नाही याची मला थोडीशीही कल्पना नाही. परंतु ज्यावेळेला आपण एखाद्या व्यक्तीला शासकीय नोकरी देतो त्यावेळेला त्या कर्मचाऱ्याच्या संपत्तीच्या संदर्भातील प्रतिज्ञापत्र करुन घेतले जाते काय ? शासकीय कर्मचाऱ्याची दर वर्षाची सेव्हींग किती आहे, संपत्ती किती आहे याची माहिती घेतली जाते काय ? ज्यावेळेस अशा प्रकारची चौकशी होते आणि चौकशीमध्ये शासकीय कर्मचाऱ्याने संपत्तीच्या संदर्भात दिलेले प्रतिज्ञापत्र आणि आढळून आलेली संपत्ती यामध्ये फरक आढळून आला तर अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाते काय ? शासकीय कर्मचाऱ्याने संपत्ती जाहीर करण्याच्या संदर्भात नियम असेल तर त्याची अंमलबजावणी शासनाने काटेकोरपणे करण्याची आवश्यकता आहे. नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसेल तर जे अधिकारी संपत्ती जाहीर करण्याच्या संदर्भात कुचराई करतात अशा अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई केली जाईल काय ? भ्रष्टाचाराची पाळेमुळे खालपर्यंत रुजली आहेत ती मूळ कारणे नष्ट करण्यासाठी शासन तातडीने पावले उचलणार आहे काय ?

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7846......

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यापूर्वी काही विशिष्ट अधिकाऱ्यांनाच आपल्या संपत्तीचा खुलासा करावा लागत होता. या अगोदर संपत्तीचा खुलासा सरसकट करावा लागत नव्हता. नवीन सरकार आल्यानंतर स्थानिक स्तरापर्यंतच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना आता संपत्तीचा खुलासा जाहीर करावा लागणार असून त्यासंदर्भातील जीआर आपण निर्गमित सुध्दा केले आहेत. जीआर निर्गमित होऊन 3/4 महिने झाले आहेत परंतु अद्यापही सर्व लोकांच्या संपत्तीचे खुलासे आलेले नाहीत. यासंदर्भात आम्ही नुकतीच आढावा बैठकही घेतली आहे. राज्य सरकारने सांगितले आहे की, नवीन जीआर प्रमाणे सर्वांनी आपल्या संपत्तीचा खुलासा केलाच पाहिजे. महानगरपालिका, जिल्हा परिषदा या सर्वांना हा नियम लागू करण्यात आला असून यामध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न सुरु झालेला आहे. सर्वांनी संपत्तीचा खुलासा करण्यासंदर्भात आपण पहिल्यांदाच निर्णय केला असल्यामुळे ही प्रक्रिया पूर्ण होण्यास थोडा वेळ लागणार आहे. एकदा सर्वांच्या संपत्तीची माहिती आल्यानंतर पिरॉडरऑकली त्यांना पुन्हा आपली संपत्ती घोषित करावी लागेल अशी तरतूद शासनाने केलेली आहे.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आता सांगितले आहे की, प्रत्येकाची चौकशी केली जाईल. माझे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्र शासनाचे काही अधिकारी निवृत्त झाले असून त्यांनी त्यांच्या कार्यकाळात करोडो रुपये भ्रष्टाचाराने कमावले असून ते आता 500-500 कोटी रुपयांचे मालक झाले आहेत. त्यामुळे अशा निवृत्त अधिकाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, कुठल्या व्यक्तीची कधी चौकशी करावयाची यासंदर्भात काही नियम आहेत. त्या नियमानुसार एखादी व्यक्ती निवृत्त झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या संदर्भात तक्रार असेल तर अशा व्यक्तीची तीन वर्षापर्यंत आपल्याला चौकशी करता येते व तीन वर्षानंतर तक्रार आली तर त्याची चौकशी वेगळया पध्दतीने केली जाते. लोकसेवक म्हणून त्याची चौकशी होत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या ज्या तक्रारी असतील त्यासंदर्भातील चौकशी शासन निश्चितपणे करीत असून यापुढेही करेल.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7846......

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, संपत्ती जाहीर करण्याच्या संदर्भात शासनाने नवीन कायदा केला असून त्या नवीन कायद्यानुसार लोकसेवकाची चौकशी करीत असताना परवानगी घ्यावी लागणार आहे. यासंदर्भात पुढील काळात भ्रष्टाचारामध्ये कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला किंवा लोकप्रतिनिधीला ट्रॅप टाकून पकडले तरी सुध्दा त्याची पूर्व चौकशी करावी लागणार आहे काय, त्यामध्ये दिरंगाई होणार नाही यासाठी शासन कोणता मार्ग काढणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो अर्थ लावला आहे तो दुर्दैवाने योग्य नाही. आपण ज्या कायद्याचा उल्लेख करीत आहात तो खाजगी तक्रारीच्या संदर्भातील आहे. शासकीय तक्रारीच्या संदर्भात नॉन कॉग्निजिबल ऑफेन्स होतो व त्याचा कॉग्निजन्स घ्यावा म्हणून ज्यावेळेस 156(3) च्या संदर्भात कारवाई होते त्यावरुन असे लक्षात आले आहे की, मागच्या काळात डीजी असतील किंवा अजून वरचे अधिकारी असतील या सर्वांच्या विरुध्द कोर्टाने समन्स इस्यू करुन टाकले होते. सुप्रीम कोर्टाने यासंदर्भात क्लिअरकट गाईड लाईन्स दिलेल्या असताना देखील त्या व्यवस्थित फॉलो होत नाही म्हणून त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने नाराजीही व्यक्त केलेली आहे. ज्या केसेस नॉन कॉग्निजिबल म्हणून रजिस्टर्ड झाल्या, परंतु त्या केसेस कॉग्निजिबल करा याकरिता प्रायव्हेट कंपलेंटमध्ये जातात. अशा परिस्थितीमध्ये लोकसेवकाच्या विरुध्द अशा प्रकारची तक्रार केली आणि तिचा कॉग्निजन्स घ्यावा असे सांगितले तर त्यासंदर्भातील परवानगी घेण्यासाठी आपण सभागृहात कायदा मांडला आहे. या कायद्यामध्ये बंधन टाकण्यात आले आहे की, 3 महिन्याच्या आत यासंदर्भातील परवानगी द्यावी किंवा नाकारावी लागणार आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे, कॉग्निजिबल ऑफेन्सेस, केलेले ट्रॅप याला कोणालाही तो कायदा लागू नाही. हा कायदा केवळ खाजगी तक्रारीच्या संदर्भातील आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7846......

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, संपत्ती जाहीर करण्याच्या विषयासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्य स्वागतच करीत आहेत. वर्ग 3 च्या कर्मचाऱ्यांला सुध्दा या कायद्यान्वये आपली संपत्ती जाहीर करावी लागणार आहे. लोकप्रतिनिधींना जो कायदा आहे त्याच पध्दतीने आपण हा कायदा करीत आहोत अशी माझी धारणा आहे. विवरण करीत असताना ॲफेडेविट शपथेवर करावे अशा प्रकारचे प्रावधान कायद्यामध्ये आहे काय ? तशा प्रकारचे प्रावधान नसेल तर ते असले पाहिजे. हा कायदा विधानसभेत पारित झालेला आहे. पिरॉडिकली दोन किंवा तीन वर्षाप्रमाणे किंवा आपल्या रोटेशन प्रमाणे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत असतात, त्या वेळेला त्या त्या अधिकाऱ्याने संपत्तीचे विवरण दर तीन वर्षाने किंवा एक वर्षाने देणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराचा नाश व्हावा यासाठी आपण सर्वजण लढत आहोत. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, जे कर्मचारी किंवा अधिकारी निवृत्त झाले आहेत त्यांच्या बाबतीत आपल्याला जी काही प्रक्रिया करावयाची आहे ती आपल्याला करता येईल. परंतु कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील मुख्य अभियंता श्री.सुनील जोशी हा भ्रष्टाराच्या नावाखाली ॲरेस्ट होता तो आता पुन्हा सेवेमध्ये रुजू झालेला आहे. या अधिकाऱ्याकडे किती संपत्ती आहे याची लहानापासून मोठयांना कल्पना आहे. अशा लोकांची चौकशी या कायद्यानुसार करण्यास आपल्याला अडचणी येणार नाहीत. जे लोक निवृत्त झाले आहेत त्यांचा विषय वेगळा आहे. परंतु असे किती तरी अधिकारी मॅटमध्ये जाऊन उजळ माथ्याने ते समाजामध्ये वावरत आहेत.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 7846....

श्री.भाई जगताप...

पूर्वी जे काम करीत होते तेच काम आता करीत आहेत. तेव्हा या कायद्यांतर्गत अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे कायदे आहेत. अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांची संपत्ती घोषित करावी लागते. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती निश्चितपणे तपासून पाहण्यात येईल. जर सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपली संपत्ती प्रतिज्ञापत्राद्वारे घोषित करणे बंधनकारक असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, अपचारी कर्मचाऱ्यांची संपत्ती जप्त करण्यामध्ये फार अडचणी येतात. मी मागील पाच वर्षातील संपत्ती जप्तीची प्रकरणे काढली आहेत. आपण कोट्यवधी रूपयांची संपत्ती जप्त करीत आहोत. बिहार आणि काही राज्यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याचा कायदा केलेला आहे. त्यामुळे त्यांना फार काही त्रास होत नाही. परंतु आपल्याकडे भ्रष्ट अधिकाऱ्यास पकडल्यानंतर ते कोर्टात जाऊन स्थगिती घेतात. तेव्हा आम्ही भ्रष्ट अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याच्या कायद्याचे प्रारूप तयार केले आहे. गृह विभाग त्याची छाननी करीत आहे. भ्रष्टाचाऱ्यांची संपत्ती जप्त करण्यासंदर्भातील स्वतंत्र कायदा डिसेंबरच्या अधिवेशनापर्यंत आणणार आहोत.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. परंतु आपली प्रश्नोत्तराच्या तासामध्ये दहा मिनिटे वाया गेली असल्यामुळे मी प्रश्नोत्तराची वेळ दहा मिनिटे वाढवित आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न राज्याच्या आर्थिक व्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत जी काही कारवाई केलेली आहे त्याचे विवरण लेखी उत्तरामध्ये दिलेले आहे. अवैध मार्गाने मिळविलेली संपत्ती जप्त केली आहे त्याचीही माहिती लेखी उत्तरामध्ये दिलेली आहे. सरकारी सेवेत असलेले अधिकारी आणि कर्मचारी भ्रष्टाचाराच्या मार्गातून मिळणारा पैसा बेनामी पद्धतीने राज्यभर वापरत असतात. आपणास उदाहरण सांगायचे झाले तर हाय-वे वरील धाब्यांमध्ये बेनामी पद्धतीने सरकारी अधिकाऱ्यांचा आणि विशेषतः विविध खात्याचा संबंध असतो किंवा ट्रॅव्हल कंपन्यांमध्ये देखील हा प्रकार आढळतो. मी आपणास एक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 7846....

श्री.हेमंत टकले...

प्रकरण सांगतो. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यामध्ये मातोळा येथील उप सरपंच श्री. भोसले यांनी गावातील विकास कामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल लाचलुचपत खात्याचे डी.वाय.एस.पी.श्री.अंकुशकर यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी या प्रकरणी कारवाई करण्याऐवजी श्री.भोसले यांच्याकडे पैशांची मागणी केली. ही गोष्ट खरी आहे काय ? महासंचालकांकडे तक्रार करुनही या बाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय ? आपण महाराष्ट्रातील आतल्या भागात अशी नवीन कुरणे तयार होत आहेत आणि त्यामधून मिळणारा पैसा सावकारीच्या माध्यमातूनही मोठ्या व्याजदराने दिला जातो. या बाबीचा आर्थिक शिस्तीवर परिणाम होतो. तेव्हा आपणास दिसतात त्यापेक्षा ही प्रकरणे खूप मोठी आणि गंभीर आहेत. तेव्हा गृह विभागाने अशा काही त्रुटी राहतात त्याचा सांगोपांग अभ्यास करावा. राज्याचे लोकायुक्त, उप लोकआयुक्त यांच्यामार्फत यामध्ये काही इन्टरव्हेंशन करता येईल काय हे पहावे. भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या जप्त केलेल्या संपत्तीमध्ये त्यांची स्थावर मिळकत असते, इमारती असतात, या इमारती सार्वजनिक उपयोगासाठी शासनाला वापरता येतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले. त्यातील पहिला प्रश्न एका स्पेसिफीक प्रकरणासंबंधी विचारलेला आहे. त्या प्रश्नाची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. त्या प्रश्नाची मी जरूर माहिती घेईन. जर त्या प्रकरणी कारवाई झाली नसेल तर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील. दुसरे म्हणजे वर्षानुवर्षे भ्रष्टाचाऱ्याच्या केसेस चालतात आणि अपचारी आपल्या संपत्तीची विल्हेवाट लावतात. मग आपल्या हाती काहीच लागत नाही. अशाप्रकारच्या संपत्ती तातडीने जप्त करता आल्या पाहिजेत. किंबहुना कोर्टातील केसचा निकाल लागेपर्यंत अपचाऱ्यांना त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट लावता येऊ नये म्हणून त्यांची संपत्ती आपल्या ताब्यात असावी. अपचारी न्यायालयात गुन्हेगार ठरले तर त्यांची प्रॉपर्टी सरकार जप्त करील. जर ते गुन्हेगार ठरले नाहीत तर न्यायालय जे काही सांगेल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल. आपण याच दृष्टीकोनातून असा कायदा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी जो विषय मांडलेला आहे त्याचा कायदा तयार करताना निश्चितपणे विचार केला जाईल.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 7846....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, एखाद्या प्रकरणाबाबत लाचलुचपत विभाग प्रतिज्ञापत्र देते की, अमूक यांची स्त्रोतापेक्षा जास्त उत्पन्न असल्यामुळे ओपन इन्क्वॉयरी करण्याची परवानगी द्यावी. त्यास शासन परवानगी देते. त्यानंतर ॲन्टी करप्शन विभाग सांगतो की, त्या तक्रारीमध्ये काहीच तथ्य नाही. तेव्हा अशा गौडबंगाल प्रकरणाची शासन चौकशी करणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ॲन्टी करप्शन विभागाकडे तक्रारी प्राप्त होतात किंवा त्यांना स्वतःला माहिती मिळते, त्या माहितीच्या आधारावर ते डिस्क्रीट इन्क्वायरी करतात. त्यांना वाटले की, ती केस प्रोसिड करण्यासारखी आहे तर ते प्रोसिड करतात. त्यांना ओपन इन्क्वायरीमध्ये साक्षी पुरावे करता येतात. डिस्क्रीट इन्क्वायरी आणि ओपन इन्क्वायरीचा रिपोर्ट सारखाच येईल असे शक्य नाही. कारण डिस्क्रीट इन्क्वायरीमध्ये साक्षी पुरावे करता येत नाहीत. डिस्क्रीट इन्क्वायरीमध्ये समोरच्याला सोर्सेस ऑफ इन्कम सांगण्याची संधी मिळत नाही. जेव्हा फायनल इन्क्वायरी होते तेव्हा त्याच्याकडून सोर्सेस समजून घेतल्यानंतर त्याच्या संपत्तीमध्ये जेवढ्या पर्सेन्टेचा फरक ॲडमीसीबल आहे, त्यापेक्षा जास्त फरक असेल तर त्याला प्रॉसीक्युट केले जाते. डिस्क्रीट इन्क्वायरी आणि ओपन इन्क्वायरी याच्या रिपोर्टमध्ये फरक असू शकतो. एखाद्या केसमध्ये जाणीवपूर्वक फरक असेल तो लक्षात आणून दिला, त्याचे पुरावे दिले तर त्याचा वेगळा विचार करता येईल. पण प्रोसेसने घडले असेल तर डिस्क्रीट इन्क्वायरी आणि ओपन इन्क्वायरीचा रिपोर्ट नेहमी सारखाच येईल असे सांगणे शक्य नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून तो गांभीर्याने घेण्याची गरज आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामुळे चांगली पगारवाढ मिळत आहे. पूर्वी असा समज होता की, सरकारी कर्मचाऱ्यांना पगार कमी असल्यामुळे ते लाच घेत होते. पण आता चांगला पगार असताना सुद्धा अनेक अधिकारी व कर्मचारी लाच घेताना रंगेहात पकडले जात आहेत. काही पकडले जात नाहीत म्हणून ते निर्दोष आहेत असेही नाही. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. म्हाडा किंवा अनेक सरकारी कार्यालयामध्ये लाच देऊ नये असे बोर्ड लावलेले आहेत. परंतु म्हाडामध्ये स्वे.फुटावर पैसे घेतले जातात आणि हे सर्वसामान्य माणसापासून ते अधिकारी व मंत्र्यांपर्यंत सर्वांना माहीत आहे.

ता.प्र.क्र. 7846....

श्रीमती विद्या चव्हाण....

(अडथळा).. मी सुरुवातीलाच सांगितले की, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. आदिवासी विभाग असो वा अन्य कोणताही विभाग असो सरकारी पैसा हा खाण्यासाठी आहे, डल्ला मारण्यासाठी आहे, लुटण्यासाठी आहे, असा त्यांचा समज झालेला आहे, हा समज दूर केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अभियंता श्री.सुनील जोशी यांना पुन्हा सेवेत घेतलेले आहे. सरकारी पैसा हा खाण्यासाठी नाही. आपण सरकारी कर्मचाऱ्यांना पाचवा आणि सहावा वेतन आयोग दिलेला आहे. त्यांना पुरेसा पगार देत आहोत. तेव्हा या संदर्भात कोणती कठोर उपाययोजना करणार आहात ? माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर पुरेसे नाही. प्रत्येक प्रकरणामध्ये पुरावे मिळत नाहीत, अधिकारी कर्मचारी पुरावे ठेवत नाहीत. शिपाईपासून ते साहेबांपर्यंत सर्वजण भ्रष्टाचार करीत आहेत. तेव्हा त्या संदर्भात कोणती कठोर उपाययोजना करणार आहात ?

यानंतर श्री.बोर्डे... `

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7846....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जो विषय मांडला तो खरोखरच गंभीर आहे. आपल्या व्यवस्थेत भ्रष्टाचाराची कीड ही खूप खोलवर रुजली आहे हे आपल्या सर्वांना कबूलच करावे लागेल. त्यामुळे आता या संदर्भातील पॉलिसीज अधिक ट्रान्सपरंट कराव्या लागतील. भ्रष्टाचारावर आळा घालण्याच्या दृष्टीने सरकारने अनेक निर्णय घेतलेले आहेत. सरकारच्या माध्यमातून सेवा हमी कायदा करण्यात येत आहे. हा कायदा मंजूर झाल्यानंतर अधिकाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात जबाबदारी येऊन पडणार आहे. आतापर्यंत एखाद्याला कामासाठी वारंवार चकरा मारायला लावल्या तर तो शेवटी पैसे देऊन काम करुन घेत होता. त्यामुळे आम्ही आता या विधेयकाच्या माध्यमातून चकरा मारणे संपविले आणि संबंधित अधिकाऱ्याला विलंब केल्याप्रकरणी जबाबदार धरले आहे. संबंधित व्यक्तींनी आवश्यक ती कागदपत्रे देऊ, शुल्क देऊन सुध्दा जर त्याला विहित कालावधीत सेवा दिली नसेल तर त्या अधिकाऱ्याला जबाबदार धरले आहे. सेवा हमी कायद्याच्या माध्यमातून ती सेवा त्याला विहित मुदतीत द्यावी लागेल, जेणेकरुन भ्रष्टाचाराला आळा घालता येईल. सभापती महोदय, भ्रष्टाचारावर आळा घालण्याचा सरकारचा प्रयत्न असून, जास्तीत जास्त प्रमाणात ई-गव्हर्नन्सचा वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महोदय, जेव्हा ह्युमन इंटरव्हेन्शन कमी होईल तेव्हा आपोआप भ्रष्टाचार कमी करता येईल. हा भ्रष्टाचार केवळ एखादा उपाय करुन दूर होईल असे नाही. यावर आळा घालण्यासाठी सिरीज ऑफ रिफॉर्म्स कराव्या लागतील. ज्यावेळी ॲण्टी करप्शन ऑफ ब्युरोकडून चौकशी करतो त्यावेळी अनेक प्रकरणात ई.डी. ची मदत घेतली आहे. शेवटी मनी ट्रेल हे ई.डी. च्या माध्यमातून सापडते. कारण एखाद्याने कमविलेला पैसा त्याला कोठे तरी गुंतवावा लागतो. कोणाच्या तरी माध्यमातून त्यात ट्रेल तयार होतो. त्यामुळेच या कामी ई.डी. ची मदत घेतली जाते. सर्वच प्रकरणात ई.डी. ची मदत घेता येत नाही. कारण केंद्र आणि राज्य सरकारचे कायदे वेगवेगळे आहेत. आतापर्यंत अपचाऱ्याला वाटत होते की, 10-15 वर्षे केस चालते, यात आपले काय बिघडते ? परंतु आता आपण भ्रष्ट अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याचा कायदा केल्यानंतर त्यातून थोडी भीती निर्माण होणार आहे. त्यामुळे राज्य सरकार भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी उपाययोजना करीत आहे. या संदर्भात या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचे स्वागत करण्यात येईल आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7846....

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

**उप सभापती** : या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मी 10 मिनिटे वेळ वाढवून दिला होता.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी हा प्रश्न मांडला होता. मला वाटते या प्रश्नावर भरपूर चर्चा झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसऱ्या आयुधाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करावा. प्रश्नोत्तराचा तास संपल्याचे अगोदरच जाहीर करण्यात आलेले आहे. माननीय मंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, या विषयी बैठक घेण्यात येईल. त्यामुळे त्या बैठकीमध्ये आपणास जे काही मांडावयाचे असेल ते मांडावे.

------

**<u>प्रश्नोत्तराच्या तासात कमी प्रश्नांवर चर्चा होत असल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन</u>**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून निदर्शनास आणून देतो की, या सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 5 ते 8 प्रश्नांवर चर्चा होत होती. परंतु आता केवळ दोन-तीन प्रश्नांवर चर्चा होत आहे. पहिल्या प्रश्नावर जवळजवळ 23 मिनिटे चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांचा आग्रह असतो की, प्रश्नोत्तराच्या तासात जास्तीत जास्त प्रश्नांवर चर्चा व्हावयास पाहिजे.

**सभापती** : आपण जे सांगत आहात ते सर्व मला मान्य आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांचे म्हणणे होते की, अगोदरच्याच प्रश्नावर चर्चा करावी. हे अत्यंत चुकीचे चालले आहे. मी स्पष्ट बोलतो की, सन्माननीय सदस्य प्रश्न विचारताना तो प्रश्न इतका डेव्हलप करतात की, त्याचे रूपांतर लक्षवेधी सूचनेमध्ये होते. लक्षवेधी सूचनेवर बोलताना तिचे रूपांतर 260 च्या प्रस्तावात होते आणि 260 च्या प्रस्तावावर बोलताना त्याचे रूपांतर अर्धा-तास चर्चेमध्ये होते. त्यामुळे या सर्व प्रकारावर सेल्फ कंट्रोल तुम्ही ठेवावयाचा की मी ठेवायचा ?

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शुक्रवार, दिनांक 24 जुलै, सोमवार, दिनांक 27 जुलै व मंगळवार, दिनांक 28 जुलै, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**सभापती** : शुक्रवार, दिनांक 24 जुलै, सोमवार, दिनांक 27 जुलै व मंगळवार, दिनांक 28 जुलै, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या, सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज दिनांक 29 जुलै, 2015 रोजी श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी सकाळी 8.05 वाजता "पदवीधर आणि शिक्षक मतदार संघ मोडीत काढण्याची तयारी भाजप सरकारने सुरु करणे, या मतदार संघाची आवश्यकता आहे काय, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करणे तसेच संसदीय लोकशाहीतील निर्णयांच्या परिपक्वतेसाठी सरकार आणि विरोधी पक्ष यांनी घटनेचे सुतोवाच करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, शासनाने या विषयी निवेदन करावे, असे मी निदेश देत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सदरहू निवेदन याच अधिवेशनात करावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. उक्त विषयी या अधिवेशनात निवेदन करावे.

तसेच आज दिनांक 29 जुलै, 2015 रोजी श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांनी सकाळी 8.30 वाजता "दिनांक 1 ऑगस्ट, 2015 पासून राज्यातील महापालिका क्षेत्रात लागू असलेली एलबीटी रद्द करण्याची घोषणा शासनाने केली असली तरी वार्षिक रुपये 50 कोटींपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना एलबीटी माफ करुन त्यापेक्षा अधिक उलाढाल करणाऱ्या व्यापा-यांना एलबीटी भरावी लागणार असल्याची अधिसूचना शासनाने जुलै, 2015 च्या शेवटच्या आठवड्यात जारी करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती....**

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, सन्माननीय सदस्यांना या विषयी त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी मी त्यांना एक मिनिट वेळ देत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नवीन शासनाने असे जाहीर केले होते की, दिनांक 1 ऑगस्ट, 2015 पासून एलबीटी रद्द करण्यात येईल. ही चांगली गोष्ट आहे. परंतु हे करीत असताना 50 कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्या व्यापाऱ्यांनाच एलबीटी लागू राहील आणि 50 कोटी रुपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना एलबीटी लागू राहणार नाही. उदाहरण म्हणून सांगतो की, पुणे महानगरपालिकेंतर्गत 70 हजार नोंदणीकृत डिलर्स आहेत. या बाबत मी आयुक्तांकडून अधिकृत माहिती घेतली आहे. यापैकी केवळ 122 डीलर्सची उलाढाल 50 कोटी रुपयांच्या वर आहे. अशा परिस्थितीत महापालिकेला उत्पन्न कसे मिळणार ? महोदय, जर एलबीटी रद्द केला तर महापालिकांना त्यांच्या कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पैसा राहणार नाही. याशिवाय घनकचऱ्याची विल्हेवाट वगैरे अनेक गोष्टींच्या बाबतीत प्रश्न निर्माण होणार आहे. एलबीटी रद्द करीत असताना महापालिकांच्या उत्पन्नाच्या बाबतीत सरकारने पर्याय शोधणे आवश्यक आहे. निधी कसा निर्माण करावा हे सरकारचे काम आहे. सरकार व्हॅटवर अधिभार लावून त्याचा बोजा ग्रामीण भागातील लोकांवर लादू शकत नाही. कारण व्हॅटवर अधिभार लावला तर ग्रामीण भागातील लोकांना पैसे द्यावे लागतील, शिवाय हे सरकारला करणे शक्य नाही. त्यामुळे राज्य सरकारने मुद्रांक शुल्कावर अधिभार लावण्याची शक्कल काढली आहे. महोदय, व्यापाऱ्यांनी फायदा कमवायचा, त्यांनी एलबीटी भरायचा नाही आणि ज्यांनी कमी शुल्कात व्यवसाय करायचा त्यांनी पैसे द्यावयाचे हा कुठला न्याय आहे ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ....

(अडथळा) हे कसले सरकार आहे ? आपण मला बोलण्यास परवानगी दिल्याबद्दल मी धन्यवाद देतो. आमचा विरोध नाही. आमची भूमिका आहे की, तुम्ही महापालिका सशक्त करा आणि तुम्हाला ती करता येत नसेल तर राजीनामे देऊन बाहेर पडा. (अडथळा) आम्ही करून दाखवितो.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**</u>

**सभापती** : आज दिनांक 29 जुलै, 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, शरद रणपिसे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स. यांनी सकाळी 08.55 वाजता "डोंबिवलीच्या ठाकुर्ली रेल्वेस्थानक परिसरातील चोळेगावातील मातृकृपा ही इमारत कोसळून त्याखाली गाडल्या गेलेल्या 6 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक 28 जुलै, 2015 च्या रात्री घडली असून या दुर्घटनेत 14 नागरीक जखमी असणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. परंतु सदर बाब गंभीर असून त्याबाबत शासनाने आजच निवेदन करावे असे मी आदेश देत आहे.

**सभापती** : एकच सन्माननीय सदस्य 1 मिनिटात बोलतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला 2-3 मुद्दे मांडायचे आहेत. निवेदनामध्ये काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत. 6 जण मृत्युमुखी पडले आहेत. 11 जण रूग्णालयात आहेत आणि त्यातील 2 जण गंभीर आहेत. अजुनही त्यांच्या पुनर्वसनाबाबत काहीही धोरण जाहीर झालेले नाही, त्यांना मदत जाहीर झालेली नाही. तेथे 395 धोकादायक इमारती आहेत. 291 अति धोकादायक इमारती आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती होईल आणि पुन्हा नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना आणावी लागेल. तेथे संक्रमण शिबीर नाही. पावसामध्ये त्यांनी कुठे जायचे ? केडीएमसी नोटीस सर्व्ह करण्याशिवाय दुसरे काहीही करीत नाही. वर्षानुवर्षे तेथे क्लस्टर डेव्हलपमेंटची मागणी आहे, ती मागणी सरकारने आजच मान्य करावी, त्या शिवाय हा प्रश्न सुटणार नाही. आज निवेदनात हे उत्तर अपेक्षित आहे, अशी माझी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : आज दिनांक 29 जुलै, 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, शरद रणपिसे, जयंत प्र. पाटील, संजय दत्त, जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी सकाळी 08.56 वाजता "राज्य सरकारमधील विविध खात्यांच्या माननीय मंत्र्यांकडून नियमबाह्य काम करुन भ्रष्टाचार करण्यात येत असणे, महाराष्ट्र शासनाच्या 3 लक्ष रुपयांच्या वरील खरेदीस ई-टेंडरिंगच्या निर्णयास हरताळ फासून अनेक विभाग मर्जीतील ठेकेदारांना कामे देण्यासाठी कोट्यवधी रुपयांची खरेदी करीत असून महिला व बालविकास विभागाने 206 कोटी रुपयांची विनानिविदा खरेदी केलेली असणे, शालेय शिक्षण विभागाने 191 कोटी रुपयांची अग्निशामक यंत्रे ई-टेंडरिंग विना न घेता दरकरारावर घेण्याचा प्रयत्न करणे, आदिवासी विभागाने अशाच पध्दतीचे 19 कोटी रूपयांचे व साडेचार कोटी रुपयांचे बूट खरेदी दरकरारावर खरेदी करणे, या नियमबाह्य खरेदीलाच माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती देणे, कृषी खात्याच्या सारा यंत्राच्या खरेदीत 125 कोटी रूपयांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार आढळून येणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय व आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविलेल्या म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव हा सारखाच असून अतिशय गंभीर बाब व विरोधी पक्षाने वारंवार चर्चेची केलेली मागणी यासंबंधीच्या या नियम 289 च्या सूचनेवरचा निर्णय राखून ठेवत आहे. दिवसभरातील कामकाजाचा एकंदर लोड पाहून आज संध्याकाळपर्यंत किंवा सकाळी मी या संदर्भात निर्णय घेईन. सन्माननीय सदस्यांनी एक मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, मी आपले आभार मानतो. अधिवेशन सुरू झाल्यानंतर आम्ही सर्वांनी मागणी केली होती की, माननीय मंत्र्यांनी भ्रष्टाचाराच्या प्रकारांत राजीनामे द्यावेत. (अडथळा) आमची मागणी स्वीकारू नका. परंतु शिवसेनेच्या अधिकृत प्रवक्ते जे खासदार आहेत, त्यांनी सांगितले आहे की, किमान 2 कॅबिनेट मंत्र्यांनी राजीनामे दिले पाहिजेत. (अडथळा) आम्ही नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली आहे, नियम 260 प्रस्ताव दिला आहे. (अडथळा) महिला व बालविकास विभागामध्ये 166 कोटी .... (अडथळा)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सविस्तर चर्चा नको. आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, आपण आकड्यांची बेरीज पहावी. शालेय शिक्षण विभाग 191 कोटी रूपये (अडथळा) असे एकूण 555 कोटी 50 लाख रूपये (अडथळा) आदिवासी विभाग .... (अडथळा) ही बाब अतिशय गंभीर आहे. आम्ही मुद्दा उपस्थित केला होता. शासनाने 18 डिसेंबरला सर्व विभागांसाठी शासन निर्णय काढला होता की, 3 लाख रूपयांच्या वर जी खरेदी करायची असेल ती ई-टेंडरद्वारे करणे अनिवार्य राहील. माननीय राज्यपालांनी 12 नोव्हेंबरला भाषण केले की, हे शासन सर्व प्रकारच्या खरेदीमध्ये पादर्शकता आणण्यासाठी ई-टेंडरिंग करेल. राज्यघटनेच्या अनुच्छेद 166 नुसार रूल्स ऑफ बिझनेसचे उल्लंघन झाले आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सविस्तर बोलू नये. आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, घटनेची पायमल्ली केली आहे. (अडथळा) आमचे ऐकू नका. शिवसेनेचे, दैनिक सामनाचे ऐका आणि त्वरित राजीनामा द्या. सभागृहात चर्चा व्हावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**</u>

**सभापती** : आज दिनांक 29 जुलै, 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी सकाळी 08.20 वाजता "नैसर्गिक संकटापासून राज्यातील शेतकऱ्यांना संरक्षण मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व भारतीय कृषी विमा कंपन्यांच्या सहकार्याने राज्यात राष्ट्रीय कृषी विमा योजना राबविण्यात येत असून खरीप हंगाम 2015 मध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजना राज्यामध्ये राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित असून त्याद्वारे विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये विशेष पॅकेजद्वारे शेतकऱ्यांना विमा हप्त्यात अनुदान योजना लागू करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला या संदर्भात एक मिनिट बोलायचे आहे.

**सभापती** : आपण पुढे गेलो आहोत. मी सूचना अमान्य केली आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर बोलायचे आहे.

**सभापती** : ठीक आहे. आपण यावर 1 मिनिट बोलावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संबंधीचा विषय आहे. आपण पावसाळी अधिवेशनाच्या समाप्तीकडे आलो आहोत. वारी फिरल्यानंतर पाऊस फिरतो अशी ग्रामीण भागात म्हण आहे. परंतु वारी फिरुनही ग्रामीण भागात पाऊस नाही. त्यामुळे आज राज्यातील शेतकरी भयंकर अडचणीत आला आहे. अधिवेशनाच्या सुरुवातीला विरोधी पक्ष म्हणून आम्ही सर्वांनी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना सरकारने कर्जमाफी द्यावी ही भूमिका मांडली होती. साडे तीन दिवस हे सभागृह शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रस्तावावर चालले नाही. कामकाज होऊ दिले नाही. आम्हाला अपेक्षित होते की, सरकार कमीत कमी चर्चेला तयार झाले आहे. त्यामुळे कर्जमाफी, व्याजमाफी देईल. परंतु सरकारने कर्जमाफी दिली नाही आणि व्याजमाफीही दिली नाही. (अडथळा) मी अतिशय गंभीर विषयावर बोलत आहे. सरकारने कर्जमाफी दिली नाही आणि व्याजमाफीही दिली नाही. शेवटी दीड हजार रुपये हेक्टरी दुबार पेरणीसाठी दिले. मंत्रिमंडळातील कोणत्याही माननीय मंत्र्यांनी एक हेक्टर क्षेत्रात दीड हजार रुपयांमध्ये पेरणी करुन दाखवावी. मी आजही दीड हेक्टर जमीन त्या माननीय मंत्र्यांना दान देण्यास तयार आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

अशा प्रकारे त्यांनी शेतकऱ्यांची चेष्टा करु नये. दुष्काळात तेरावा महिना, अशी आज शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. दुबार पेरणीचा विषय संपला आहे, पहिल्या पेरणीचे पीक जळाले आहे. दिनांक 31 जुलै, 2015 ही पीक विम्याचा प्रिमियम भरण्याची शेवटची तारीख आहे. शेतकऱ्यांना हा प्रिमियम त्या तारखेपर्यंत भरावा लागणार आहे. शेतकरी अगोदरच अडचणी असताना आता या प्रिमियममुळेही तो अडचणीत आला आहे. यापूर्वी कापसाचा आणि ऊसाचा प्रिमियम 3700 रूपये होता. (अडथळा..........) चर्चा कशावर आहे, अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सभागृहाचे नेते विचारीत आहेत.

सभापती महोदय, अगोदर माझे बोलणे आपण पूर्ण होऊ द्यावे व नंतर सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांना बोलण्याची संधी द्यावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या विषयावर स्वतंत्रपणे चर्चा करण्याची आमची तयारी आहे. या विषयावर या सभागृहात वारंवार चर्चा झाली आहे आणि सरकारतर्फे उत्तरही देण्यात आले आहे. तथापि, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मागणी असेल तर आजचे सर्व कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा करण्याची आमची तयारी आहे. मी केवळ "कशावर चर्चा आहे", असे विचारले आहे. कोणीही उठावे आणि बोलत रहावे, असे चालत असेल तर....(अडथळा....) यांना चर्चा करण्यात रस आहे की, राजकारणात रस आहे ? या सभागृहामध्ये निव्वळ........

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, "कोणीही उठावे आणि काहीही बोलावे", असे वक्तव्य आताच सन्माननीय सभागृह नेत्यांनी केले आहे. सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते बोलत आहेत. त्यामुळे कोणीही उठावे आणि बोलावे....(अडथळा....) नाही, नाही. तुम्हाला शब्द मागे घेतले पाहिजेत. आपण सभागृहाच्या विरोधी पक्षनेत्यांबाबत बोलला आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2....

**सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मंत्री महोदयांनी देखील खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आपण खाली बसावे. या सभागृहाचा डेकोरम सर्वांनी पाळावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही आपला आदर्श घ्यावा आणि या वयामध्ये (अडथळा.......) आपण परवानगी दिल्यानंतर मी नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने बोलत होतो. या संदर्भातील माझे बोलणे पूर्ण होण्याअगोदरच मला खाली बसविण्यात आले.

सभापती महोदय, विषय एवढाच आहे की, पीक विम्याचा प्रिमियम भरण्याची शेवटची तारीख दिनांक 31 जुलै, 2015 ही आहे. आज शेतकऱ्यांसमोर (अडथळा......) कशावर चर्चा करायची, अशी विचारणा होत आहे. परंतु, माझे बोलणे तरी पूर्ण होऊ द्यावे. शेतकऱ्यांचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर तो सोडविण्याअगोदरच सरकारला का बोचतो, असा प्रश्न आम्हाला पडावयास लागला आहे.

सभापती महोदय, कापसासाठी यापूर्वी विम्याचा प्रिमियम 3700 रुपये होता. तो आता 11 हजार रुपये झाला आहे. त्यामुळे तो शेतकऱ्यांनी कसा भरायचा, असा प्रश्न आहे. हा नियम 289 च्या सूचनेचा विषय आहे. ऊसाचा प्रिमियम तिपटीने वाढविला आहे. यापूर्वी शेतकरी टनाने ऊस विकायचे. आता ते काकरीने विकू लागले आहेत. काकरी कशाला म्हणतात, हे माहीत असेल तर त्याचा अर्थ समजेल. 3 कांड्यांवर, 4 कांड्यांवर आलेला ऊस जनावरांना घालावा लागत आहे. त्यामुळे या संदर्भात सरकारने भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

सभापती महोदय, आज राज्यातील शेतकरी अडचणीत आलेला आहे. पीक विम्याच्या पलीकडे जाऊन सरकारने कर्जमाफी नाकारली आहे. त्यामुळे त्याला दुसरीकडून कोठूनही पैसे मिळू शकत नाहीत. त्यामध्येच पीक विम्याचा प्रिमियम वाढविला आहे. सरकारने प्रिमियम कमी केला पाहिजे किंवा वाढलेल्या प्रिमियमची रक्कम सरकारने भरली पाहिजे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आजच्या दिवसाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन सभागृहाने या विषयावर चर्चा करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केला आहे. विम्याच्या प्रिमियमच्या रकमेत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे हा प्रिमियम भरण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, वर्धा जिल्ह्यातील सेलू येथे कर्ज मिळत नाही म्हणून तीन शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. आता सामुहिक आत्महत्या करण्याचा प्रयत्नही होत आहे. यापूर्वी एखादा शेतकरी आत्महत्या करायचा. आता सामुहिक आत्महत्या करण्यास शेतकरी तयार झाले आहेत. ही परिस्थिती शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामध्येच पीक विम्याच्या प्रिमियममध्ये दुपटीने, तिपटीने वाढ केली आहे. प्रिमियम भरण्याची मुदतही सरकार वाढवीत नाही. या दोन्ही बाबत सरकारने निर्णय घेतला पाहिजे. पूर्वी एवढाच प्रिमियम ठेवण्याबाबत आणि प्रिमियम भरण्याची मुदत वाढविण्याबाबत सरकारने निर्णय घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याबाबत सरकारने फेरविचार केला पाहिजे.

**सभापती :** ही नियम 289 ची सूचना मी यापूर्वीच अमान्य केली आहे. शासनाने या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे.

आता आपण कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्याबाबतचे कामकाज सुरु करु.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे. (अडथळा.....)

**सभापती :** नियम सोडून मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनाही बोलण्याची परवानगी दिली होती. आता सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनाही परवानगी देतो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या सभागृहात अन्य सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी मिळते. पण सभागृहाच्या नेत्यांना बोलण्याची परवानगी मिळत नाही. सर्वांनाच बोलू द्यावे. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या विषयावर सर्वांनाच बोलण्याची इच्छा दिसत आहे. त्यामुळे सभागृहातील ज्या सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलण्याची इच्छा आहे, त्या सर्वांनाच आपण बोलू द्यावे.

सभापती महोदय, अतिशय महत्वाचा विषय सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी मांडला आहे. हे अधिवेशन सुरु झाल्यानंतर आजतागायत या विषयावर सभागृहात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. या चर्चेतून सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नसेल तर आजही या विषयावर आपण चर्चा घ्यावी. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. इतर

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

सर्व कामकाज बाजूला ठेऊन या ठिकाणी चर्चा करावी, अशी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांची मागणी आहे. आमचीही त्यास काही हरकत नसावी आणि माझीही नाही. या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आज दिवसभराचे कामकाज स्थगित करुन या प्रश्नावर चर्चा सुरु करावी. म्हणजे सरकारला उत्तर देणे सोयीस्कर ठरेल. त्यामुळे आपण या विषयावर चर्चा सुरु करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती :** मी ही सूचना अगोदरच अमान्य केली आहे व शासनाने निवेदन करावे, असा माझा निर्णय जाहीर केलेला आहे.

---------------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचा सन 2013-14 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वैधानिक विकास मंडळनिहाय प्रत्यक्ष खर्चाचा सुधारित तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------------

श्री.दीपक केसरकर (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल, 2014 ते 31 मार्च, 2015 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळ्या विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेले कर्ज, कर्जरोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमीविषयीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

------------

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 7-महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, 2015 च्या कलम 25 अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (अडचण दूर करणे) आदेश, 2015 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** आदेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------------

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन 2011-2012 चे एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------------

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन 2014-2015 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.गिरीष महाजन (जसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2013-2014 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

मी सभागृह नेत्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाला जे अहवाल सादर केले जातात त्यावर एखादी चर्चा घडवून आणावी, हे आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये मान्य केले होते आणि सर्वांनीच तशी मागणी केली होती. जलसंपदा विभागाचा लेख्यांच्या संदर्भातील महत्वाचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाचा वार्षिक अहवाल असेल तर त्यावर चर्चा घडवून आणावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण जलसंपदा विभागाच्या अहवालाच्या संदर्भात सूचना केली आहे. पुढील अधिवेशनात ठेवता येईल आणि सीएजीच्या ऑडिट रिपोर्टसह ठेवता येईल.

**सभापती** : ठीक आहे.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2012-2013 या वर्षाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2012-13 व 2013-14 या वर्षाचा वार्षिक अहवाल तसेच, दिनांक 31 मार्च, 2013 व दिनांक 31 मार्च, 2014 अखेरचा ताळेबंद नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल तसेच ताळेबंद नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-------

श्री.विजय देशमुख (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन 2013-2014 या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा तेहेतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

प्रा.राम शिंदे (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचा सन 2013-14 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.माणिकराव ठाकरे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती दिप्ती चवधरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर करते.

**सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.चंद्रकांत रघुवंशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, पंडित दिनदयाल उपाध्याय घरकुल योजने अंतर्गत जागा खरेदी करण्यासाठी 50 हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. परंतु, आज ग्रामीण भागात 50 हजार रुपयांमध्ये जमीन मिळत नाही. म्हणून ज्यांचे 10 वर्षापेक्षा जास्त काळ शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाले असेल त्या जमिनीवर त्याला घरकुल बांधण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी, अशी समिती शासनाला शिफारस करु इच्छिते.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा विषय असा आहे की, कृषी पंपाच्या वीज जोडणीसाठी अर्ज करुन देखील बरेच वर्षे वीज कनेक्शन मिळत नाही. शासनाने शेतकऱ्यांना एक महिन्याच्या आत वीज कनेक्शन द्यावे, अशी महत्वाची शिफारस समिती करु इच्छिते.

सभापती महोदय, रस्त्याची गुणवत्ता राखण्यासाठी खऱ्या अर्थाने डांबरी रस्त्यांच्या कामामध्ये एलडीओचे भेसळ मोठ्या प्रमाणावर आहे. आजही ग्रामीण भागातील रस्त्यांचा दर्जा चांगला नाही. म्हणून ज्या शासकीय कंपन्या डांबर सप्लाय करतात त्या तीन शासकीय कंपन्यांकडूनच ठेकेदाराने डांबर खरेदी करावे असे ठेकेदारावर बाईंडिंग करावे आणि डांबर खरेदी केल्याचे बिल देखील देयकाबरोबर सादर करावे, अशी समिती शासनाला शिफारस करु इच्छिते.

सभापती महोदय, राज्यात आजही 900 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ती पदे भरण्याचा विचार केला तर बीएएमएस डॉक्टरांचा कोटा 25 टक्के इतकाच आहे. बीएएमएस डॉक्टर ग्रामीण भागात जातात. शासनाने जर त्यांचे पर्सेंटेज वाढविले तर प्राथमिक आरोग्य केंद्राला कमीत कमी बीएएमएस डॉक्टर तरी मिळतील, असे समितीला वाटते.

सभापती महोदय, समितीने केलेल्या शिफारशींचा शासनाने विचार करावा, अशी मी सभागृहाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती रामनाथ मोते (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे एकोणनव्वदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे एकोणनव्वदावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे

श्री.नागो गाणार (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, समितीची बैठक गुरुवार, दिनांक 23 जुलै, 2015 रोजी दुपारी 2.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये श्री.मुझफ्फर हुसेन, वि.प.स. यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री.एस.मुझफ्फर हुसेन, वि.प.स. हे अर्थसंकल्पीय सत्र कालावधीमध्ये दिनांक 9 ते 13 मार्च, 2015 पर्यंत (5 दिवस), दिनांक 17 ते 19 मार्च, 2015 (3 दिवस), दिनांक 23 ते 27 मार्च, 2015 (5 दिवस), दिनांक 30 मार्च ते 1 एप्रिल, 2015 (3 दिवस) व दिनांक 6 ते 10 एप्रिल, 2015 (5 दिवस) असे एकूण 21 दिवस विधानपरिषदेच्या बैठकांना अनुपस्थित होते. आजारपणामुळे डॉक्टरांनी त्यांना पूर्णतः विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असल्याचे कारण नमूद करुन त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र समितीस सादर केले आहे.

सन्माननीय सदस्य विधानपरिषदेच्या बैठकांना अनुपस्थित असल्याबाबत त्यांनी दिलेल्या अर्जावर समितीने विचारविनिमय केला व उपरोक्त बैठकांना अनुपस्थित असल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या अर्जातील रजेचे कारण ग्राह्य धरुन त्यांना उक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकांना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

**सभापती** : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत श्री.मुझफ्फर हुसेन, वि.प.स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीकरिता अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय ? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

-----------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**आजच्या कामकाज पत्रिकेवरील नियम 260 च्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यासंदर्भात**</u>

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोजिरवर बोलण्यासाठी उभा आहे, सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेवर पाच विधेयके आहेत, मी दोन्ही सभागृहात सदस्य म्हणून काम केले आहे. नियम 260 चे तीन प्रस्ताव एकाच वेळी कामकाजपत्रिकेवर दाखविणे हे मला देखील अनाकलनीय वाटत आहे. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत सभागृहातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, नियम 101 अन्वये ज्या लक्षवेधी सूचना आहेत त्या मागे ठेऊन नियम 260 चे तिन्ही प्रस्ताव अतिशय महत्वाचे आहेत, त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे, लक्षवेधी सूचना मागे ठेऊन त्या नंतर विशेष बैठकीत घेण्यात याव्यात. अनेक वेळा असे आपण केले आहे. नियम 260 च्या प्रस्तावांना न्याय देण्यासाठी नियम 101 अन्वये असलेल्या लक्षवेधी सूचना मागे ठेऊन उद्या किंवा परवा त्यावर चर्चा करता येईल. अधिवेशनाचा कालावधी आता दोनच दिवस शिल्लक आहे. या लक्षवेधी सूचना विशेष बैठकीत घेण्यात याव्यात. नियम 260 च्या तिन्ही प्रस्तावावर सभागृहात चर्चा होईल अशा प्रकारचा वेळ आपण द्यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेच्या वेळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी सांगितले होते की, आज सायंकाळपर्यंत नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेवर माझा जो काही निर्णय माझा होईल तो होईल. परंतु मी आपणाला आश्वासित करु इच्छितो की, या तिन्ही प्रस्तांवावर कोणत्या न कोणत्या माध्यमातून अतिरिक्त एखादी बैठक बोलवून या तिन्ही 260 च्या प्रस्तावावर चर्चा घडविण्यात येईल.

-------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** पंजाब मधील गरुदासपूर जिल्ह्यात दिनांक 27 जुलै, 2015 रोजी दहशतवाद्यांनी केलेला हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**सभापती** : पंजाब मधील गरुदासपूर जिल्ह्यात दिनांक 27 जुलै, 2015 रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"पंजाब मधील गरुद्दासपूर जिल्ह्यात दिनांक 27 जुलै, 2015 रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यांचा हे सभागृह तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत असून या हल्ल्यातील गोळीबारात मृत्यूमुखी पडलेल्या निरपराध व्यक्तींच्या निधनाबाबत हे सभागृह अतिव दुःख व्यक्त करते. असा प्रस्ताव मी सभागृहात मांडत आहे."

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

----------

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्याची नियमबाह्य खरेदी

**मु.शी.:** अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्याची नियमबाह्य खरेदी या विषयावरील तारांकित प्रश्नाला दिलेल्या चुकीच्या उत्तराबाबत सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी माननीय श्रीमती पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री यांच्या विरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी 'अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्याची नियमबाह्य खरेदी' याबाबत 'माननीय श्रीमती पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री ' यांच्या विरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपणाकडे माननीय मंत्री महिला व बाल विकास विभाग यांच्या संदर्भात नियम 240 अन्वये विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, गेले दोन महिने आपल्या राज्यात आणि देशात महिला आणि बाल विकास खात्याच्या संदर्भात अनियमितता, गैरव्यवहार व जो भ्रष्टाचार झाला त्यासंदर्भात इलेक्ट्रानिक मिडिया व प्रिंट मिडिया यांनी मोठ्या प्रमाणात हा विषय जनतेपर्यंत पोहचविला आहे. या सर्व प्रकरणात खरेदी अनियमितपणे झाली आहे, या खरेदीत गैरव्यवहार कसा झाला आहे, ही बाब मांडण्यासाठी मी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, आपण या सभागृहात जे निर्णय दिले आहेत, त्याची एक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. त्यावर 'विशेष हक्कभंग प्रस्ताव सारसंग्रह 1937 ते 2007' असे नमूद केले आहे. यामधील पान क्रमांक 35 मधील अनुक्रमांक 29 वर असे नमूद केले आहे की, सन्माननीय सदस्यांनी किंवा माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर हे हेतूतः बुध्दी पुरस्सर व जाणीवपूर्वक सभागृहाची दिशाभूल करणारे असेल तरच हक्कभंगाचा प्रश्न उपस्थित होतो. मी मांडलेल्या हक्कभंगामध्ये नेमका हाच मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांनी बुध्दी पुरस्पर या सभागृहाची दिशाभूल

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

केलेली आहे. 14 जुलै 2015 च्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 6658 मी व अनेक सन्माननीय सदस्यांनी विचारला होता. त्या दिवशी सभागृहाचे कामकाज गोंधळात पार पडले होते. त्याची यादी 16 जुलै, 2015 रोजी पटलावर ठेवण्यात आली. त्यातील क्रमांक दोन मध्ये मी असा प्रश्न विचारला होता की, ही खरेदी नियमाप्रमाणे झाली आहे काय ? मंत्री महोदयांनी असे लेखी उत्तर दिले होते की, सदर मान्यता नियमानुसार देण्यात आली आहे.

सभापती महोदय, आपले निर्णय असलेला सारसंग्रह मी सांगितला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हे शासन नव्याने आले आहे. 12 नोव्हेंबर 2014 रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी दोन्ही सभागृहांना उद्देशून अभिभाषण केले. हे अभिभाषण मंत्रिमंडळाच्या मान्यतेने तयार होते, तो मंत्रिमंडळाचा अधिकार असतो. प्रत्येक मुद्यांची मंत्रिमंडळात चर्चा होते. मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर माननीय राज्यपाल शासनाचे निर्णय किंवा धोरणात्मक पॉलिसी अभिभाषणात जाहीर करतात. याच अभिभाषणात 12 नोव्हेंबर, 2014 रोजी सात क्रमांकांच्या मद्यामध्ये असे नमूद केले आहे की, शासनाकडून केल्या जाणाऱ्या खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा अनिवार्य करण्यात येईल. माननीय राज्यपाल यांनी राज्य शासनाचा निर्णय सांगितला. कोणत्याही परिस्थितीत ई-निविदा सर्व प्रकारच्या खरेदीत पारदर्शकता आणण्यासाठी अनिवार्य करण्यात येतील. या मुद्यांची अवहेलना मंत्री महोदयांनी केली आहे. या अभिभाषणावर मुख्यमंत्री महोदयांनी आभाराचे भाषण केले होते, त्यावेळी तीन दिवसांचे अधिवेशन झाले होते. 15 डिसेंबर, 2014 रोजी मुख्यमंत्री महोदय नागपूर येथील अधिवेशनात म्हणाले होते की, त्यासंदर्भातील माझ्याकडे कायदेशीर इतिवृत्त आहे. आमचा कंत्राटदारांना विरोध नाही, परंतु कोणत्याही योजना कंत्राटदाराच्या फायद्याने पाहता कामा नये, कंत्राटदाराने एखादी योजना आणावयाची व निधी शिल्लक आहे म्हणून शेवटच्या आठ दिवसात लागू करावयाची किंवा पुरवठादाराकडे साहित्य शिल्लक आहे म्हणून शेवटच्या महिन्यात...अडथळा... मुख्यमंत्री महोदयांनी जे सांगितले आहे त्यातील मी एकच वाक्य वाचतो. आरसीचा प्राब्लेम आहे तो बंद करण्यात यावा.

महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी 17 डिसेंबर रोजी असे सांगितले होते की, बोलवा, बसवा, चर्चा करा हा प्रकार संपवा. चर्चा करायची असेल ती करा, टेंडर व नोकर भरती देखील ऑनलाईन करण्यात येईल. असा सरकारने धोरणात्मक निर्णय घेतला होता. असा

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

निर्णय घेतल्यावर सरकार किती कार्यक्षम आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणात त्यांनी जाहीर केले होते. मुख्यमंत्री महोदयांचा यासाठी पाठिंबा होता. आदरणीय ज्येष्ठ नेते मंत्री महोदय श्री.एकनाथराव खडसे साहेबांचा त्याला पाठिंबा Ö¸ü, 2014 ²ÆüÖêŸÖÖ. 18 ×›üÃÖë ÖÖÝÖÖ®Öê ³üÖê•Öß ÃÖÖ´ÖÖ®µÖ ¯ÖÏ¿ÖÖÃÖ®Ö ×¾Ö¸ Öß.†Ö¸ü. ÛúÖœü»ÖÖ ŸµÖÖ´Ö¬µÖê †ÃÖê ®Ö´Öæ¤ü Ûêú»Öê • ¹ÆüÖêŸÖê Ûúß, पये तीन लाखापेक्षा जास्त रकमेच्या कामासाठी ई-निविदा कार्यप्रणाली अनिवार्य करण्यात येईल. हा निर्णय झाल्यावर संविधानाचा प्रश्न निर्माण होतो. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब मंत्री महोदयांना रूल्स ऑफ बिझनेस बाचावयास शिकवा. घटनेच्या कलम 166 नुसार मुख्यमंत्री महोदयांचे काय अधिकारी आहेत, मंत्रिमंडळाचे काय अधिकार आहेत, मुख्य सचिवांना काय अधिकार आहेत, विविध विभागाच्या प्रधान सचिव व सचिवांना काय अधिकार आहेत हे घटनेच्या कलम 166 मध्ये नमूद केले आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

या कलमामधील परिशिष्ट 2, भाग 2, सर्वसाधारण 15(1) आणि त्याच्या भाग 2 मध्ये असे म्हटले आहे की, ज्या वेळेला एखादी पॉलिसी मॅटर किंवा महत्वाची प्रशासकीय बाब असते त्या वेळेला ती बाब मुख्यमंत्र्यांच्या आदेशार्थ सादर करणे मंत्र्यांना बंधनकारक आहे. रूल्स ऑफ बिझनेसमधील परिशिष्ट 2, भाग 2, सर्वसाधारण 15(1) आणि (2) मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशार्थ सादर करणे बंधनकारक आहे असे नमूद केलेले असल्यामुळे ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे सादर केली की नाही? मी विभागाच्या प्रधान सचिवांना समक्ष भेटलो आणि माहिती देण्यास सांगितले.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा सांगू इच्छितो. रूल्स ऑफ बिझनेसमधील परिशिष्ट 2 मधील 19 वा मुद्दा महत्वाचा आहे. ज्या योजनेमध्ये धोरणात्मक बदल आहे अशी योजना मंत्रिमंडळासमोर आणणे बंधनकारक आहे. ही जी खरेदी होती त्या संदर्भात माननीय राज्यपालांनी अभिभाषणात सांगितले होते की, ई टेंडरिंग आम्ही करणार आहोत. हे करणे अनिवार्य राहील. तुम्ही जीआर काढला आहे. मग ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांचा आदेश घेऊन मंत्रिमंडळासमोर का आली नाही? ज्यावेळेला राज्यपाल महोदयांचे अभिभाषण मंत्रिमंडळासमोर येते त्या वेळेला ते सर्व मंत्र्यांना अवगत असते. मंत्री महोदयांनी हेतुत:, बुध्दिपुरस्सर आणि जाणीवपूर्वक या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे, हे मी या सर्व अधिकृत कागदपत्रांवरुन सांगितले आहे. माननीय राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत. त्यांनी घेतलेला निर्णय शासनाचा निर्णय आहे. त्या निर्णयाची या ठिकाणी अवहेलना झालेली आहे.

सभापती महोदय, भारतीय राज्य घटनेच्या कलम 166 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांना आणि मंत्रिमंडळाला जे अधिकार दिलेले आहेत त्या अधिकाराची सुध्दा पायमल्ली झालेली आहे. या सभागृहाला अशा प्रकारे असत्य आणि दिशाभूल करणारी माहिती देऊन संशयास्पद व नियमबाह्य व्यवहारावर पांघरुण घालण्याचा जाणीवपूर्वक मंत्री महोदयांनी प्रयत्न केलेला आहे. म्हणून या सभागृहाचा सुध्दा अवमान झालेला आहे. 11 तारखेला महिला व बालविकास मंत्र्यांनी निधी वितरणाला मान्यता दिली आणि 13 तारखेला 24 आदेश निर्गमित झाले आहेत. मी त्या मेरिटमध्ये जात नाही. माझी सर्वच मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी रूल्स ऑफ बिझनेसचे वाचन करावे. दैनिक सामनामध्ये हेच लिहिले गेले आहे की, सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, मी नियम 240 अन्वये हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. नियम 243 अन्वये ही सूचना हक्कभंग समितीकडे न पाठविता सभागृहात त्यावर चर्चा घेण्याचा आपल्याला

...2...



श्री.शरद रणपिसे...

अधिकार आहे. तो निर्णय घेण्याचा अधिकार आपला आहे. मी आपल्या निर्णयाबद्दल काही बोलू इच्छित नाही. हा विषय अत्यंत गंभीर आहे. मी 555 कोटी रूपयांचा व्यवहार सांगितला आहे, ज्यामध्ये अनियमितता झालेली आहे. रेट कॉन्ट्रॅक्ट आणि रेट फिक्सेशन आहे. हा सगळा व्यवहार घटनात्मक दृष्टया बेकायदेशीर आणि नियमबाह्य ठरतो. म्हणून यावर आपण उचित निर्णय घ्यावा अशी आग्रहपूर्वक आणि नम्रतापूर्वक विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मला आपल्याला विचारावयाचे आहे की, एखादा विषय न्यायप्रविष्ट असताना त्यावर या ठिकाणी चर्चा करता येते का? हा विषय न्यायप्रविष्ट आहे. असे असताना अशा प्रकारे त्यावर चर्चा करता येते का? भ्रष्टाचाराचा आरोप केला म्हणजे भ्रष्टाचार झाला असे म्हणता येईल काय?......(अडथळा)....मला आपल्याकडून अपेक्षा आहे, यांच्याकडून नाही. 100 प्रकरणे माझ्यासमोर आहेत. रमेश कदमांसहित अन्य 100 प्रकरणे आहेत. मला आपल्याकडून जाणून घ्यायचे आहे की, न्यायप्रविष्ट बाब असताना त्याची सभागृहात चर्चा होऊ शकते का? भ्रष्टाचाराचा आरोप झाला म्हणजे भ्रष्टाचार केला असे म्हणता येईल का?.....(अडथळा)....

**सभापती** : माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री.एकनाथराव खडसे : तुमच्या सगळयांवर भ्रष्टाचाराचा आरोप आहे. हजारो कोटी रूपयांचा गैरव्यवहार आहे......(अडथळा)....आपल्याकडून मला निर्णयाची अपेक्षा आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : सर्वांनी शांतता पाळावी. मी निर्णय देत आहे. विधानपरिषद सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी माननीय नामदार श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे, महिला व बालविकास मंत्री यांच्याविरूध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना माझ्याकडे प्राप्त झालेली आहे. नैसर्गिक न्यायाच्या म्हणजे नॅचरल जस्टिसच्या तत्वानुसार सूचना ज्यांच्याविरूध्द देण्यात आली त्यांचे सूचनेबाबतचे म्हणणे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने या प्रकरणी एकूण वस्तुस्थिती स्पष्ट होण्याच्या दृष्टीने सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

माननीय मंत्री, महिला व बालविकास यांच्याकडे पाठवून सूचनेत उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने लेखी खुलासा मागविण्यात येईल.

...3...



**सभापती.....**

सभागृहाच्या माननीय नेत्यांनी कायदेशीर मुद्दा उपस्थित केला आहे, मॅटर सबज्युडिस असताना चर्चा होऊ शकते का? ही हक्कभंगाची सूचना आहे. यावर हक्कभंग होईल की नाही हे ठरविणे पहिले गरजेचे असल्यामुळे लेखी खुलासा मंत्री महोदयांनी द्यावा.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सदनाचे सन्माननीय नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी भाष्य करीत असताना माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांच्याबद्दल उल्लेख केला आहे. माननीय सदस्यांनी हक्कभंगाची सूचना मांडताना आपला मुद्दा व्यवस्थित मांडला आहे. त्या संदर्भात आपण सांगितले. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले की, सदस्यांवर कारवाई केली पाहिजे. चुकीचा विषय मांडतात. हे वक्तव्य कामकाजातून काढले पाहिजे. माननीय सदस्यांना आपला मुद्दा सदनामध्ये मांडण्याचा अधिकार नाही का?

**सभापती :** मी तपासून घेतो आणि आक्षेपार्ह असेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकले जाईल.

.....(गोंधळ)....

(मंत्री महोदय व विरोधी पक्षाचे माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सभागृहाच्या नेत्यांना माझी विनंती आहे, आपण ज्येष्ठ आहात, माझ्याकडे बघून बोलावे. मी पुढील कामकाज घेत आहे. आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

(मंत्री महोदय व विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी निर्णय घेत असताना हा विषय चर्चेला आला होता.

**सभापती** : माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(मंत्री महोदय व विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती :** माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

(मंत्री महोदय व विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

हे काय चालले आहे? मंत्री महोदयांनी उभे रहायचे, विरोधी पक्षनेत्यांनी उभे रहायचे, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी उभे रहायचे आणि मी देखील बोलण्यासाठी उभा आहे, हे बरोबर नाही. सर्वांनी खाली बसावे. मी निर्णय दिलेला आहे.

...4...



(गोंधळ)

आवश्यक असेल तर मी सगळे रेकॉर्ड तपासून घेतो असे सांगितले आहे. रेकॉर्ड तपासून आक्षेपार्ह वक्तव्य काढून टाकणार आहे. तो माझा अधिकार आहे. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

---

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

....(गोंधळ)....

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**सभापती :** आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. औचित्याचा मुद्दा मांडण्यापूर्वी मी सांगू इच्छिते की, आपण पंजाबमधील अतिरेकी हल्ल्याच्या संदर्भात जो श्रध्दांजलीचा ठराव मांडला त्या ठरावाला सभागृहाने दुःखद अंतःकरणाने पाठिंबा दिलेला आहे.

नंतर एन.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभागृहात कृपया शांतता ठेवावी. भारत-पकिस्तानच्या संदर्भातील अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. कॉमन वेल्थची पुढील बैठक पाकिस्तानमध्ये होणार आहे. आपण गुरुद्दासपूर येथे झालेल्या गोळीबारासंबंधातील ठराव केला आहे. त्यामुळे पाकिस्तान येथे होणाऱ्या कॉमन वेल्थच्या बैठकीला महाराष्ट्रामधून पूर्णपणाने न जाण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा अशी माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे.

माझा दुसरा औचित्याचा मुद्दा अगदी छोटा आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंनी काही नेत्यांच्या घरी जाऊन भेटी दिलेल्या आहेत. कायद्याने कोणी कोणाकडे जाऊ शकते तरी सुद्धा अप्रस्तुत स्वरुपाच्या ज्या भेटी असतात त्या संदर्भात मी माननीय राज्यपालांकडे निवेदन दिलेले आहे. विद्यापीठाच्या कुलगुरुंनी कोणत्या स्वरुपामध्ये औचित्य पाळावे किंवा कसे यासंबंधी त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे अशा प्रकारचा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

माझे दोन्ही औचित्याचे मुद्दे मांडताना शांतता राखल्याबद्दल मी सभागृहाचे देखील खास धन्यवाद मानते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याला दोन्ही सभागृहामध्ये समर्थन दिल्याचे आपण बघितलेले आहे. हा देशातील 126 कोटी जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा असा प्रश्न आहे. गुरुद्दासपूर येथे नुकतीच एक घटना घडली आहे. त्यामुळे भारत-पाकिस्तानचे सध्या असलेले संबंध याबाबत सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे एक महत्त्वाचा विषय उपस्थित केला आहे. पाकिस्तानमध्ये कॉमन वेल्थची बैठक होणार आहे. त्यामध्ये भारताच्या प्रतिनिधीने किंवा भारताच्या माननीय पंतप्रधानांनी किंवा तत्सम अधिकाऱ्यांनी अजिबात भाग घेऊ नये अशा भावना या संपूर्ण सभागृहाच्या आणि जनतेच्या आहेत हे मला मुद्दाम येथे सांगावयाचे आहे.

**सभापती :** आपण दोघांनी हा जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंबंधी माननीय लोकसभा अध्यक्षा श्रीमती सुमित्राताई महाजन यांनी आम्हा सर्वांना या विषयावर चर्चा करण्यासाठी 7 तारखेला बोलाविले आहे. या सदनातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी त्यांच्या कानावर घालीन आणि पुढील उचित कारवाई करीन.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना अर्धा मिनिटे बोलण्यासाठी अनुमती देत आहे. मी माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांना सांगू इच्छितो की, आपण विधान सभा सभागृहात बराच काळ घालविला आहे. आपण या सभागृहात पहिल्यांदाच येत आहात. त्यामुळे आपण देखील शांत रहावे. ... (अडथळा).... कोणाला काही बोलायचे आहे ते मला जोडून घेऊ द्यावे. आपण कसे काय ठरवित आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला वेगळा मुद्दा मांडावयाचा आहे. पाकिस्तानच्या विरोधात सदनातील सदस्यांच्या भावना आहेत. त्यासंबंधी मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर काल आपल्या व विधान सभेच्या सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांनी सह्या देऊन याकूब मेमन ची फाशी दूर टाळावी...... आपण या भावना कशा ओळखतात. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर याकूब मेमनची फाशी टाळावी यासाठी आपल्या सभागृहातील सदस्य व खालच्या सभागृहातील सदस्य सह्या देतात. हे कसे काय होते....?

**सभापती :** मी सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, आपला हा विषय बरोबर नाही. याचा आणि त्याचा काहीच संबंध नाही. हा विषय होऊ शकत नाही. हे रेकॉर्डवरून काढून टाकावे. आता मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांना त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडण्यास अनुमती देत आहे. श्री.गजभिये साहेबांनी बोलण्यास सुरूवात करावी. हा विषय मी रेकॉर्डवरून काढून टाकला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी बोलण्यास सुरूवात करावी.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मंत्री महोदय आपण देखील खाली बसावे. सगळ्यांनीच खाली बसावे.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतीय संविधानाने सवैधानिक तेजस्वी केलेल्या पवित्र मंदिराच्या गाभाऱ्यात आम्हाला बसताना अभिमान वाटतो. त्यामध्ये महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, बाळ गंगाधर टिळक व अन्य थोर पुरूषांची नावे घेणे सकल आयुष्य जगण्याचे समाधान आहे. महात्मा गांधी, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, बाळ गंगाधर टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू यांचे फोटो लोकशाहीच्या मंदिरात लावून थोर नेत्यांचा सन्मानच केला आहे. परंतु, छत्रपती शाहु महाराजांचा फोटो या पवित्र लोकशाही मंदिरात नाही. आरक्षणाचे जनक व देशाचा बहुमान असलेले छत्रपती शाहू महाराजांचा फोटो विधान परिषदेच्या सभागृहात लावण्यात यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील जे रेती व्यावसायिक आहेत त्यांच्या जवळ जवळ दीडशे-दोनशे वर्षे ताब्यात असलेली जमीन मॅरेथॉन बिल्डरच्या पर्यटनाच्या नावाच्या खाली घशात घालण्याची कार्यवाही आज सुरू आहे. ती कार्यवाही ताबडतोब थांबली पाहिजे. सन्माननीय महसूल मंत्री येथे उपस्थित आहेत. तीन ते चार पिढ्यांपासून रेती व्यावसायिक म्हणून जे काम करीत आहेत त्यांनाच पर्यटनाचा व्यवसाय करण्यास अनुमती द्यावी. सदर व्यवसाय करण्यास त्यांची अनुमती आहे. गेल्या आठवड्यात येथील पाच ते दहा हजार व्यावसायिक श्री.दशरथ पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली रस्त्यावर आले होते. तेव्हा यासंबंधातील उचित चर्चा आपण घडवून आणावी व तशा पद्धतीचे निदेश आपण शासनाला द्यावेत असा मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती :** अशाच एका मुद्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मागे चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी मी बैठक बोलवावी असे निदेश दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंबंधी आज दुपारी 4.00 वाजता बैठक मी बोलाविली आहे. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथ खडसे यांना मी या बैठकी विषयी सकाळीच अवगत केले आहे.

.......

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनासंबंधी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपण माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना जाणीव करून द्यावी की, ते आता विधान सभेचे सदस्य आहेत. विधान परिषदेचे नाहीत. ते कायद्याने बोलू शकतात याची मला जाणीव आहे. त्यामुळे त्यांनी आमच्या सभागृहात जास्त अतिक्रमण करू नये.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहात लोकशाहीवर जे अतिक्रमण होत आहे त्यावर मी बोलत आहे. माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन एवढाच आहे की, नियम 93 मध्ये निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाची बाबींवर चर्चा करण्याचे म्हटले आहे. आजची दुसरी नियम 93 अन्वयेची सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची आहे.

**सभापती :** आधी पहिली नियम 93 अन्वयेची सूचना होऊ द्यावी.

श्री.विनोद तावडे : नियम 93 अन्वये सूचनांच्या निवेदनावरील चर्चा होण्यापूर्वी मी माझा मुद्दा मांडला नाही तर आपणच म्हणाल की, तो आपण आधी का मांडला नाही. मी या 93 च्या सूचनेवरील निवेदनावर उत्तर देणार आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे .......

मी त्यावर उत्तर देणार आहे. माझी विनंती एवढीच आहे की, त्या संदर्भातील सर्व मुद्दे प्रश्नात आले आहेत, अर्धातास चर्चेमध्ये आले आहेत तसेच लक्षवेधी सूचनेमध्ये सुध्दा आले आहेत. यामध्ये निकडीचे काय आहे ? काही तरी नियमाला धरुन कामकाज करु एवढीच माझी विनंती आहे.

---

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** :हरसूल, जि.नाशिक येथील गोळीबारात एका तरुण आदिवासीचा मृत्यू होणे,वाशिम जिल्हयात दोन गटात दंगल उसळून एका युवकाचा मृत्यू होणे याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 12 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने मागील 15 दिवसात घडलेल्या 5 महत्वाच्या घटनेसंबंधी मी नियम 93 च्या निवेदनाद्वारे प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

**सभापती :** नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर एकच प्रश्न उपस्थित करावा.

श्री. धनंजय मुंडे : ठीक आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात या सभागृहात सविस्तर चर्चा होणार असल्यामुळे मी या 93 च्या निवेदनावर प्रश्न विचारुन सभागृहाचा फार वेळ घेणार नाही. नाशिक जिल्हयातील हरसूल येथील आदिवासी तरुणाचा दिनांक 7 जुलै, 2015 रोजी मृत्यू झाला. पोलिसांनी या संदर्भात वेळीच दखल न घेतल्यामुळे 8 दिवस हरसूल आणि त्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. सातत्याने 4 वेळा दंगलीची परिस्थिती निर्माण झाली. या दंगलीत पोलिसांच्या गोळीबारात एका आदिवासी तरुणाचा मृत्यू झाला. या आदिवासी तरुणाच्या मृत्युला पोलीस जबाबदार असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन कारवाई केली जाणार आहे काय ? हरसूलच्या दंगलीच्या घटनेबरोबरच वाशिम जिल्हयातील कारंजा येथे मुलीच्या छेडछाडीवरुन जी दंगल झाली त्या घटनेची सुध्दा न्यायालयीन चौकशी शासन करणार आहे काय ? पोलिसांच्या गोळीबारात मयत झालेल्या आदिवासी तरुणाच्या कुटुंबास केवळ 20 हजार रुपयाची मदत दिल्याची माहिती उत्तरात दिलेली आहे. या कुटुंबास मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून 5 लक्ष रुपयांची मदत सरकार देणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेल्या घटनेनुसार दि. 7 जुलै, 2015 रोजी हरसूल येथील दंगलीत पोलीस गोळीबारामध्ये आदिवासी तरुणाचा मृत्यू झाला. त्यासंदर्भात एसडीओच्या अंतर्गत दंडाधिकाऱ्यामार्फत चौकशी नेमण्यात आली आहे. या घटनेमध्ये जी काही दिरंगाई झाली व जी काही परिस्थिती उद्भवली त्या संदर्भात एपीआय श्री. किर्तीकर आणि एएसआय श्री.जाधव या दोघांनाही 24 जुलै, 2015 रोजी निलंबित करण्यात आले आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. हरसूलच्या दंगलीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. परंतु या घटनेसोबत मी वाशिम जिल्हयातील कारंजा येथील मुलीच्या छेडछाडीनंतर झालेल्या दंगलीच्या व

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे.....

घटनेच्या बाबतीतही मी प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. हरसूल येथील दंगलीमध्ये पोलिसांच्या गोळीबारात ज्या आदिवासी तरुणाचा मृत्यू झाला त्या संदर्भात शासनाने केवळ 20 हजार रुपये मदत दिली असून मुख्यमंत्री निधीतून आदिवासी तरुणाच्या कुटुंबाला 5 लाख रुपयांची मदत सरकार देणार काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, एसडीओच्या माध्यमातून यासंदर्भात चौकशी सुरु असून आदिवासी तरुणाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत देण्याच्या संदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आला असून सरकार यामध्ये निश्चितपणे सकारात्मक निर्णय करेल. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जि.वाशिम येथील कारंजाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्यासंदर्भात सुध्दा जी काही घटना घडली त्या घटनेच्या संदर्भात जे 31 आरोपी होते त्यापैकी 21 आरोपींची बेल झाली असून 10 आरोपींना एमसीआर झालेला आहे आणि जी घटना संचारबंदीच्या वेळी घडली त्यासंदर्भातील सर्व आरोपींना बेल मिळाली आहे. या दोन्ही घटनेच्या संदर्भात दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे आदेश पारित करण्यात आले असून यासंदर्भातील चौकशी एसडीओ मार्फत करण्यात येणार आहे. जो दलित तरुण गोळीबारामध्ये वारला, त्यासंदर्भात प्रस्ताव मागवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक तरतूद देण्यासंदर्भात सरकार सकारात्मक निर्णय घेईल.

---

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** :राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील हजारो शिक्षक गेल्या 10-12 वर्षापासून पगाराविना असणे या विषयाबाबत श्री.कपिल पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. विनोद तावडे ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 19 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय, मंत्री महोदयांना या निवेदनाच्या संदर्भात सूचना करावयाची आहे काय ?

श्री. विनोद तावडे : नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. या सभागृहात मंत्री महोदयांनी काय उत्तर द्यावयाचे, सरकारने काय उत्तर द्यावयाचे हा त्यांचा अधिकार असून त्याला माझी हरकत नाही. माझी हरकत ही आहे की, सभागृहामध्ये मंत्री महोदयांना असत्य निवेदन करता येणार नाही तसेच सभागृहाची दिशाभूल करता येणार नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांना एकच प्रश्न विचारता येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्यावर आक्षेप घेतला असता तर मी समजू शकेन. परंतु आपल्या निर्णयावर त्यांनी आक्षेप घेतला आहे. एकदा आम्ही नियम 93 अन्वयेची सूचना दिली आणि ती सूचना आपण स्वीकारुन त्यावर निर्णय देण्याचा निर्णय दिल्यानंतर मंत्र्यांनी त्या संदर्भात निवेदन करणे अपेक्षित असताना ही सूचना का स्वीकारली असा आक्षेप आपल्या संदर्भात घेतली असून ती गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, नियम 93 आणि 94 आणि 95 पाहिले तर या विषयाची गंभीरता किती आहे ते लक्षात येईल. नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंदर्भात मी 3 प्रश्न विचारले होते परंतु त्या प्रश्नाचे उत्तर कोठेही देण्यात आले नाही. अच्छे दिन येणार असल्यामुळे आझाद मैदानावर उपोषणाला बसलेल्या शिक्षकांना काही न देता विपरीत आणि चुकीचे उत्तर दिले आहे. चुकीच्या उत्तरालाच माझी हरकत आहे. या विषयाच्या संदर्भात उत्तर देण्यात आले आहे की, खाजगी शैक्षणिक संस्थाच्या शाळांची भौतिक जबाबदारी पूर्ण करण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे. इयत्ता पहिली ते आठवीची जबाबदारी राज्य शासनाची आहे, असा कायदा सांगतो. मी विचारलेल्या प्रश्नाला चुकीचे उत्तर देण्यात आले आहे.

**सभापती :** आपण जी हरकत घेतलेली आहे,त्या मुद्याच्या संदर्भात मीच निर्णय घेतो. आपली एकंदरित जी काही डेव्हलपमेंट चालली आहे, त्यासंदर्भात मी निर्णयाप्रत आलो आहे. नियम 96 च्या माध्यमातून या विषयावर आपण चर्चा उपस्थित केली तर मी त्याला परवानगी देईन. या चर्चेला सन्माननीय मंत्री उत्तर देतील.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : महाराष्ट्र लोकसेवा अरायोगाकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात भरती प्रक्रियेद्वारे पदे भरण्यास विलंब होणे याबाबत श्री.प्रकाश गजभिये,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 37 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, सहयोगी प्राध्यापक या पदाच्या 82 जागा व सर्व वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यपकांच्या 32 जागा भरावयाच्या होत्या. या सर्व जागा महाराष्ट्र पब्लीक सर्व्हीस कमिशनच्या माध्यमातून भरावयाच्या होत्या. या संदर्भात सरकारने दिनांक 15 जुलै, 2014 रोजी एक जीआर काढला व त्यानुसार एक मंडळ स्थापन करण्यात आले परंतु ते नियमबाह्य आहे. त्यामध्ये प्रायव्हेट अभिमत विद्यापीठाच्या वतीने त्यांना अधिकृत करण्यात आले व त्यांच्या माध्यमातून भरती करण्यात आली. सदरची भरती नियमबाह्य असून त्या ठिकाणी सेक्रेटरी मेडीकल एज्युकेशन व सामाजिक न्याय विभागातील सह सचिव अशा सात सदस्यांची कमिटी होती.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये...

जी नियमबाह्य भरती झालेली आहे ती रद्द करण्यात येईल काय, तसेच ही सर्व पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील काय, या पदांवर नियुक्ती दिलेली नसल्यामुळे, ही नियुक्ती रद्द करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांचा काही दोष नाही कारण त्यांना काहीजण या प्रकरणाची एक बाजू सांगत आहेत. आपण एमपीएससीमधून ही पदे बाहेर काढली कारण आपल्या 500 मेडिकलच्या जागा जात होत्या. डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत सभागृहात मागणी झाली. त्यानुसार तीन वर्षापूर्वी तत्कालीन मंत्री श्री.सुरेश शेट्टी व डॉ.विजयकुमार गावित यांनी हा निर्णय घेतला होता. आपल्यासारख्या साध्या व सज्जन माणसाला काहीजण गुमराह करीत आहेत. यामध्ये अजिबात राजकारण नाही. विधिमंडळ सदस्यांची गरिमा कमी होऊ नये म्हणून मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी अशा लोकांना इंटरटेन करु नये. जर काही चुकले असेल तर आपण त्यामध्ये सुधारणा करु. शासकीय सेवेत 82 टक्के डॉक्टर्स झाले. आपल्याकडे जे दोघेजण आले ते हॉस्पीटल सोडून गावभर हिंडत आहेत. आम्ही मेरीटवर ही भरती केलेली आहे. पॅनलद्वारे ही परीक्षा घेण्यात आली होती. पॅनेलसमोर उमेदवार मुलाखत देत होते. आपण उमेदवारांना टोकन नंबर दिले होते, उमेदवार आपला टोकन नंबर त्यांना सांगायचा. आपल्या 500 जागा वाचविण्यासाठी ही पारदर्शक प्रोसेस केली. ज्यांची निवड झाली नाही त्यांनी सर्व प्रकारचा दबाव आणून पाहिला. पेपरमध्ये बातम्या छापून देखील काही झाले नाही म्हणून सभागृहात हा मुद्दा मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी अशा लोकांना इंटरटेन करु नये. जे योग्य असेल तेथे इंटरटेन करावे, अशा प्रकरणामध्ये आम्ही 100 टक्के आपल्या पाठिशी राहू.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : बीड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानातील कामांबाबत जिल्ह्यात अनेक तक्रारी दाखल होऊन देखील त्याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय आणि कामाच्या दर्जाबाबतचा गंभीर प्रश्न निर्माण होणे याबाबत श्री.अमरसिंह पंडित,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्रीमती पंकजा मुंडे ( ग्रामविकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 16 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरूस्ती करु इच्छिते. निवेदनातील पहिल्या परिच्छेदामध्ये "193 सिमेंट बंधारे मंजूर आहेत असा उल्लेख आहे त्याऐवजी "...293 सिमेंट बंधारे मंजूर आहेत असे कृपया वाचावे.

**सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी एक विशिष्ट तक्रार केली होती. निवेदनात नमूद केलेले आहे की, बंधाऱ्यामध्ये दगड भरलेले होते. आरसीसीचे काम झालेले नाही. दगड काढून बंधारा स्वच्छ करुन पुढील काम कंत्राटदाराकडून करण्यात आले आहे. पुढे असेही नमूद केलेले आहे की, यामध्ये कोणतेही गैरकाम झालेले नाही. बंधाऱ्यामध्ये दगड भरण्याचा प्रकार यापूर्वी कधी झालेला नाही. माझा प्रश्न आहे की, संबंधितांविरुध्द शासन कारवाई करणार काय ? ज्यांनी काम केलेले आहे तीच यंत्रणा चौकशी अधिकारी म्हणून नेमातात. तेव्हा आयुक्त स्तरावरील सक्षम अधिकाऱ्यामार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मौजे दिमाखवाडी, ता.गेवराई जिल्हा बीड येथील एका स्पेसिफीक कामाबाबत तक्रार केलेली आहे. त्या संदर्भात दिलेल्या निवेदनावर मी कायम आहे. या बंधाऱ्याचे काम सुरु असताना दिनांक 14 जूनच्या आसपास पाऊस पडला, त्यामुळे ते काम काही दिवसांसाठी बंद राहिले. त्या कालावधीत काही अज्ञात इसमांनी त्या बंधाऱ्यामध्ये दगड टाकले ही बाब खरी आहे. (अडथळा).. तक्रारीच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी लगेच ॲक्शन घेतलेली आहे. अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन गावकऱ्यांच्या साक्षीने तो बंधारा स्वच्छ करुन काम पूर्ण केलेले आहे. तक्रारीच्या संदर्भात गावकऱ्यांसमोर पंचनामा केलेला आहे. अधिकाऱ्यांनी जी ॲक्शन घेतलेली आहे त्याबाबत गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे त्यांच्या सह्यांचे पत्र माझ्याकडे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे की, आयुक्त स्तरावरुन या प्रकरणाची फेर तपासणी करुन अहवाल सादर करावा.

-------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : उप जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मग्रारोहयो अंतर्गत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी देऊनही प्रकरणाची चौकशी न होणे तसेच दुष्काळी जिल्ह्यात योजनेच्या कामाचा बोजवारा होऊन मजुरांचा गंभीर प्रश्न निर्माण होणे याबाबत श्री. अमरसिंह पंडित,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्रीमती पंकजा मुंडे ( रोजगार हमी योजना मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 9 सभागृहाच्या पटलावर ठेवते

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मग्रारोहयोत गैरकारभार झालेला आहे. मग ते भूमिगत बंधाऱ्याचे असो, रस्त्याचे काम असो या सर्व कामांत गैरकारभार झालेला आहे. या सर्व कामांची चौकशी करण्यासाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. परंतु ज्या अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे त्याच्यावर हे सर्व आरोप आहेत. बीडचे उप जिल्हाधिकारी, मग्रारोहयो श्री.देशमुख यांच्यावर हे आरोप आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातून हे आदेश निघाले आहेत. बीड जिल्हाधिकारी कार्यालय हे भ्रष्टाचाराचे एक कुरण झालेले आहे. मी अतिशय जबाबदारीने सांगत आहे. काही मर्यादित कामांना मंजुरी देण्यात येते. ग्राम पंचायत आणि पंचायत समितीला विश्वासात न घेता कामांना मंजुरी दिली जाते. उप जिल्हाधिकारी कार्यालयात थेट येणाऱ्या माणासाला त्यांने सायंकाळी चिरीमिरी दिली की त्याच्या कामांना मंजुरी दिली जाते. आम्ही भूमिगत बंधाऱ्याच्या कामाची मागणी करीत असताना देखील त्या कामांना मंजुरी देण्यात आली नाही. वास्तविक पाहता आयुक्तांनी सूचना दिल्या होत्या. बीड जिल्ह्यात एमआरईजीएसची सन 2013-2014 आणि सन 2014-2015 या वर्षात झालेल्या कामांची चौकशी उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल काय ? कारण ज्या अधिकाऱ्याकडे चौकशी दिलेली आहे तो अधिकारी स्वतः त्या प्रकरणामध्ये गुंतलेला आहे आणि त्या अधिकाऱ्याकडून चौकशी करणे चुकीचे होईल. जिल्हाधिकारी कार्यालयात एजंट झालेले आहेत. एकेका एजंटाकडे 30-40 कोटी रुपयांची कामे आहेत. असे दहा-बारा एजंट जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये फिरत आहेत. तेव्हा माझी मागणी आहे की, आपण ज्या एजन्सीच्या माध्यमातून चौकशी करीत आहात ती चुकीची पद्धत आहे. या प्रकरणाची चौकशी आयुक्त स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत किंवा सचिव स्तरावरील अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यतील सर्वच कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत किंवा त्या कामांबद्दल असमाधान आहे असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. सन्माननीय सदस्यांनी सूचनेमध्ये ज्या कामाचा उल्लेख केलेला आहे त्या कामाची चौकशी झालेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी एमआरईजीएस आणि विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यामार्फत ही चौकशी होत आहे. जर त्यामध्ये कुठेही चूक आढळून आली तर संबंधितांवर कारवाई होईल. सन्माननीय सदस्यांनी भूमिगत बंधाऱ्याबद्दल प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सांगू

..6.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे..

इच्छिते की, त्याबाबत टेक्निकल व्हेरिफीकेशन करुन भूमिगत बंधाऱ्याची परवानगी देण्यात येईल. ज्या पद्धतीने परवानगी दिली जात आहे त्याप्रमाणे कामांची संख्या आहे आणि त्याबद्दलचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले आहे. जिल्हयामध्ये फक्त 137 विहिरींचे प्रस्ताव अपूर्ण आहेत त्याऐवजी 107 विहिरींचे प्रस्ताव अपूर्ण आहेत एवढी मी दुरूस्ती करु इच्छिते. ही चौकशी आयुक्त स्तरावरील अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर होत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय कामांच्या संदर्भात सांगत आहेत. माझा चौकशी संदर्भातील प्रश्न आहे. जे उप जिल्हाधिकारी स्वतः चौकशीच्या फेऱ्यामध्ये आहेत त्यांची उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे असे मंत्री महोदया सांगत आहेत....

**सभापती** :माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या प्रकरणाची चौकशी उप मुख्य कार्यकारी अधिकारी करीत आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांचा आक्षेप लक्षात घेऊन मंत्री महोदया सांगत आहेत की, आयुक्त पातळीवरुन ही चौकशी करण्यात येईल. तशी चौकशी मंत्री महोदयांनी करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरात उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आयुक्तांचा उल्लेख केला.

**सभापती** : मी स्वतःच निदेश दिले की, या संदर्भातील चौकशी आयुक्त स्तरावरुन करावी.

-------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात मुलींचा जन्म दर वाढविण्यासाठी 'सुकन्या योजना' प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता, याबाबत श्री.दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बाल विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 22 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, राज्यात मुलींच्या जन्माचा दर कमी होत होता. सांगोला तालुक्यात मुलींच्या जन्म दराचे प्रमाण कमी होते. त्यामुळे 2014 मध्ये राज्य सरकारने 'सुकन्या योजना' सुरु केली. या योजनेची अंमलबजावण्ी शासकीय पातळीवर योग्यप्रकारे करणे गरजेचे होते. परंतु अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे त्या योजनेची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही, अशा प्रकारच्या तक्रारी राज्यात अनेक ठिकाणी आल्या होत्या. सोलापूर जिल्ह्यातील जवळजवळ 186 लाभार्थ्यांची प्रकरणे मंजुरीअभावी पडून आहेत. परंतु वर्षभराच्या कालावधीत दुर्दैवाने एकाही प्रस्तावाला मंजुरी मिळाली नाही हे खरे आहे काय ? तसेच राज्यात सुकन्या योजने अंतर्गत किती लाभार्थ्यांना लाभ दिला आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, दिनांक 1 जानेवारी, 2014 पासून सुकन्या योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत जवळपास 20,455 लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे. यापोटी 43 कोटी रुपये खर्च झाला असून, प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत 40 कोटी रुपये पोहचलेले आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये सुध्दा जवळपास 945 लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ देण्यासंदर्भातील प्रस्ताव उपायुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

--------

**सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांच्या सूचना क्रमांक-20 वरील निवेदनावर चर्चा होईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझ्या सूचनेचे निवेदन मला प्राप्त झालेले नाही. मागच्या वेळी सुध्दा मी हीच तक्रार केली होती.

**सभापती** : आपल्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : महसूल अधिकारी व पुरवठा अधिकारी वाद आणि रेशन दुकानदारांचा संप यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था कोलमडलेली असणे, याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त व नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 20 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मध्यंतरी नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे धान्य घोटाळा झाला होता. त्या घोटाळ्याप्रकरणी महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांवर कारवाई झाली होती. त्यामुळे धान्य पुरवठ्याच्या बाबतीत त्या ठिकाणी अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. परिणामी, नाशिक जिल्ह्यात साधारणत: दीड लाख क्विंटल धान्य पडून होते. त्या काळात अनेक बीपीएल धारकांपर्यंत धान्य पोहचू शकले नाही. त्यामुळे दरम्यानच्या कालखंडात लोकांना धान्य मिळाले नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, उक्त कालावधीतील संपूर्ण धान्य आजच्या घडीला वितरित झाले आहे याची खात्री सरकारने केली आहे काय, तसेच अशा प्रकारची परिस्थिती वारंवार निर्माण झाली तर आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन अगोदरच योग्य ती उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हा बहिष्कार दिनांक 20 मे 2015 पासून सुरु झाला आणि दिनांक 2 जून, 2015 रोजी संपुष्टात आला. आता या संदर्भात कोणताही बहिष्कार नाही. मे-2015 या महिन्यासाठीच्या पारित नियतनास मुदतवाढ देण्यात आली आणि त्याची उचल पूर्ण झाली आहे. एक गोष्ट खरी आहे की, हे राज्य सरकार बीपीएल, अंत्योदय आणि अन्नपूर्णा कुटुंबांच्या बाबतीत अतिशय गंभीर आहे. स्वातंत्र्यानंतर हजारो-लाखो कुटुंबे अशी आहेत की, ज्यांना आजही धान्य द्यावे लागते. याचे दु:ख सरकार म्हणून आम्हाला आहे. धान्य चोरीचे प्रकार थांबविण्यासाठी किंवा यातील गैरव्यवहार करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी त्यांना एमपीडीए लागू करण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. तसेच बायोमेट्रिक पध्दत विकसित करण्याचा सुध्दा निर्णय घेतला आहे. धान्य पुरवठा नियमित व्हावा यासाठी सुध्दा संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत. या शिवाय केरोसीन आणि धान्य हे संबंधित कुटुंबांपर्यंत पोहचविण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या समितीच्या माध्यमातून या संदर्भातील त्रुटी वा दोष त्वरित दूर करता येतील.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अंबरनाथ येथील एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी मे.रिलायबल कंपनीला नियम धाब्यावर बसवून जागा दिल्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान होणे, याा बाबत श्री.धनंजय मुंडे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुभाष देसाई ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-23 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मे.रिलायबल कंपनीला अंबरनाथ एमआयडीसी क्षेत्रात नियमबाह्य पध्दतीने 3 लाख चौरस मीटरचा सुमारे 75 एकरचा भूखंड वाटप केल्याबाबतची माझी सूचना आहे. महोदय, सदरहू कंपनीच्या कार्यपध्दतीचे अवलोकन केले असता, या कंपनीकडून एमआयडीसी च्या माध्यमातून अथवा इतर प्रकारे, एमआयडीसीतील भूखंड प्राप्त करावयाचा आणि तो गरजू लोकांना डिव्हाईड करुन दामदुप्पटीने विकून मधल्या मध्ये नफा कमविला जात होता. अशा प्रकारची कार्यपध्दती या प्रकरणामध्ये दिसून येते. महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रकरणी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाला लेटर ऑफ कम्फर्ट दिले आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, लेटर ऑफ कम्फर्टला शासन स्थगिती देणार काय, ते रद्द करणार काय आणि या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ? सभापती महोदय, महामंडळामार्फत अशाप्रकारे भूखंड वाटप होत असताना अनेक अनियमितता झाल्याचे आढळून येते. गरजू उद्योजकांना भूखंड मिळत नाही, मात्र धनदांडगे लोक अधिकाऱ्यांशी संगनमत साधून नियमबाह्यरित्या अनेक भूखंड प्राप्त करुन घेतात. त्यामुळे एमआयडीसीच्या भूखंड वाटपाच्या प्रक्रियेवर शासन लक्ष ठेवणार काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने सांगतो की, रिलायबल कंपनीने डिसेंबर-2013 मध्ये भूखंडासाठी अर्ज केला होता. तत्कालीन उद्योग मंत्र्यांनी तो अर्ज एमआयडीसीकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला होता. त्यानंतर त्यांना नोव्हेंबर-2014 मध्ये इरादा पत्र देण्यात आले. त्यांच्याकडून 5 टक्के रक्कम घेण्यात आली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दुसरा प्रश्न विचारला की, या कंपनीने अनेक उद्योजकांचे रिकामे भूखंड ताब्यात घेऊन व त्यांचे तुकडे पाडून, ते इतरांना विकल्याची दोन-तीन प्रकरणे घडल्याचे रेकॉर्डवर आहे. पीएल-4 आणि पीएल-5 बाबतचा पहिला प्रश्न आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाला आम्ही स्थगिती देत आहोत. या सर्व प्रकरणांची..... 2007 ते 2014 या कालावधीत रिलायबल इन्फ्रा कंपनीने दुसऱ्यांना दिलेले भूखंड ताब्यात घेऊन व त्यांचे तुकडे पाडून ते इतरांना विकलेल्या प्रकरणांची चौकशी करुन, चौकशीत जे सत्य आढळून



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई....

येईल त्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी शेवटी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की, एमआयडीसी कडून वितरित करण्यात आलेल्या भूखंड वाटप प्रक्रियेवर शासनाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येईल.

--------

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : दिनांक 18 ऑगस्ट, 2004 रोजीच्या शासन निर्णयानुसार अपंगांच्या शाळा व कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध निश्चित करुनही त्याची अंमलबजावणी न होणे, या बाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 18 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शासनाने दिनांक 18 ऑगस्ट, 2004 मध्ये शासन निर्णय निर्गमित केला होता. मात्र त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे जुन्या अपंग शाळेतील रिक्त झालेल्या शिक्षकांच्या पदांना शासनाची प्रत्यक्ष मान्यता मिळाली नाही. मी विचारु इच्छितो की, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्यासाठी संस्था चालकांना उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल कराव्या लागल्या, हे खरे आहे काय ? जे संस्था चालक न्यायालयात गेले त्या संस्थेतील पदे भरण्यासाठी दिनांक 18 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी असे आदेश न्यायालयाने दिल्यानंतर, त्या संस्थेतील पद भरतीला शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता हाच निर्णय राज्यातील सर्व अपंग शाळांच्या बाबतीत लागू असणे अपेक्षित आहे. काही संस्था न्यायालयात गेल्यानंतर त्यांच्या बाबतीत न्यायालयाने निर्णय दिला आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

काही संस्था गेल्या नाहीत. त्यामुळे तोच निर्णय न्यायालयाचा आदेश समजून शासन पाळणार आहे का ? प्रत्येक संस्थाचालकाने न्यायालयात जाऊन पदभरतीला मान्यता घेण्यापेक्षा, ज्या अपंग शाळांच्या पदभरतीस मान्यता देण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत त्यास शासन तत्काळ मंजुरी देणार आहे का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, दिनांक 18/08/2004 या तारखेला आकृतीबंधाला मंजुरी देण्यात आली हाती. नवीन व जुन्या शाळांना हा नियम लागू करण्यात आलेला असताना देखील आजतागायत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. परंतु या संदर्भात येत्या 15 ऑगस्टच्या अगोदर राज्यातील सर्व अंपग शाळांचे संस्थांचालक, शासकीय अधिकारी या सर्वांची बैठक घेऊन ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे पदांना मान्यता देण्याची आवश्यकता आहे किंवा जी पदे अतिरिक्त ठरविण्यात आली आहेत त्या संदर्भात 10 ऑगस्टपूर्वी निर्णय घेण्यात येईल.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील शासकीय-निमशासकीय अनुदानित संस्थेतील ओबीसी कर्मचाऱ्यांसाठी नॉन-क्रिमीलेअरची मर्यादा रूपये 6 लाख असणे, तथापि, शिष्यवृत्तीसाठी 4.5 लाख रूपयांची असलेली मर्यादा रूपये 6 लाख करण्याकरिता अद्याप शासन निर्णय निर्गमित करण्यात न येणे याबाबत डॉ. सुधीर तांबे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 10 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यात शासकीय-निमशासकीय कर्मचारी आहेत, त्यांना नॉन-क्रिमीलेअरची मर्यादा आहे. माननीय मंत्र्यांनी याच सभागृहात आश्वासन दिले होते की, जूनमध्ये त्यासंबंधीचा शासन निर्णय जाहीर करण्यात येईल. मात्र तो निर्णय अद्यापही झालेला नाही. त्यामुळे पालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यांना पूर्ण फी भरावी लागत आहे. केंद्र शासनाने जी मर्यादा मान्य केली आहे ती राज्य शासनाने मान्य करावी असा शासन निर्णय आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण हा निर्णय तातडीने लागू करणार का आणि तो लागू होईपर्यंत ज्यांनी यापूर्वी अशाप्रकारे प्रवेश घेतला आहे त्यांना त्या सवलती चालू ठेवणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सदर बाबतीत 4 लाख रूपयांवरून 6 लाख रूपये एवढी मर्यादा वाढविण्याच्या संदर्भातील निर्णय शासन लवकरच घेत आहे. येणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्येच याचा निर्णय होईल. या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे त्यांना हा निर्णय लागू असेल.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : कळंबोली (जि.रायगड) येथील लोखंड व पोलाद बाजारातील प्लॉट क्र. एन. 328 मधील गोदामावर टाकलेल्या धाडीमध्ये बेकायदा धान्य साठा आढळणे.

**मु.शी.** : कळंबोली (जि.रायगड) येथील लोखंड व पोलाद बाजारातील प्लॉट क्र. एन. 328 मधील गोदामावर टाकलेल्या धाडीमध्ये बेकायदा धान्य साठा आढळणे यासंबंधी सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, विजय सावंत, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आशिया खंडातील सर्वात मोठ्या गणल्या जाणाऱ्या कंळबोली (जि.रायगड) लोखंड व पोलाद बाजारातील प्लॉट क्र. एन. 328 मधील गोदामावर पनवेलचे तहसिलदार यांनी दिनांक 24 एप्रिल, 2015 वा त्या सुमारास आपल्या सहकाऱ्यांसमवेत धाड टाकून गोदामात बेकायदा साठवलेला 80 गोणी तांदूळ, 112 गोणी गहू व एक तीनचाकी टेम्पो जप्त करुन गोदामाला सील ठोकणे, सदर तांदूळ व गव्हाच्या गोण्यांवर भारत सरकारचा छाप असणे, सदर प्रकरणी कंळबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे व याप्रकरणी पोलीसांनी एका आरोपीला चौकशीसाठी ताब्यात घेणे, या घटनेमुळे लोखंड व पोलाद बाजारात एकच खळबळ उडाली असून अशाच प्रकारे संपूर्ण लोखंड बाजाराचे शासनाने स्टिंग ऑपरेशन केले तर अनेक वस्तूंचा बेकायदा साठा मिळण्याची शक्यता दर्शविली जाणे, या गंभीर प्रकरणी अन्न व नागरी पुरवठा विभागाने मौन धारण करुन कोणत्याही प्रकारची गंभीर दखल न घेणे, सबब या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, गोदामात असलेले धान्य टेम्पोमध्ये दाखविले गेले आहे. केवळ गोदाम ज्याच्या मालकीचे आहे, त्याच्यावर कारवाई होऊ नये, संबंधित गोदाम किपरवर कारवाई होऊ नये म्हणून बोगसरित्या तेथे टेम्पो उभा करून पंचनामा करण्यात आला आहे. सदर प्रकरणाची उच्च पातळीवर चौकशी होईल का ? कळंबोली स्टील मार्केट हे आशिया खंडातील सर्वात मोठे आहे, यामध्ये धान्य गोदाम कुठे ठेवत आहेत ? पर्यावरणाच्या दृष्टीने हे गैर आहे. मी संबंधित माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेबांबरोबर चर्चा केली आणि त्यांनी मान्य केले होते. दुर्दैवाने ते आज सभागृहात नाहीत. माझी मागणी आहे. ते धान्य गोदाम कळंबोली येथून इतरत्र हलविले जाईल का ?

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे तहसीलदाराने धाड टाकली, तेथे मिळालेले धान्य कोणत्या रेशन दुकानाचे होते, कोणत्या गोदामातून आले होते याची चौकशी शासन करेल का ? गोदामातील धान्य टेम्पोमध्ये असल्याचे दाखवून गोदाम मालकाला संरक्षण देण्याचे धोरण अधिकाऱ्यांमार्फत राबविले गेले आहे, त्याची सुध्दा चौकशी शासन करेल का ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, कोणत्याही पध्दतीचा गैरव्यवहार हे शासन खपवून घेणार नाही, मग ते अन्नधान्याचा असेल किंवा कोणत्याही विषयाचा असेल. मी सांगू इच्छितो की, या गुन्ह्यामध्ये 8 जणांवर केस दाखल केली आहे. इतकेच नव्हे तर यापैकी अनेकांना पीसीआर घेण्यात आला आहे, एमसीआर घेण्यात आला आहे. आताही या संदर्भातील गुन्ह्यात त्यांची चौकशी सुरू आहे. 8 जणांपैकी एक 11 दिवसांच्या एमसीआरमध्ये होता. 3 दिवस, 1 दिवस, 5 दिवस, 4 दिवस, 2 दिवस असा एमसीआर होता आणि याचा अर्थ गुन्हेगारांना पोलीस विभागाने अटक केल्यानंतर त्यांच्याकडून यांची पूर्ण चौकशी करण्याचा प्रयत्न झाला आहे. 1955 च्या कलम 3 व 7 अन्वये गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी लोखंड व पोलाद बाजारातील गोडाऊनच्या संदर्भात सूचना मांडली आहे. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेबांशी चर्चा झाली असेही त्यांनी भाष्य केले आहे. या संदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल.

**सभापती** : सदर संस्थेत सर्वच दुष्काळी आणि डोंगरी भागातील माथाडी कामगार कामाला आहेत. माझ्या स्वतःच्या भागातीलही आहेत. सन्माननीय सदस्यांनी एक सूचना केली की, कळंबोली



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

येथील हा बाजार हलवावा. परंतु बाजार हलविण्याच्या अगोदर .... हा विषय माझा नाही. परंतु मी एक संधी घेतो. शेवटी मी आमदार होतो आणि आहे. त्यामुळे एखाद्या प्रश्नाची व्याप्ती कशी वाढवावी ही कला मी या सर्व लोकांकडून सुरूवातीपासून बऱ्यापैकी आत्मसात केली आहे. माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, आपण माननीय पणन मंत्र्यांच्या बरोबर या संदर्भात एखादी बैठक आयोजित करावी. ज्या सुविधा तेथे दिल्या पाहिजेत, त्या सुविधा तेथे मिळत नाहीत, असा हा विषय आहे. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात तेवढी बैठक आयेजित करावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, आपण बैठकीची तारीख निश्चित करावी. आपण तारीख ठरवाल त्या दिवशी या संदर्भात बैठक घेण्यास तयार आहोत.

**सभापती** : आभारी आहे.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, माझा आपल्याला विवक्षित प्रश्न असा आहे की, जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत अटक केलेले 8 आरोपी कोण आहेत, कामगार आहेत की, मालक आहेत की, मॅनेजर आहेत, जप्त केलेला माल कोणत्या शासकीय गोदामातून वितरित केला आहे व कोणी उचलला आहे ? परवा अधिवेशन संपत आहे. माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सभापती महोदय, शासनाने आमदारांना ध्वजारोहणाचे अधिकार दिले होते, त्याचे परिपत्रक निघाले. परंतु ते फक्त 1 मे या दिनाकरिता निघाले होते. लोकप्रतिनिधींच्या बाबतीत एवढी अनास्था का आहे ? 15 ऑगस्ट दिवस आला, 26 जानेवारी दिवस आला. आपण या संदर्भात एक काही तरी करावे, नाही तर, आता पुन्हा 15 ऑगस्टसाठी एक परिपत्रक काढायचे तर ते फक्त 15 ऑगस्टपुरते राहील. सदनाच्या दृष्टीने या संदर्भात सांगावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी एका प्रश्नावरून अनेक प्रश्न विचारले आहेत. माननीय मंत्र्यांनी उचित कार्यवाही करावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, ध्वजारोहणाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमध्ये येत नाही. मी आता त्याचे उत्तर देऊ शकणार नाही. आपण व्यक्तिगत भेटावे, त्या संदर्भात नेमके काय करता येईल ते बघण्यात येईल.

..8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जे अधिकारी/कर्मचारी अटक झाले, त्यांचा दर्जा काय होता आणि आज ते कामावर आहेत का ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, शासकीय अधिकारी/कर्मचारी अटक झालेले नाहीत. 8 आरोपी होते, त्यामध्ये हकिममुल्ला हबिमुल्ला मलिक, झुजेर चित्तलवाला, अन्वर मलिक, उद्धव गायकवाड, बाळू मोरे, विठ्ठल गायकवाड, गंगाधर मुंडे, प्रदिप आनंदराव भुसाळे हे यामधील आरोपी आहेत. तहसीलदार, पनवेल यांनी छापा मारल्यावर या 8 आरोपींना अटक केली आहे. आरोपींच्या संदर्भातील पोलीस कारवाई सुरूआहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे धान्य कोठून आले, रेशन दुकानातून आले की गोडाऊनमधून आले, याचा मूळ तपास झाला पाहिजे. धान्य शासनाचे आहे, ज्या गोणी मिळाल्या त्यावर शासनाचा ठप्पा आहे. जेथून चोरी झाली, माल आणला गेला त्याची चौकशी शासन करेल का ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, त्याची चौकशी पोलीस विभागाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. धान्याची विल्हेवाट तर शासनाने लावली. कारण ते धान्य सरकारी होते, ते जप्त करण्यात आले. पण हे धान्य कोठून आले याचा तपास पोलीस विभागाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. गुन्हा दाखल झाला आहे, एफआयआर दाखल झाला आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***रिलायन्स कंपनीने परवानगी न घेता पुणे महानगरपालिका क्षेत्रात केलेल्या खोदकामामुळे नागरिकांना त्रास होणे***

**मु.शी.** : ***रिलायन्स कंपनीने परवानगी न घेता पुणे महानगरपालिका क्षेत्रात केलेल्या खोदकामामुळे नागरिकांना त्रास होणे*** यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे महानगरपालिका क्षेत्रात भूमिगत केबल टाकण्यासाठी खोदकाम करण्यासाठी परवानगी न घेता रिलायन्स कंपनीने पुणे येथील बहुतांशी रस्त्यावर मोठया प्रमाणात विना परवाना खोदकाम केले या खोदकामांमुळे शहरातील नागरिकांना प्रामुख्याने आबालवृध्दांना त्रास होत असून या रस्त्यावरील ये-जा करणाऱ्या वाहनांच्या छोट्या मोठ्या अपघातांच्या घटनात वाढ होत असल्याचे माहे 2015 मध्ये निदर्शनास येणे, संबंधित कंपनीवर दंडाची आकारणी करण्यात येऊनही कंपनीने दंडाची रक्कम न भरणे, त्यामुळे उक्त कंपनी बिनदिक्कतपणे खोदकाम करीत असल्याचेही निदर्शनास येणे, याबाबत त्वरीत चौकशी करुन संबंधित कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्याची व कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात सांगितले आहे की, रिलायन्स इन्फ्रा या कंपनीकडून अडीच कोटी रूपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. आजच महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात आले आहे की, एका नागरिकाने मुंबई येथे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. रिलायन्स इंन्फ्रा या कंपनीसहित भारती एअरटेल, व्होडाफोन, आयडिया सेल्यूलर, टाटा टेलिसर्व्हिस या कंपन्यांकडून परवानगी न घेताच बिनदिक्कतपणे खोदकाम सुरूकरण्यात आले आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी.......

त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. पुण्याच्या वाहतुकीचे तर तीनतेरा वाजलेले आहेत. या खोदकामांमुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे व त्यामुळे लोकांची गैरसोय होत आहे. महापालिकेने या कंपन्यांवर 30,80,85,200 रुपयांचा दंड ठोठावला आहे. परंतु, अद्याप एक रुपया सुध्दा या कंपनीने महापालिकेकडे भरलेला नाही. त्या कंपनीने महापालिकेला भीकच घातलेली नाही. विनापरवानगी ओव्हरहेड केबल टाकल्यामुळे रिलायन्स कंपनीला दंड ठोठावण्यात आलेला आहे. यामुळे शहरांचे विद्रुपीकरण होत आहे. रिलायन्ससहीत अन्य सर्व कंपन्यांविरुध्द महापालिकेने दंडात्मक कारवाई केलेली आहे. परंतु, या कंपन्यांनी टाकलेल्या ओव्हरहेड वायर्स त्यांनी काढलेल्या नाहीत. या केबल काढल्यानंतरच कंपनीला अंडरग्राऊंड केबल टाकण्याची परवानगी देण्याबाबतचे धोरण शासन घेणार आहे का ?

सभापती महोदय, महापालिकेकडून या कंपन्यांविरुध्द दंडात्मक कारवाई होत असली तरी मूळ विभाग म्हणून माहिती व तंत्रज्ञान विभाग या कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई करणार आहे, या कंपन्यांना काळ्या यादीत टाकणार आहात का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य आहे. रिलायन्स किंवा अन्य कंपन्यांव्दारा करण्यात येणाऱ्या कामांसाठी पुन:स्थापनेचा खर्च महापालिकेला देय असतो. परवानगी देत असताना कामाचे अंतर लक्षात घेऊन एक पेअर, दोन पेअर किंवा तीन पेअर, अशी किती पेअरची परवानगी द्यावी, याबाबतचा निर्णय होत असतो. परंतु, याचे उल्लंघन होताना दिसत आहे. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, या कंपन्यांनी अंडरग्राऊंड केबलबरोबरच ओव्हरहेड केबल्स देखील टाकल्या आहेत. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून या कामाचे पर्यवेक्षण व्हावे, अशी अपेक्षा आहे. रस्त्याचे काम असेल तर संबंधित विभागाच्या अभियंत्यांनी पर्यवेक्षण करावयाचे असते. स्कायशाईनचे काम सुरु असेल तर त्या विभागातील कर्मचाऱ्यांनी पर्यवेक्षण केले पाहिजे. अशा प्रकारे त्या त्या कर्मचाऱ्यांचे दैनंदिन कामावर लक्ष असणे अपेक्षित आहे. तथापि, कंपन्यांकडून अनधिकृतपणे ओव्हरहेड केबल टाकण्यात आल्या असतील व त्यासाठी महापालिकेने आकारलेल्या दंडाचे निकष कोणते होते, याची सुध्दा मी माझ्या स्तरावर चौकशी करीत आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.......

सभापती महोदय, असे लक्षात आले आहे की, घेतलेल्या परवानगीपेक्षा मोठ्या प्रमाणात अधिकची कामे झालेली आहेत व ओव्हरहेड केबल्स सुध्दा टाकण्यात आल्या आहेत. याबाबतची सखोल चौकशी करुन कंपन्यांनी काही चुकीचे काम केले असेल तर कंपन्यांविरुध्द आणि ज्यांनी सुपरव्हिजनच्या कामात कुचराई केली असेल त्यांच्याविरुध्द जी कारवाई अपेक्षित असेल ती करण्यात येईल.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे शहरात खोदकामासाठी खाजगी कंत्राटदारांना कामे दिलेली असतात. अशा प्रकारची कामे करीत असताना त्यांच्याकडून योग्य प्रकारे दुरुस्ती होत नाही व त्यामुळे वरचेवर रस्ते खराब होतात. या संदर्भात नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत. या तक्रारींबाबत शासन काय कारवाई करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ही तक्रार सुध्दा नागरिकांकडूनच आलेली आहे. या संदर्भात एक पीआयएलसुध्दा दाखल झाल्याची माहिती सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी दिली आहे. आजच्या वर्तमानपत्रात या संदर्भात ठळक बातमी सुध्दा आलेली आहे व ती सभागृहाच्या पटलावर आहे. मी सांगितलेली कारवाई जनहित याचिकेवरुन आणि लोकांच्या तक्रारीवरुन सन 2013 पासून सुरु केलेली आहे. यामध्ये कोणताही संदेह नाही की, जनमानसातून आलेल्या तक्रारी असो किंवा लोकसेवकांकडून आलेल्या तक्रारी असो, कोणती कारवाई करण्यात येत आहे, हे जास्त महत्वाचे आहे. जर काही चुकीच्या गोष्टी झाल्या असतील तर आपण किती कठोरपणे कारवाई करतो, हे महत्वाचे आहे. या प्रकरणी चुकीचे केलेल्यांपैकी कोणालाही शासन पाठीशी घालणार नाही.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे शहरात रिलायन्स जिओ कंपनीला 262 कि.मी.ची केबल टाकण्याचे काम देण्यात आले होते व त्यावेळी काही अटी व शर्ती घालण्यात आल्या होत्या. महापालिकेची सर्व रक्कम भरुन खोदाई करण्यात येईल, महानगरपालिकेच्या कार्यालयांना मोफत इंटरनेट सुविधा पुरविण्यात येईल, अशा अटी कंपनीला घालण्यात आल्या होत्या. त्या अटींचाही कंपनीने भंग केलेला आहे. महापालिकेला कोठेही इंटरनेट सुविधा दिलेली नाही. अशा कंत्राटदारांना शासन काळ्या यादीत घालणार आहे का ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, शासन, महानगरपालिका किंवा निमशासकीय यंत्रणांबरोबर करार झाला असेल, त्यामधील अटी व शर्तीनुसार मोफत इंटरनेट सुविधा देण्याबाबत निश्चित झाले असेल आणि त्या अटींचा कंपनीकडून भंग झाला असेल तर निश्चितपणे संबंधित कंपन्यांविरुध्द कारवाई करु.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, पुण्याच्या नवीन ऐरियामध्ये स्ट्रेन्चेस करण्यासाठी परवानगी दिली जाते. जुन्या ऐरियामध्ये तशी परवानगी नसते. त्यामुळे त्या ठिकाणी केबल टाकण्याचे काम अवघड होते व मग ओव्हरहेड केबल टाकल्या जातात. याबाबत शासन काही धोरण निश्चित करणार आहे का ?

सभापती महोदय, जानेवारी ते मार्च या काळात इलेक्ट्रिक विभागाकडून खोदकाम केले जाते. एप्रिल ते जून या कालावधीमध्ये टेलिफोन कंपनीतर्फे खोदकाम केले जाते. अशा प्रकारे या खोदकामांमुळे संपूर्ण रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट होत असते. त्यामुळे या खोदकामांबाबतचा कालावधी सिंक्रोनाईज करण्याबाबत शासन काही धोरण ठरविणार आहे का ?

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी सांगितलेली परिस्थिती सत्य आहे. महापालिका किंवा नगरपालिका हद्दीत हाच प्रश्न तयार होत आहे की, एक यंत्रणा अगोदर खोदकाम करते, महानगरपालिका त्याची दुरुस्ती करते व नंतर मग दुसरी यंत्रणा खोदकाम करते. लवकरात लवकर याबाबत काही सिस्टिम तयार करण्याची आवश्यकता आहे. माझ्या स्मरणानुसार मागील अधिवेशनात ठाणे विभागाचाही असाच प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे मंत्री महोदयांनी ही बाब गांभीर्याने घ्यावी आणि उचित कार्यवाही करावी. संपूर्ण राज्यातील रस्ते अशा प्रकारे अपघातप्रवण होऊ लागले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील धोरण तसे निश्चित आहे. एप्रिल महिन्यात, पावसाळ्यापूर्वी, युटिलिटीसंदर्भातील सर्व कामे पूर्ण करावीत, असे निश्चित केलेले आहे. परंतु, अनेकवेळा याचे उल्लंघन होते. तसे होत असेल तर आपण सूचना दिल्याप्रमाणे कार्यवाही करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...4....

डॉ.रणजित पाटील.......

सभापती महोदय, हा प्रश्न केवळ एका शहरापुरता मर्यादित नाही. अनेक शहरांमध्ये रिलायन्सकडून ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे काम सुरु आहे. याच अधिवेशनात विविध आयुधांच्या माध्यमातून 5 शहरातील तक्रारी मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यस्तरावर ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारची कामे कंपनीने केलेली आहेत, त्याबाबत आपण बैठक घेऊन मार्ग काढणार असाल तर सर्व कामांच्या बाबतीत एकत्रितपणे अहवाल सादर करण्याबाबत आपण कंपनीला सांगू शकतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर विषयावरील लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी मांडली आहे. या चर्चेत रिलायन्स जिओ कंपनीसंबंधी चौकशी करण्यात येईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे, त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, पुणे शहरात खोदकामांमुळे खराब होणारे रस्ते पूर्ववत करणे आणि ते दुरुस्त करण्याविषयी महापालिकेकडून नेमके कशा पध्दतीने काम करण्यात येत आहे, हे जोपर्यंत लक्षात येत नाही, तोपर्यंत रिलायन्स कंपनीविरुध्द कोणती कारवाई होणार आहे, हे स्पष्ट होणार नाही. कारण, कागदोपत्री रस्ते दुरुस्त केल्याची नोंद असली तरी प्रत्यक्षात खोदकामामुळे रस्ते खराब झाल्याच्या तक्रारी पुण्यातील नागरिकांकडून केल्या जात आहेत.

सभापती महोदय, रिलायन्स जिओ कंपनी किंवा अन्य कंपन्यांकडून अंडरग्राऊंड केबल, इलेक्ट्रिक केबल, 3 जी, 4 जी केबल यासाठी खोदकाम केले जात असते. हा शहरी भागातील विषय आहे. परंतु, राज्यातील ग्रामीण भागात सुध्दा खोदकाम करीत असताना काढण्यात येणाऱ्या मुरुमाकडे व त्याच्या विल्हेवाटीकडे सरकारचे लक्ष नाही आणि त्याबाबतचे काही धोरण ठरलेले नाही. आम्ही ग्रामीण भागात असे पहातो की, काही किलोमीटरची लाईन खोदली जाते, मुरुम काढला जातो आणि ट्रॅक्टरमध्ये भरुन तो कंपनीतर्फे विकला जातो. याबाबत शासनाला एक रुपयाही दिला जात नाही आणि दुरुस्तीही केली जात नाही. त्यामुळे अशा कंपन्यांच्या बाबतीत व सर्व कामांच्या बाबतीत शासन एक सर्वसमावेशक धोरण आणणार आहे का ?

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

तसेच, यापूर्वी ज्या कंपनीला कामे दिली गेली त्या कंपनीने जे काही बेकायदेशीर काम केलेले आहे त्याची तत्काळ चौकशी करण्यात येणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी धोरणाच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. त्यांनी असेही सांगितले की, सदर कंपनी काही ठिकाणी ओपन ट्रेन्चेस करते आणि तेथील काढलेले गौण खनिज विकण्याचे काम देखील करते. आपल्याकडे या संदर्भात एखादी स्पेसिफिक तक्रार असेल तर आपण ती माझ्याकडे द्यावी. आपण त्याबाबत चौकशी करू. तसेच, आपण खोदकाम केल्यानंतर पुन्हा महानगरपालिकेकडून कोणत्या पद्धतीने काम केले जाते, याबाबत दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे. आपण दोन प्रकारचे शुल्क घेतो. जे परवाना शुल्क घेतले जाते त्यातील 50 टक्के शुल्क महानगरपालिका आणि 50 टक्के शुल्क शासनाकडे राहते. दुसरे म्हणजे, पुनर्स्थापनाची जी वसुली त्यांच्याकडून देय असते ती घेतली जाते आणि ती शंभर टक्के महानगरपालिकेकडे जमा होते. ती ॲडव्हान्स सुद्धा घेतली जाते आणि काही अनियमितता झाली असेल, चुकीचे काम केले असेल, त्या कंपन्यांना शास्ती किंवा शिक्षा केली असेल तर ती ॲडव्हान्समधून कापून घेण्यात येते. सदर कंपनीचे ॲडव्हान्सचे पैसे आपल्याकडे जमा आहेत. परंतु, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे त्याही पुढे जाऊन माझे असे म्हणणे आहे की, अशा पद्धतीने ओव्हरहेड केबल टाकणे हे अटी व शर्तीमध्येच नाही. म्हणून मी स्वत: विचारले की, आपण शास्ती आकारली ती कोणत्या धोरणानुसार आकारली आहे ? त्यांनी ओव्हरहेड केबलसाठी तिप्पटीने शास्ती आकारली आहे. त्यासाठी कोणता बेस आहे किंवा नाही, याची सुद्धा चौकशी करण्याचे मी प्रस्तावित केले आहे. त्यामुळे शासन याबाबत गंभीर आहे. शासन एक पाऊल पुढे टाकून सदर प्रकरणी काय करता येईल याबाबत चौकशी करुन त्या कंपनीविरुद्ध योग्य ती कारवाई करेल.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय आपण म्हणालात की, माझ्या दालनात बैठक घ्यावयाची आहे. आपण सर्वांच्या तक्रारी एकत्रित करुन माहिती घ्यावी.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, ज्या कंपन्यांनी अशा प्रकारे काम केले आहे त्यांच्यावर किती दिवसात कारवाई करण्यात येणार आहे आणि त्यांनी जे खोदकाम केलेले आहे त्यावर पुन्हा सरफेसिंग करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? तसेच, सभापती महोदयांनी नुकतेच निदेश दिल्याप्रमाणे आपण सभापती महोदयांच्या दालनात बैठक घेणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपण निर्देश दिलेले आहेत, त्याप्रमाणे बैठक घ्यावीच लागेल. परंतु, आपण सांगितल्याप्रमाणे जे पुनर्स्थापनाचे काम आहे ते अटी व शर्तीनुसार त्याची आगाऊ रक्कम महानगरपालिकेकडे जमा केली जाते आणि हे काम व कर्तव्य संबंधित महानगरपालिकेचे आहे. आपण या संदर्भात लवकरात लवकर बैठक घेऊ.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. परंतु, मूलभूत प्रश्न असा आहे की, आपण नवीन शहर किंवा शहराचे विस्तारीकरण करताना ज्या रस्त्याचे बांधकाम करतो त्या रस्त्यावर सर्व्हिस डक्ट असावयास पाहिजेत. जगात सर्व ठिकाणी सर्व्हिस डक्ट आहेत. परंतु, आपल्याकडे सर्व्हिस डक्ट नाहीत. त्यामुळे डीसी रूल्समध्ये तशा प्रकारची सुधारणा करुन नवीन रस्ता किंवा विस्तारीकरण करताना वेगवेगळ्या सर्व्हिसेससाठी लागणारे जे डक्ट आहेत ते आपण बंधनकारक करणार आहात काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. असे केले तरच हा प्रश्न सुटू शकेल. म्हणून याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विधायक सूचना केलेली आहे. पुढील दृष्टीने नियोजन करताना निश्चितपणे या सुचनेचा अंतर्भाव केला जाईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मी प्रथम मंत्री महोदयांना धन्यवाद देतो की, त्यांनी विवक्षित तक्रारी सादर करण्याचे सूचित केले आहे. मी ग्रामीण भागाविषयी बोलणार आहे. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथ खडसे साहेब देखील सभागृहात उपस्थित आहेत. मी या निमित्ताने दोन विवक्षित गोष्टींकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. नॅशनल हायवे क्र.17 च्या चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. डीपीडीसीमध्ये देखील चर्चा झालेली आहे. जिल्हापरिषदेने आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ज्या सुविधा दिल्या होत्या त्या ठेकेदाराने काहीही न करता उखडून लावलेल्या आहेत. त्यामुळे पेण तालुक्यातील 80 टक्के

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे........

भाागात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. माझा दुसरा प्रश्न दिघी पोर्ट संदर्भात आहे. पूर्वी दिघी-म्हसळा-गोरेगांव हा रस्ता महानगरपालिकेकडे होता. परंतु, आता तो दिघी पोर्टकडे हस्तांतरित केला आहे. हा रस्ता दिघी पोर्टकडे हस्तांतरित केल्यामुळे महानगरपालिकेमार्फत या रस्त्याच्या कामावर निधी खर्च केला जात नाही. मला असे कळले की, महसूल खात्याने 80 कोटी रुपयांची थकबाकी असल्यामुळे दिघी बंदर सिल केले आहे. आता हे बंदर फक्त कागदोपत्री सिल करण्यात आले आहे. मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. तेथे सर्व कामे सुरु आहेत. परंतु, त्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात धोरणात्मक प्रश्न विचारला आहे. मग रिलायन्स असेल किंवा नॅशनल हायवेचे काम करणारी मोठी यंत्रणा असेल किंवा दिघी पोर्टचे मालक असतील. जे मोठे कारखानदार यामध्ये गुंतले आहेत आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनाशी निगडित असलेल्या प्रश्नांबाबत हा जो खेळ चालला आहे त्याबाबत शासनाचे आणखी वेगळे धोरण मग नगर विकास विभाग, महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागांनी एकत्रित येऊन या संदर्भात निर्णय घेतला नाही तर हा प्रश्न कायम स्वरूपी सुटू शकेल, असे मला वाटत नाही. वेळोवेळी हे प्रश्न उपस्थित होत राहतील. म्हणून दिघी बंदराची जी अवस्था आहे त्यामध्ये आपण जातीने लक्ष घालावे आणि गोरेगाव लोणेरा फाटा ते शिवदन रस्त्याची जी दुरवस्था झालेली आहे त्याकडे आपण लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : शासनाने यामध्ये लक्ष घालावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. अनेक शहरात केबल टाकण्यासाठी खोदकाम सुरु आहे आणि त्याचा पादचारी व वाहनांना त्रास होतो. खोदकाम करणाऱ्या केबल कंपन्यांकडून महानगरपालिकेला ॲडव्हान्समध्ये पैसे दिले जातात. त्या कंपन्यांनी नियमाप्रमाणे काम केले नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते आणि या कंपन्यांचे मालक पैसेवाले असतात, धनदांडगे असतात. त्या कंपन्या दंड भरुन सहज मोकळ्या होतात. परंतु, दंडात्मक कारवाई बरोबरच त्यांच्यावर फौजदारी कारवाई देखील करण्याचा शासनाचा इरादा आहे काय ?

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, फक्त पिक्युलर पनिशमेंट करुन जो थोडासा दंड असतो तो भरायचा आणि पुन्हा अशा प्रकारची चूक करायची किंवा इन्टेन्शनली तसे करायचे, असे असू शकते. या संदर्भात फौजदारी तक्रारी केल्या जातात आणि त्या केलेल्या सुद्धा आहेत. अशाच प्रकारची घटना मुंबईत देखील घडलेली आहे. आपण तेथे वॉर्ड स्तरावर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे.

-------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिंडोशी, मालाड, मुंबई आयटी पार्कच्या मागील डोंगराचा आकार झपाट्याने कमी होणे

**मु.शी.**: संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिंडोशी, मालाड, मुंबई आयटी पार्कच्या मागील डोंगराचा आकार झपाट्याने कमी होणे यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिंडोशी, मालाड, मुंबई आयटी पार्कच्या मागील डोंगराचा आकार 2000 सालापासून झपाट्याने कमी होणे, नॅशनल पार्कच्या 5 कि.मी. क्षेत्रापर्यंत खदान चालवता येत नसणे, B.E.A.G. संस्थेने 305 ची जनहित याचिका पर्यावरणाचा ऱ्हास झोपडीवासी करत आहेत असे भासवून बिल्डर लॉबीशी हात मिळवणी करणे, चांदिवली येथे पुनर्वसन करताना डोंगर फोडून पर्यावरणाचा ऱ्हास करणे, सव्हे नं. 42 अ, सर्व्हे नं. 87 व सर्व्हे नं. 239/1 येथे मोठमोठ्या टाउनशीप उभ्या राहणे, सर्व्हे नं. 239/1 संदर्भात 7/12 वर क्षेत्राची नोंद चुकीची दर्शविणे, जुने सर्व्हे नं. 163, 143, 144, 145 यातील 206 एकर जमीन वनविभागामध्ये नसतानाही महसूल व वन विभागाने 16 जानेवारी, 1996 रोजीच्या शासकीय राजपत्रामधून जाहीर करणे, दिनांक 22 जून, 2005 रोजी महसूल विभागाने कलम 35 (3) च्या नोटीसीमधील सर्व क्षेत्रावर नोंदी 31 जुलै, 2006 चे आत पूर्ण करण्याच्या सूचना असताना तत्कालीन वनसंरक्षक श्री.पी.एन.मुंडे यांनी दिनांक 29 मे, 2006 रोजी उपरोक्त जागेवर वनाची नोंद घेऊ नये असे पत्राने कळविणे तसेच संपादनाची W.T. 41/1956 मागे घेण्यात आल्याचे खोटे पत्र देणे, 20 फेब्रुवारी, 2006 रोजी पी.एस.मुंडे यांनी खोटी माहिती दिली व नोटीस मागे घेतलेली नाही असे माहितीच्या अधिकारात माहिती होणे, M.I.S.C. PIT NO 1465 OF 1975 समझोता करारात 1488 एकर 33 गुंठे 12 आणे संपादन क्षेत्रापैकी 848 एकर 20 गुंठे 12 आणे

..6...

श्रीमती विद्या चव्हाण........

वनविभागाला देण्याचे आदेश. तसेच 1982 मा.हायकोर्टाने प्रत्यक्ष जागेवर मोजणीचे आदेश देणे, दिनांक 8 मे, 2009 रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने B.E.A.G. ची विनंती अमान्य करत मा.उच्च न्यायालयास राज्य घटनेच्या कलम 226 नुसार वस्तुस्थिती संबंधीचा निकाल देण्याचा अधिकार नसून Competent Statutory Authority संविधानिक यांचा आहे व दिनांक 15 सप्टेंबर, 2003 चे मा.हायकोर्टाचे अधिकार क्षेत्र नसल्याचे निदर्शनास आणणे, तरीही शासनाने जास्तीच्या 206 एकर जमिनी विषयी गुप्तता बाळगणे, दिनांक 9 मे 2002 मधील कलेक्टरच्या अध्यक्षतेखालील कमिटीच्या रिपोर्ट प्रमाणे वनविभागाने 220 एकर जमीन जास्तीचे घेतल्याचे कबूल करणे, 572 एकर जमीन मुंबईतील तबेले हटविण्यासाठी दिलेली असणे, महापालिकेने ती जमीन न घेणे, ती जमीन वनविभागाकडे जाणे आवश्यक होते, याविषयी वनविभागाने खुलासा करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. मी लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नांची उत्तरे मला लक्षवेधी सुचनेच्या निवेदनातून मिळालेली नाहीत. संजय गांधी नॅशनल पार्क येथे जो वनाचा भाग आहे किंवा जो बफर झोन आहे त्यामध्येच हे आयटी क्षेत्र येते आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मागील डोंगर खणण्याचे काम सुरु आहे ही बातमी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात आली होती. सन 2000 पासून हे काम सुरु आहे, हे खरे आहे. परंतु, लेखी उत्तरात हे काम त्यांच्या जागेत सुरु आहे, असे नमूद केले आहे. मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, वन जमिनीच्या संदर्भात वन विभागाचे काही नियम आहेत आणि ते नियम राज्य शासनाचे नाहीत, तर ते केंद्र शासनाचे नियम आहेत. त्या नियमाप्रमाणे नॅशनल पार्कच्या बाऊन्ड्री लाईनपासून 5 किलो मीटर अंतरापर्यंत खदान सुरु करता येत नाही. मग ते कोणतेही क्षेत्र असो. लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, ती जमीन खाजगी वितरकाची आहे. मी सांगू इच्छिते की, हायकोर्टात जो समझोता करार झाला त्यानुसार महानगरपालिकेला जी 572 एकर जमीन दिली होती ती मुंबई शहर आणि उपनगरातील तबेले हटविण्यासाठी दिली होती. महानगरपालिकेकडे तबेले हटविण्यासाठी देण्यात आलेली 572 एकर जमीन महानगरपालिकेला नको होती तर मग त्यांनी ती जमीन मूळ मालकाला परत देण्यापूर्वी वन विभागाकडे द्यावयास पाहिजे होती. खरे म्हणजे ती जमीन मूळ मालकाला देणे बरोबर नव्हते. ही 572 एकर जमीन पुन्हा वन विभागाकडे का देण्यात आली नाही, असा प्रश्न मी विचारत नाही तर तहसील कार्यालयाने विचारला आहे. सुप्रिम कोर्टाने ज्या स्टॅट्युटरी ॲथॉरिटीला सांगितले त्या तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोंदीवरुन मी हे बोलत आहे. त्यामुळे ही 572 एकर जमीन वन विभागाकडे का परत करण्यात आली नाही ?

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

त्याचप्रमाणे समझोता करारामध्ये 44 एकर जमीन मुंबई महानगरपालिककडे आरक्षणासाठी देण्यात आली होती. ती बरोबर आहे, तेथे आरक्षण टाकण्यात आले आहे. 5 एकर जमीन मुलांच्या पार्कसाठी होती. 17 एकर जमीन खदानसाठी आरक्षित करण्यात आली होती. एकूण 1588 एकर जमीन संपादन करण्यासाठी वन विभागाची नोटीस होती. मला मंत्री महोदय व सभागृहाच्या ही बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, वन विभागाने ज्या खाजगी जमिनी संपादित केल्या होत्या त्यातील सर्व्हे क्रमांक 239 मध्ये पूर्वी छोटे-छोटे सर्व्हे क्रमांक होते, त्यामध्ये सर्व्हे क्रमांक 163 आहे. मूळ जमीन 206 एकर होती. 1488 एकर जमीन संपादन करण्यासाठी वन विभागाने नोटीस काढली होती. हायकोर्टात कन्सेन्ट टर्म झाला त्यामध्ये 888 एकर जमीन वन विभागाला घेण्याची परवानगी मिळाली होती. त्यातील सात ते आठ एकर जमीन कुळांची असल्यामुळे फक्त 841 एकर जमीन 7/12 च्या उताऱ्यावर संजय गांधी नॅशनल पार्कला मिळालेली आहे. एकूण जमीन 1694 एकर होती. वारसदारांच्या नोंदी माझ्याकडे आहेत, 1971 मध्ये मूळ मालकाने 206 एकर शेत जमीन वेगळी केली होती. त्या जमिनीला वनसंपादनाची नोटीस नव्हती. मी माझ्या लक्षवेधी सूचनेत झोपडपट्टीचा उल्लेख केलेला नाही तरी देखील लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात झोपडपट्ट्याचे अतिक्रमण होते असे नमूद केले आहे.

सभापती महोदय, 206 एकर जमीन संपादन करण्याची नोटीस नव्हती, ती जमीन 888 एकरात येत नाही, 572 एकर जमिनीच्या बाजूला आता आयटीपार्क उभे राहिले आहे. ती जमीन वनविभागाकडे जाणे आवश्यक होती. यासंदर्भात खात्याकडून असे उत्तर आले आहे की, हा विषय विभागात येत नाही. तो बफर झोन आहे, पाच किलोमीटर अंतरात आहे, 800 मीटरच्या आत आहे, संजय गांधी नॅशनलपार्कच्या बाऊन्ड्री लाईनवर आहे, अनेक ठिकाणी संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये खदान चालू आहेत. 572 एकर जमिनीबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. ही जमीन वन विभागाकडे का आली नाही, तेथे आज आयटी पार्क का उभे राहिले आहे. हा एक प्रश्न मी पहिल्यांदा विचारते या प्रश्नाचे उत्तर आल्यानंतर मला इतर प्रश्न विचारावयाचे आहेत ते देखील अत्यंत महत्वाचे आहेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचा विषय अतिशय महत्वाचा आहे, हजारो कुटुंबाचा प्रश्न या वन क्षेत्रात उपस्थित झाला होता. हा प्रश्न विचारला असताना

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार...

यातील काही तथ्य मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना व सभागृहाला सांगू इच्छितो. यासंदर्भात 27 पेक्षा जास्त याचिका हायकोर्ट व सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाने एकाही याचिकाकर्त्याच्या बाजूने निर्णय दिलेला नाही. या विषयाबाबत आतापर्यंत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, वन मंत्री महोदयांकडे 40 च्या वर बैठका झालेल्या आहेत. याबाबत सुप्रीम कोर्ट व हायकोर्टाने दिलेले निर्णय अतिशय महत्वाचे आहेत. सन्माननीय सदस्यांनी काही मुलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत, पहिला प्रश्न असा आहे की, 572 एकर जमीन तबेले हटविण्यासाठी महानगरपालिकेला दिली होती काय ? तर ही बाब खरी आहे. जेव्हा कन्सेंट टर्म करण्यात आला, तेव्हा 1488 एकर जमीन दिनशा ट्रस्टची होती. खाजगी वन संपादनाचा कायदा आल्यानंतर या ट्रस्टकडील 1488 एकर जमिनीपैकी कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे जो समझोता करार करण्यात आला त्यानुसार 848 एकर जमीन वन विभागाकडे देण्यात आली. 640 एकरावर दिनशा ट्रस्टचा क्लेम मान्य करण्यात आला. 640 एकराबाबत निर्णय घेतांना कन्सेंट टर्म मध्ये हे मान्य करण्यात आले होते की, 572 एकर जमीन मुंबईतील तबेले हटविण्याकरिता महानगरपालिकेने मागणी करावी. त्यासंदर्भातील प्रक्रिया निश्चित करण्यात आली ती प्रक्रिया पूर्ण केल्यावर 572 एकर जमीन महानगरपालिकेने घ्यावी. समझोता करारात पुन्हा असे स्पष्ट करण्यात आले होते की, ही जमीन जर महानगरपालिकेने तबेले हटविण्यासाठी घेतली नाही तर ती जमीन वन विभागाकडे दिली जाणार नाही तर ती जमीन दिनशा ट्रस्टकडेच राहील. या जमिनीची मागणी वन विभागाने करायची नाही, असे समझोता करारात नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पहिला प्रश्न 572 एकर जमीन तब्येल्यासाठी वापरली गेली नाही तर समझोता कराराप्रमाणे या जमिनीवर वन विभाग कोणत्याही पध्दतीने क्लेम करु शकत नव्हता. समझोता करारामधील शेवटची वाक्ये सन्माननीय सदस्यांची वाचावीत.

दुसरा विषय असा आहे की, 640 एकर जमीन दिनशा ट्रस्टच्या मालकीची होती तरी त्यावर नो डेव्हलपमेंट झोन होता. हे खरे आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी असा निर्णय घेतला होता की, नो डेव्हलपमेंट झोन पैकी दिनशा ट्रस्टला 60 एकर जमिनीवर डेव्हलपमेंट करण्याची परवानगी देण्यात आली होती. 640 एकर ही जमीन वन विभागाची नसती तरी ती जमीन नो डेव्हलपमेंट झोन म्हणून राहिली असती. तत्कालीन कालावधीत जो विचार करण्यात आला त्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार..

माध्यमातून 60 एकरापेक्षा जास्त जमीन डेव्हलपमेंटसाठी देण्यात आली. 60 एकर पेक्षा जी जास्त जमीन देण्यात आली त्यामध्ये आयटी पार्क तयार करण्यात आला आहे. मागील काळात मुख्यमंत्री महोदयांनी परवानगी देऊन डेव्हलपमेंट झोन तयार केला तेथे आयटी पार्क होत आहे. यासाठी अधिकृतपणे सर्व विभागांनी व महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे.

सभापती महोदय, माईन्सच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे, त्या विभागात तीन खदानी होत्या, त्या 1997 मध्ये बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी आयटी पार्क व इमारतींचा पाया खोदला जातो. त्या माईन्स आहेत असे भासविण्याचा प्रयत्न होत आहे. त्याचे फोटो घेतले जातात व माईन्स सुरु आहेत असे दाखविले जाते, तर या माईन्स नाहीत. पाया खोदण्यासाठी जेव्हा जागेचे उत्खनन करतो त्याला माईनिंग ॲक्टीव्हीटीमध्ये धरले जात नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांकडे तेथे माईन्स सुरु असण्याचे काही ठोस पुरावे असतील तर सरकार त्या ठिकाणी तातडीने कारवाई व चौकशी करण्याचे आदेश देईन. कोणताही अधिकारी कर्मचारी अशा अनधिकृत माईन्सच्या संदर्भात दोषी आढळला तर त्याला शिक्षा देण्याची शासनाची भूमिका आहे. ज्या माईन्सचा विषय उपस्थित करण्यात आला त्या 1997 मध्ये बंद करण्यात आल्या आहेत. पाया खोदणे किंवा त्यांचे खाजगी डोंगर सदृश्य उंचवटे इमारती बांधण्यासाठी तोडणे म्हणजे माईनिंग नव्हे. सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्राचा उल्लेख केला आहे, यामध्ये आयटी पार्कच्या संदर्भातील काही माहिती आलेली आहे असे त्यांनी प्रश्न उपस्थित करताना सांगितले आहे. आयटी पार्क वन विभागाच्या जागेवर आहे अशी शंका असल्यास त्या संदर्भातील कागदपत्रे सन्माननीय सदस्यांनी द्यावीत, त्याची देखील सखोल चौकशी केली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जी माहिती दिली ती पूर्णपणे सभागृहाची दिशाभूल करणारी आहे. माझ्याकडे तहसीलदार यांचे पत्र आहे, तहसीलदार यांनी जे स्पष्टपणे नमूद केले आहे तो परिच्छेद मी वाचून दाखविते. मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्रमांक 1465/75 मध्ये वन खात्याने दिनांक 03/12/1979 रोजी समझोता कराराप्रमाणे अहवालाच्या परिच्छेद एक मध्ये दिल्याप्रमाणे 'ब' कडे दाखविलेली 572 एकर 29 गुंठे आठ आणे जमीन भारतीय वन कायदा 1927 च्या कलम 35 (3) अन्वये काढलेल्या संपादनाच्या नोटीसीमध्ये

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

सामील केली असता समझोता कराराप्रमाणे त्यावेळी मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई शहर व मुंबई उप नगरातील तबेले हटविण्यासाठी भूसंपादन कायदा 1894 प्रमाणे जमीन संपादनाचे काम चालू होते.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

जमिनीचे मालक मौजे मालाड खोत यांचे सदर जमीन सोडून देण्यात आली. परंतु भूसंपादनाचे काम नंतर तहकूब करुन रद्द करण्यात आले. कारण त्यानंतर तबेले बृहन्मुंबईबाहेर मीरा रोड येथे हलविण्याचे ठरविले. अशा परिस्थितीत वन खात्याने सदर 572 एकर, 29 गुंठे 8 आणे जमीन मुंबई उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय किंवा महाराष्ट्र शासन खाजगी वन संपादन कायदा, 1975 च्या कलम 21 अन्वये राखीव वन म्हणून पुन्हा संपादन करण्याची कार्यवाही का केली नाही किंवा त्याबाबत शासनाकडे अहवाल सादर केला आहे काय किंवा कसे? सदर जमीन मालाड येथील खोतास का सोडून देण्यात आली याबाबत उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांनी खुलासा करावा.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, त्याच वेळी खुलासा करण्यात आला. ज्या तहसीलदारांनी किंवा ज्यांनी कोणी पत्र दिले त्यासोबत त्याचा खुलासा केलेला आहे. खुलासा केलेले पत्र माननीय सदस्यांकडे दिलेले दिसत नाही. परंतु तहसीलदारांनी अशा पध्दतीची खोटी माहिती पत्राच्या माध्यमातून उपस्थित केली असेल तर त्याही तहसीलदारांची चौकशी केली जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी छातीठोकपणे सांगितले की, त्या ठिकाणी कोणत्याही पध्दतीच्या माईन्स नाहीत. मालाड स्टोन नावाच्या स्टोनच्या क्वारी या सर्व भागांमध्ये होत्या. आपण बॅलार्ड पियर आणि या भागातील इमारतींमध्ये मालाड स्टोनचा वापर झाल्याचे पाहतो. आपण वरळी सी-लिंकच्या बाहेर आलो की, तेथील सर्कलचे जे सुशोभीकरण केले आहे त्या कामासाठी मालाड स्टोन वापरण्यात आला आहे. ज्या पध्दतीचे मालाड स्टोनचे तुकडे त्या ठिकाणी दिसतात, ते त्या क्वारीमधून काढले आहेत. मी त्या कामाचे फोटो आज मागवू शकतो. स्टोन स्पष्टपणे दिसतात. मंत्री महोदय म्हणतात की क्वारी नाही. मालाड स्टोन तेथील क्वारीमधून आणून सुशोभीकरणासाठी वापरले जातात. ज्या भागातून मालाड स्टोन येतो त्या भागातील क्वारीला आपण मान्यता दिलेली नाही, उपनगरातील सर्व क्वारी बॅन केल्या असतील तर महापालिकेने आपल्या टेंडरमध्ये मालाड स्टोन वापरण्याचा उल्लेख केला असल्यामुळे मालाड स्टोन वापरला जात असेल तर त्या अनुषंगाने कारवाई करणार आहात काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, निश्चितपणे कारवाई नव्हे तर आपली परवानगी असेल तर तुमच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती या विषयाची चौकशी करण्यासाठी नेमण्यास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मी तयार आहे.  या अवैध माईन्सबाबत जे कर्मचारी अधिकारी असतील त्यांची चौकशी करुन त्यांना शिक्षा देण्यासाठी माननीय सभापतींच्या निर्देशानुसार मी आपली समिती जाहीर करतो.  आपण आणि

..2..



श्री.सुधीर मुनगंटीवार....

माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, एक वन विभागाचा अधिकारी किंवा कर्मचारी असेल, तो तुम्हाला याबाबत मदत करेल.  तुम्ही पुढील अधिवेशनापूर्वी याचा अहवाल द्यावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय......

**सभापती** : आपण चौकशी करा आणि अहवाल द्या.  तुम्हाला एवढे अधिकार दिल्यानंतर सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

सन्माननीय वन मंत्र्यांनी देखील याची चौकशी करावी.  आपण केले ते अतिशय सद्भावनेने केले आहे.  15 वर्षे माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण या विषयाबाबत पोटतिडकीने प्रयत्न करीत असल्याचे मी पाहिले आहे.  त्यांना न्याय मिळत नाही.  ही चौकशी झाल्यानंतर माझ्याकडेच आपण बैठक घेऊ.  त्यांचे जरुर समाधान करण्याचा प्रयत्न आपल्या पध्दतीने आणि शैलीने करु एवढे नक्की सांगतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार : मान्य आहे.

-------

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नियोजित साईबाबानगर स्वप्नपूर्ती एकता एसआरए को-ऑप हौ.सो., धोबीघाट, सातरस्ता, मुंबई संदर्भात नव्याने प्रस्ताव मागविणे

**मु.शी.** : नियोजित साईबाबानगर स्वप्नपूर्ती एकता एसआरए को-ऑप हौ.सो., धोबीघाट, सातरस्ता, मुंबई संदर्भात नव्याने प्रस्ताव मागविणे यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"नियोजित श्री.साईबाबानगर स्वप्नपुर्ती एकता एस.आर.ए. को-ऑप हौ.सोसायटी, धोबीघाट, सातरस्ता, मुंबई- ११ ही धारावीनंतर मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी असणे, सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेकरिता दिनांक ११ मार्च, २०१५ वा त्या सुमारास ओमकार डेव्हलपर्स यांना मान्यता देण्याकरिता दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी सकाळी ११.०० वा रेल्वे सभागृह, ना.म.जोशी मार्ग येथे सभा बोलाविण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० जून, २०१४ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदर सोसायटीच्या पुनर्वसनाकरिता झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मुंबई महानगरपालिकेशी विचारविनिमय करुन नवीन प्रस्ताव मागविण्याबाबतचे दिलेले निर्देश, एस.आर.ए.च्या नियमानुसार विकासक नियुक्तीचा प्रस्ताव मंजूर होण्याकरिता सर्वसाधारण सभेत १/३ सदस्य उपस्थित असणे आवश्यक असताना सदर बैठकीत १/३ पेक्षा कमी सदस्य उपस्थित असणे, सदर सभेमध्ये सादर करण्यात आलेले परिशिष्ट - २ हे जुन्या नियमावलीप्रमाणे सन १९९५ पूर्वीच्या पात्र झोपडपट्टी धारकांचे असणे, याप्रमाणे विकासकाच्या फायद्याकरिता अनेक निर्णयांचे उल्लंघन करण्यात येत असणे, झोपडपट्टीवासियांचे हित जपण्याकरिता व मा.उच्च न्यायालयाने यासंदर्भात वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन होण्याकरिता सदर प्रस्तावास त्वरीत स्थगिती देण्याची व चौकशी करण्याची व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना."***

श्री.प्रकाश महेता (गृहनिर्माण मंत्री ) : सभापती महोदय, निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. निवेदनातील पहिल्या पृष्ठावरील पाचव्या ओळीतील दिनांक 2 ऑगस्ट,2011 ऐवजी

23.11.2011 असे वाचावे. तिसऱ्या पृष्ठावरील पहिल्या ओळीतील दिनांक 24.1.2015 ऐवजी 24.11.2014 असे वाचावे.



श्री.प्रकाश महेता......

दुस-या परिच्छेदातील तिसऱ्या ओळीतील दिनांक 24.1.2015 ऐवजी 24.11.2014 असे वाचावे. त्याच पृष्ठावरील शेवटून पाचव्या ओळीतील 70.32 टक्के ऐवजी 71.32 टक्के असे वाचावे आणि शेवटच्या पृष्ठावर दुसऱ्या ओळीतील दिनांक 21.3.2015 ऐवजी 21.4.2015 असे वाचावे आणि दुसऱ्या परिच्छेदातील चौथ्या ओळीतील दिनांक 02.08.2011 ऐवजी 23.11.2011 असे वाचावे. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी सुधारित निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेचे निवेदन बदललेले आहे.

**सभापती** : मायनर दुरुस्ती आहे.

श्री.धनंजय मुंडे : हा विषय अतिशय गंभीर आहे. लक्षवेधी सूचनेवरील निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी अनेक दुरूस्त्या केलेल्या आहेत. अशा परिस्थितीत या निवेदनाला काही अर्थ उरतो का? लक्षवेधी सूचनेवरील निवेदनामध्ये किंवा प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तरामध्ये किरकोळ दुरुस्ती करण्यात आली तर आम्ही समजू शकतो. परंतु सलग पाच ते सहा तारखांमध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या आहेत, झोपडीधारकांची टक्केवारी बदलण्यात आली आहे. 70.32 टक्क्याऐवजी 71.32 टक्के झोपडीधारकांची विकासकाला सहमती असल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारच्या दुरूस्तीमुळे या लक्षवेधी सूचनेचा सार संपतो.

श्री.प्रकाश महेता : 70 आणि 71 टक्के यामध्ये फरक नाही.

श्री.धनंजय मुंडे : फरक आहे, तो मी सभागृहाला सांगू इच्छितो.

**सभापती** : लक्षवेधी सूचनेचा गाभा आणि उद्दिष्ट यावरुन आपण प्रश्न विचारावेत. मंत्री महोदयांनी दुरूस्त्या केलेल्या आहेत त्यात मिसलिडींग असेल, गाभा आणि उद्दिष्ट फेल्युअर होत असेल तर आपण वेगळा विचार करु. आपण प्रश्न उपस्थित करावा, मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री.प्रकाश महेता : माननीय विरोधी पक्षनेत्यांचा तारखांवर भर आहे की योजनेंतर्गत असलेल्या मूळ विषयावर चर्चा करुन न्याय द्यायचा आहे. ही प्रिंटिंग मिस्टेक आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना साईबाबानगर स्वप्नपूर्ती एकता एसआरए योजना ओमकार डेव्हलपर्स यांना संगनमताने व बेकायदेशीरपणे दिल्याच्या संदर्भातील आहे. ही योजना पूर्वी ज्यांना देण्यात आली होती त्याच्या बाबतीत काही लोक कोर्टात गेले होते. कोर्टाने त्या प्रकरणात आदेश दिले. ते आदेश मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. आदेशाच्या 12 व्या परिच्छेदात म्हटले आहे की,"So far as PIL No. 24 of 2012 is concerned for the reasons recorded in Para 7 and 8 herein above, we partly allow the petition by setting aside the General Body Resolution dated 12

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

August 2005 passed by the members of Saibaba-proposed and we direct the SRA to call for fresh proposals for redevelopment of the said larger property either as a whole or in

...6...



श्री.धनंजय मुंडे.....

part as pointed out herein above after taking a view in consultation with the Municipal Corporation."

सभापती महोदय, कोर्टाचे आदेश स्पष्ट आहेत. त्यानुसार या ठिकाणी पूर्वी दिलेली एसआरए योजना रद्द करावी आणि पुन्हा नव्याने या हाऊसिंग सोसायटीबाबत एसआरएने योजनेची जाहिरात काढावी आणि विकासक बोलवावा.

नंतर डब्ल्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, यात गंभीर बाब कोणती आहे ? एसआरए ने या निकालाच्या नंतर दिनांक 9 मार्च 2015 रोजी जाहिरात काढली. ती जाहिरात सर्व विकासकांना बोलाविण्यासंबंधातील असायला हवी होती. पण मी पहिल्यांदा असे पाहतो की, त्यांनीच जनरल बॉडी बोलाविण्याबाबतची अधिसूचना काढली. विकासक मे.ओमकार रियलटर्स प्रोजेक्ट प्रा.लि.यांना सहमती आहे किंवा नाही अशी सभेची विषय सूची होती. एसआरए ने ओमकार बिल्डर्सच्या नावाने जाहिरात काढली. त्या बिल्डर्सला आपली सहमती आहे किंवा नाही हे लाभार्थी झोपडपट्टीधारकांनी सांगावयाचे आहे. जी जनरल बॉडी बोलाविण्यात आली होती त्यासंबंधीची नोटीस किती लाभार्थींना गेली होती, यासंबंधीचे स्पेसिफिक उत्तर देखील मला मंत्रिमहोदयांकडून पाहिजे आहे. मुंबई उच्च न्यायालयाने निदेश दिले आहेत. त्याप्रमाणे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत काय, याचे स्पेसिफिक उत्तर मला पाहिजे आहे. सदर योजनेतील परिशिष्ट-2 बाबत अनेक आक्षेप आहेत. त्या आधारे जुन्या विकासकाला एलओआय देखील दिलेला आहे. तो माननीय न्यायालयाने रद्द केलेला आहे. त्याच परिशिष्ट-2 च्या आधारे नवीन विकासक नेमण्यात आला. या परिशिष्ट-2 च्या बाबतीतमध्ये कोर्टाने आक्षेप घेतला. कोर्टाचे आक्षेप असताना देखील एसआरए ने पुनर्विकासासंबंधातील जाहिरात काढली. त्यावेळी फक्त एकाच बिल्डरला बोलाविण्यात आले. शासनाने दिनांक 1.1.2000 पर्यंतच्या झोपड्यांना सरंक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नवीन 600 झोपडपट्टीधारक या योजनेसाठी पात्र झाले. पूर्वीचे 1200 झोपडपट्टीधारक पात्र होते. असे असताना 50 टक्क्यांपेक्षा कमी लोक आले आणि ओमकार बिल्डर्सला ते काम देण्यात आले. 2000 पर्यंतचे जे लाभार्थी आहेत त्यांचा परिशिष्ट-2 मध्ये समावेश करून नव्याने नोटीसेस पाठवून जनरल बॉडी बोलाविणे आवश्यक आहे. पण तसे झाले नाही. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार सरसकट नोटीस काढून बिल्डरला, विकासकाला बोलवायला पाहिजे होते. ती कार्यवाही शासन कारणार आहे काय, त्या आदेशाचे पालन शासन करणार आहे काय, पूर्वी जी काही कारवाई झाली आहे, ती रद्द करून ज्यांनी ज्यांनी बेकायदेशीररित्या कारवाई केली आहे त्यांच्यावर सरकार कारवाई करणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश मेहता : सभापती महोदय, मुळात ही योजना सन 2007 रोजी लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मार्फत राबविण्यात येत होती. सन 2011 मध्ये एकूण झोपडीधारक 1516 पैकी 1116 पात्र झोपडीधारकांचे परिशिष्ट-2 जोडण्यात आले. सन 2011 मध्ये या योजनेला आशय पत्र देण्यात आले आहे. दिनांक 1.1.1995 या अर्हता दिनांकाच्या आधारित परिशिष्ट-2 निर्गमित केले त्यामध्ये 1678 झोपडपट्टीधारकांपैकी 1116 झोपडीधारक पात्र आहेत. या योजनेमध्ये मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांना 70 टक्के पात्र झोपडीधारकांची संमती आहे किंवा कसे अशा प्रकारचे पत्र शासनाने दिनांक 25 फेब्रुवारी 2014 रोजी एसआरए ला लिहिले आहे. त्या आधारावर दिनांक 13 मार्च 2014 रोजी गुप्त मतदानाने त्याची चाचणी करण्यासाठी एका सर्वसाधारण सभेचे आयोजन तेथे झाले. त्या सभेमध्ये शासनाच्या दिनांक 25 फेब्रुवारी 2014 रोजीच्या पत्राला विकासकाने आव्हान दिले. त्याची सर्व अपीले उच्च न्यायालयामध्ये फेटाळण्यात आली. उच्च न्यायालयाने बायोमॅट्रीक पद्धतीने उपस्थिती नोंदविण्याचे व गुप्त मतदान प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे विभागाने व्हिडिओ चित्रीकरण केले. तसेच बायोमॅट्रीक पद्धतीने पात्रता ठरविली आहे. दिनांक 13 मार्च 2014 रोजी सर्वसाधारण सभेमध्ये मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांना 70 टक्के पात्र झोपडीधारकांची संमती मिळाली नाही. गुप्त मतदान पद्धतीमध्ये 631 झोपडीधारकांनी भाग घेतला आहे. त्यापैकी 348 झोपडीधारकांची म्हणजे 55.15 टक्के सहमती मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांना मिळाली होती. त्यांना 70 टक्के सहमती मिळाली नाही. त्यानंतर मग या योजनेतील विकासक मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे आशय पत्र शासनाने रद्द केले. या प्रकरणी न्यायालयाने सांगितले की, जमिनीची मालकी मुंबई महानगरपलिकेकडे असल्यामुळे मुंबई महानगरपलिकेशी विचारविनिमय करून नवीन प्रस्ताव मागवावेत. शेवटी, सन 2014 मध्ये मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांची योजना दफ्तरी दाखल करण्यात आली. 70 टक्केच्यावर संमती मिळविल्यामुळे मे.ओमकार रियलटर्स प्रोजेक्ट प्रा.लि.यांना साईबाबा गृहनिर्माण संस्थेने विकासक म्हणून नेमले. त्यामुळे पहिला विकासक न्यायालयात गेला आणि उच्च न्यायालयाने उच्चस्तरीय समितीला सांगितले की, चार आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता....

न्यायालयाने विकासकांना सांगितले की, आपण कन्सेंट घेऊन सांगावे की, एखादा आठवडा आमचा लांब होत आहे. यासंबंधी तीन सुनावण्या झालेल्या आहेत. चौथी अंतिम सुनावणी दिनांक 1 ऑगस्ट 2015 रोजी आहे. त्यामुळे 1 तारखेला अंतिम निर्णय झाल्यानंतर त्यांना पुढचे कामकाज करण्याची अनुमती मिळेल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आम्ही जे विचारले नाही त्या बाबतीतील उत्तर दिलेले आहे. मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.चे काय झाले हा प्रश्नच आम्ही विचारला नव्हता. त्याच्याशी आमचे काहीच देणे घेणे नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न होता. हाय कोर्टाने जे आदेश दिले ते मी या सभागृहात वाचून दाखविले आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.यादवराव देवगडे : माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्त मंत्री हे नेहमी आमच्या मागण्यांकरिता सकारात्मक दृष्टीकोन ठेवतात. महाराष्ट्र हे अतिशय प्रोग्रेसिव्ह राज्य आहे. अशा या राज्यामध्ये आमदारांबरोबर, माजी आमदारांना सन्मान दिला जातो. मी माननीय मुख्यमंत्री व सर्व माननीय मंत्र्यांचे स्वागत करतो, अभिनंदन करतो. माजी आमदारांना रेल्वे कुपन्स देण्यासंबंधीची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. त्यासंबंधी माननीय रेल्वे मंत्री व माननीय मुख्यमंत्र्यांकडून योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही. तेव्हा यासंबंधी त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे.

डॉ.अनंत कळसे : ही मागणी बऱ्याच दिवसांपासून आहे. यासंबंधात बैठका देखील झालेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय रेल्वे मंत्र्यांना पत्र पाठविले होते. प्रधान सचिवांनी देखील रेल्वे मंत्रालयाला पत्र पाठविले होते. आता त्यांनी असे पत्र पाठविले आहे की, विधान मंडळाच्या माजी सदस्यांना रेल्वे कुपन सुविधा द्यावयाची असेल तर त्यासंबंधातील अधिसूचना निर्गमित करून रेल्वे मंत्रालयाला कळवावे. सदर अधिसूचना तपासून त्यावर निर्णय घेतला जाईल. रेल्वे मंत्रालयाकडून नुकतेच हे पत्र आले आहे. आपण अधिसूचना काढण्याचा निर्णय घेतला तर पुढील कार्यवाही आपल्याला करता येईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : यासंबंधी आपण निर्णय घ्यावा. आता माजी आमदारांना किती कि.मी.चा प्रवास अनुज्ञेय आहे ?

डॉ.अनंत कळसे : 35 हजार कि.मी.पर्यंतचा प्रवास देय आहे.

श्री.सुधाकर गणगणे : आमची अशी विनंती आहे की, 50 हजार कि.मी.चा प्रवास आपण अनुज्ञेय करावा.

डॉ.अनंत कळसे : पूर्वी माजी आमदारांना कुपन्सची सुविधा होती. पण ती सुविधा काही कारणांमुळे आपण खंडित केली. आपणास परत सुरूवात करायची असेल तर त्याप्रमाणे फॅसिलिटी द्यावी लागेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती तळेकर : यात अशी वस्तुस्थिती आहे की, सन 2000 मध्ये श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते तेव्हा कुपन्ससंबंधात नोटिफिकेशन इश्यू केले होते. हे नोटिफिकेशन इश्यू केल्यानंतर रेल्वे बोर्डाने त्याची मान्यता रद्द केली. त्यानंतर आपल्याला जी.आर.मागे घ्यावे लागले. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी प्रथम रेल्वे बोर्डाची तत्त्वतः मान्यता घ्यावी असे सांगितले. त्यासाठी आता पर्यंत पत्र व्यवहार सुरू होता. आता ते उत्तर देत आहेत की, आपण नोटिफिकेशन इश्यू करावे आणि मग आम्ही बघतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार : ते आता देखील बघतो असे म्हणत आहे. करतो असे म्हणत नाही. माजी आमदार स्वतःच्या पैशाने आल्यानंतर आपण काय करतो ?

डॉ.अनंत कळसे : त्यांना रिएम्बर्समेंट करण्यात येते.

श्री.सुधाकर गणगणे : यात प्रॉब्लेम तो नाही. आम्ही कोणत्याही ग्रेडेशनमध्ये बसत नाही. नॉर्मल तिकिटधारी व्यक्ती सारखे ट्रीट केले जाते. आम्ही आरटीसीमध्ये बसलो तर आमदारानंतर, माजी आमदाराचा नंबर लागेल. असे ते ग्रेडेशन आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : यात निर्णय घेण्यात काही अडचण येईल असे मला वाटत नाही. आता ते नगदी पैसे देऊन तिकिट काढत आहेत.

डॉ.अनंत कळसे : 35 हजार कि.मी.ची मर्यादा आपण 50 हजार कि.मी.पर्यंत वाढवावी.

श्री.सुधीर मुनगंटीवार : होय.

श्री.यादवराव देवगडे : आमची नंतरची मागणी अशी आहे की, माजी आमदाराला खासदारांप्रमाणे वैद्यकीय सुविधा देण्यात याव्यात. यात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, आम्ही जे बिल करतो त्याची प्रतिपूर्ती लगेच होत नाही. सध्याची पद्धत गैरसोयीची आहे. खासदारांना मोठ्या दवाखान्यांमध्ये उपचार घेण्याची सुविधा आहे. खासदारांना फार मोठ्या सवलती दिलेल्या आहेत. खाजगी दवाखान्यामध्ये उपचार घेण्याच्या सुविधेसह ज्या सवलती खासदारांना आहेत त्या सर्व सवलती माजी आमदारांना द्याव्यात असा विचार मागेझाला होता. माझी अशी सूचना आहे की, माजी आमदारांना उपचारासाठी मेडिकल स्मार्ट कार्ड देण्यात यावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार : श्री.कुंटे साहेब आपण सरकारी अधिकाऱ्यांसाठी एक योजना तयार केली आहे. ती आपण तपासावी. नवीन योजनेमध्ये आमदार, माजी आमदार असे एकत्रित घ्यावे. हे सर्व करीत असताना गेल्या दहा वर्षामध्ये वर्षनिहाय आमदार, माजी आमदारांवर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी किती खर्च आलेला आहे याची देखील माहिती घ्यावी. त्यातून आपल्याला एकूण किती निधी लागतो हे कळून येईल. त्यानंतर मग विमा योजना लागू करता येईल किंवा कसे हे आपण तपासून पहावे.

श्री.यादवराव देवगडे : माजी आमदारांना दिल्ली येथे राहण्याकरिता आरक्षण मिळण्यास विलंब लागतो. तेव्हा माजी आमदारांना दिल्ली येथे सवलतीच्या दराने आरक्षण उपलब्ध करून देण्यात यावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : आपण येण्याआधी आमची चर्चा झाली होती. नवी दिल्ली येथील जुने महाराष्ट्र सदनचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. त्यात आपल्याला प्रायॉरिटी द्यायची असा विचारविनिमय झाला. विधान सभेचे 288 अधिक विधान परिषदेचे 78 असे 366 आमदार तसेच लोकसभा व राज्यसभेचे खासदार यांना आरक्षण देण्यात येते. त्यामुळे माजी आमदारांना जुने महाराष्ट्र सदन उपलब्ध करून देण्याचा विचार आहे.

श्री.सुधाकर गणगणे : चालेल. मात्र तेथे आम्हाला सवलतीच्या दराने आरक्षण द्यावे. माजी आमदारांना एक हजार रुपये दर देणे परवडणारे नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार : विद्यमान आमदारांना जो दर असेल तोच दर माजी आमदारांना लागू करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : जुने महाराष्ट्र सदन येथील दर 100 रुपये आहे.

श्री.यादवराव देवगडे : माजी आमदारांना मुंबई येथील विस्तारित आमदार निवास येथे राहण्याची सोय नाही. सध्या आम्हाला विस्तारित आमदार निवासामध्ये रूम मिळत नाही. येथील रूम ह्या बाहेरच्या लोकांकरिता आहेत. या रूम्स बाहेरील राज्यांच्या कमिटींकरिता आहेत. मग माजी आमदारांनी कुठे जायचे ? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर गणगणे : विस्तारित आमदार निवास हे माजी आमदारांना देण्यासाठी तयार करण्यात आले होते. त्यासाठी आम्ही आग्रह धरला होता म्हणून ॲलोकेशन आम्हाला मिळाले होते. त्यानंतर मग विद्यमान आमदारांनी आम्हाला आरक्षण द्यावे अशी मागणी केली. आता येथे इतर राज्यातून येणाऱ्या कमिट्यांसाठी आरक्षण देण्यात येते. बाहेरून येणाऱ्या राज्यांसाठी आपल्याकडे मोठ्या सोयी आहेत. एअर पोर्ट आणि वरळी येथे आपले फार मोठे गेस्ट हाऊस आहे. वांद्रे येथे 30 ते 35 रूमचे गेस्ट हाऊस आहे. वरळीला देखील शासनाचे गेस्ट हाऊस आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : आता ही सोय अस्तित्त्वात आहेच. फक्त आमदार निवासाचे कक्ष आपणास उपलब्ध होत नाहीत. माजी आमदारांना आमदार निवासामध्ये रूम दिली पाहिजे असा जी.आर.आहे. तो अद्यापि लागू देखील आहे. माननीय अध्यक्ष आणि माननीय सभापती यांनी नवीन आमदार निवाससंबंधी उद्या सायंकाळी 4.00 वाजता एक बैठक बोलाविली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .....

सभापती महोदय, मी त्या आदेशाची प्रत आपल्याकडे पाठवतो. आपल्याला कायद्याची सर्व माहिती आहे. एसआरएने दि.9.3.2015 रोजी नियोजित श्री साईबाबा नगर, एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेची सूचना दिली आहे. हायकोर्टाने यासंदर्भात सांगितले आहे की, आपण त्यासंदर्भात सूचना काढावी. या सूचनेमध्ये म्हटले आहे की, सभेची विषय सूची, योजनेचा विकासक मेसर्स ओंकार रिॲलीटीला सहमती आहे किंवा नाही याबाबत आहे. त्यामुळे डायरेक्ट विषय ओंकार रिॲलीटीच्या संदर्भात आला. त्यामुळे हा ओंकार आला कोठून ? मी अतिशय जबाबदारी पूर्वक सांगत आहे की, याबाबतीमध्ये मुख्य प्रवर्तक नेमलेलाच नाही. समितीची बैठक, विकासकाची निवड ही अवैधरित्या कशी झाली यासंदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी जी माहिती दिली त्यासंदर्भातील व्हिडिओ सीडी मी आपल्या माध्यमातून सरकारला देतो. ही बाब अतिशय गंभीर आहे. या ठिकाणचा फार मोठा भूखंड विकासकाला जाणीवपूर्वक दिला जातो आहे. यामध्ये कोर्टाचासुध्दा अवमान केला जातो आहे. सर्वसाधारण सभेची बेकायदेशीर रित्या अधिसूचना काढण्यात आली असून या सभेची किती जणांना नोटीस पाठवली गेली याचे उत्तर मंत्री महोदयांकडून आलेले नाही, किती लाभार्थी पात्र आहेत याचे उत्तर मिळाले नाही. सन 2000 च्या अगोदरची अर्हता मान्य झाली तर त्यानंतर किती लाभार्थी वाढतात यासंदर्भातीलही उत्तर मंत्री महोदयांकडून मिळाले नाही. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, या बाबतची आतापर्यंत जी काही कार्यवाही झाली आहे ती स्थगित करुन त्यासंदर्भात चौकशी करावी आणि हायकोर्टाच्या निर्णयाचे पालन करुन यासंदर्भात नव्याने अधिसूचना काढणे आवश्यक आहे. यामध्ये जे विकासक येतील त्यांना येऊ द्या. तुम्ही बायोमॅट्रीकच्या पालनाचा उल्लेख करता ते पालन त्यावेळेस होऊ द्या. नव्याने सर्वसाधारण सभा बोलावून त्याची व्हिडिओ शुटींग करुन त्यासंदर्भातील निर्णय होणे आवश्यक आहे. हा फार गंभीर प्रकार आहे. सभापती महोदय, आपल्यासाठी या विषयाची सीडी तसेच कोर्टाचा निकालही मी आपल्याला सादर करतो.

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, ओंकार या ठिकाणी आला कसा ? ओकांरवाल्याचा रितसरचा प्रस्ताव श्री साईबाबा झोपडपट्टी संस्थेच्या वतीने आला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेल्या काही बाबीच्या संदर्भात

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

निश्चितपणे चौकशी केली जाईल. या ठिकाणी सभेची कॅसेट दिली आहे. अशाच पध्दतीने लोखंडवाल्यांची पात्रता सिध्द करण्यासंबंधी त्याच्याकडे 70 टक्के लोक आहेत हे दाखवण्यासाठी अशाच प्रकारे सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती. परंतु त्या बैठकीमध्ये लोखंडवाल्यांकडे 55 टक्के लोक असल्याचे दिसून आले. त्यावेळेस सुध्दा अशाच पध्दतीने विचारण्यात आले होते की, तुमचा विकासक हा लोखंडवाला असून तो तुम्हाला पाहिजे की, नको ? लोखंडवाल्याकडे 70 टक्के लोक आले नसल्यामुळे ती बाब नाकारली गेल्यामुळे नवीन विकासक त्या ठिकाणी आला व त्याच्यासंबंधी सुध्दा तेच धोरण अवलंबविण्यात आले की, तुम्ही आता जो नवीन विकासक प्रपोज केला आहे तो तुम्हाला पाहिजे आहे किंवा नाही ? या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कोर्टाच्या प्रश्नाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. परिशिष्ट 2 मध्ये 1116 पात्र झोपडीधारक होते व त्यासंदर्भात मी ठाम आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार लोखंडवाला विकासकाची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा लोखंडवाला हा विषयच नाही. नवीन विकासकावरच विरोधी पक्ष नेत्यांचा आक्षेप आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या लक्षात हा विषय आला आहे की, लोखंडवाला विकासकाला आपण काढले, त्याला 70 टक्के पाठिंबा मिळाला नाही, यासंदर्भात हायकोर्टाने निर्णय दिला. विषय एवढाच राहतो की, विरोधी पक्ष नेत्यांनी सीडी दिली असून त्यांनी कोर्टाचा निर्णयही वाचून दाखवलेला आहे. या ठिकाणी नवीन विकासक आला आहे त्यासंदर्भात प्रोसिजर प्रमाणे काय दिले आहे ? त्यांची मागणी स्पष्ट आहे की, यासंदर्भातील सर्व चौकशी करुन, तोपर्यंत या कार्यवाहीला आपण स्थगिती देणार आहात काय ? एवढाच खरा हा प्रश्न आहे. यासंदर्भात एवढेच उत्तर आहे की, आपण सर्वार्थाने विचार करावा, कोणी कन्टेम्प्ट करीत असेल तर ते करावे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला म्हणजे शासनाला उच्च न्यायालयाने रिटपिटीशन क्रमांक 1026/2015 अन्वये आव्हान दिले गेले.या न्ययालयीन प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 26 एप्रिल, 2015 रोजी उच्च स्तरिय समितीला शक्यतो 4 आठवडयात निर्णय

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता......

घेण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उच्च स्तरिय समितीकडे अपिल अर्ज 22/2015 व 25/2015 असा दोन्ही बाजूने दाखल करण्यात आलेला आहे. यासंदर्भात एकंदर तीन सुनावणी झाली असून चौथी सुनावणी 1 तारखेला आहे. त्यामुळे या अगोदर ज्युरिडिक्शल पॉवर असलेली कमिटी हायकोर्टाने नेमलेली असून हायकोर्टानेच या कमिटीकडे हा विषय पाठवलेला आहे. 1 तारखेची सुनावणी पूर्ण होईपर्यंत, मला असे वाटते की, यासभागृहात या विषयाला स्टे देणार की, नाही या विषयाबाबत मी बोलू शकेन की, नाही याबद्दल माझ्या मनात शंका आहे. परंतु विषयाचे गांभीर्य बघून माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो विषय मांडला आहे तो संपूर्ण विषय सत्य आहे असे गृहीत धरुन व्यक्तिगत रुपाने मी, विरोधी पक्ष नेते आणि अन्य सदस्य तसेच सर्व अधिकाऱ्यांबरोबर सर्व कागदपत्राच्या पुराव्यानिशी एका बैठकीचे आयोजन केले जाईल.

**सभापती :** सदर बैठक माझ्या दालनात घेण्यात यावी.

श्री. प्रकाश महेता : ठीक आहे. सभापती महोदय, आपल्या दालनात या विषयाच्या संदर्भातील बैठक घेण्यात येईल व या बैठकीमध्ये कायदेशीर बाबी काय आहेत, शासनाचे निर्देश काय आहेत व त्यामध्ये चुका असेल तर निश्चितपणे चौकशी करु व चौकशीमध्ये जो कोणी दोषी आढळून येईल त्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**सभापती :** सदर बैठकीत स्टे देता येतो की नाही, कोर्टाचा अवमान होतो आहे की, नाही हे पाहिले जाईल. या विषयाची बैठक 1 तारखेच्या नंतर घेण्यात येईल. आपल्या मताप्रमाणे ज्युडिशिअल कमिटी नेमली गेली आहे त्याची सुनावणी पूर्ण होऊ द्या. पुढील आठवडयात या विषयच्या संदर्भातील बैठक माझ्या दालनात घेतली जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न एका प्रकल्पाचा नाही. परंतु या लक्षवेधीचा संबंध एका प्रकल्पाशी असल्यामुळे मी त्या चर्चेच्या बाहेर जाणार नाही. मुंबईत धारावी नंतरची सगळयात मोठी झोपडपट्टी ही आहे. धारावीची झोपडपट्टी सायन येथे आहे. परंतु ही झोपडपट्टी मुंबई शहराच्या हार्ट ऑफ सिटीमध्ये आहे. या ठिकाणच्या जागेसाठी अनेक लोक आपल्या पध्दतीने काम करीत आहेत. विशेषत: अधिकारी यामध्ये जबाबदार आहेतच. फुकट जागा मिळत असतांना मुंबईमध्ये झोपडपट्टीचा पुनर्विकास का होऊ शकला नाही, ही योजना का फेल्यूअर झाली ?

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप....

याचा आपण कधी तरी विचार करणार आहोत की, नाही ? झोपडपट्टी पुनर्विकासामध्ये अधिकारी उघडपणे भ्रष्टाचार करीत आहेत. परिशिष्ट 2 काय आहे ? परिशिष्ट 2 मध्ये काय असावे हे ठरविणारे अधिकारी कोण ? या ठिकाणी 1600-1700 झोपडपट्टीधारक असून यामध्ये अधिकारी 1116 झोपडपट्टधारक पात्र आहेत असे सांगत आहेत. मी जर पात्र असेल तर माझ्या बाजूचा अपात्र कसा ठरु शकतो ?

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी "हे कोण पात्रता ठरविणारे" असा शब्दप्रयोग केला. शासनाने पात्रतेसंबंधी जी काही मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेली आहेत त्याबद्दल आपले काही मत असू शकते आणि ते मांडले पाहिजे. पण शासनाची संपूर्ण यंत्रणा चुकीची आहे असे नाही. एसआरए योजना कुठेच झाली नाही, असे नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी अधिकाऱ्यांची मोडस ऑपरेन्टी सांगत आहे. त्यांना ती सिरीयसली घ्यायची नसेल तर तो त्यांचा प्रश्न आहे. आपण तो विषय सिरिअसरली घ्याल. त्याचे कारण असे की, घाटकोपरमध्ये 60-65 टक्के झोपडपट्टी होती त्याचा किती विकास झाला याच्या मुळाशी गेलो तर आपल्या लक्षात येईल की, फक्त एखाद दुसऱ्या झोपडपट्टीचा विकास झालेला आहे. बाकी झोपडपट्टयांचा विकास झालेला नाही.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, घाटकोपरमध्ये जेवढे झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प झाले तेवढे प्रकल्प मुंबई शहरामध्ये झालेले नाहीत. हे माझे चॅलेन्ज आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण चॅलेन्ज करा. माननीय मंत्री घाटकोपरमध्ये जास्त पुनर्विकास झाला असे ते म्हणत असतील तर घाटकोपरमध्ये रमाबाई झोपडपट्टी ही तिसऱ्या क्रमाकांची मोठी झोपडपट्टी आहे, त्या रमाबाई झोपडपट्टीचा विकास अजून झालेला नाही. त्या ठिकाणी आज काय स्थिती आहे, तो आपला विषय नाही. त्या विषयावर नंतर चर्चा करू. झोपु योजनेतील अधिकारी इतके बेरड आहेत की, ते बेमालूमपणे बदल करतात. 1678 झोपडपट्टीधारकांपैकी 1116 झोपडपट्टीधारक पात्र झाले असे ते सांगत आहेत. माझा आक्षेप असा आहे की, मुंबईतील झोपडपट्टयांना 50-60 वर्षे झालेली आहेत. एकाच झोपडपट्टीमध्ये राहणारे आणि शेजारी शेजारी असलेले झोपडपट्टीधारकांपैकी एक पात्र असतो तर त्याच्या बाजूला असणारा अपात्र कसा ठरतो ? मी ही मोडस ऑपरेन्टी सांगत आहे. आपण 1600 ते 1700 झोपडपट्टीधारक तुम्ही रेकॉर्डवर आणले. अपात्र झोपडपट्टया करायच्या त्यांच्याकडून भरमसाठ पैसे घ्यायचे आणि नंतर त्यांना पात्र करायचे अशी एक मोडस ऑपरेन्टी आहे, त्याचा मी उल्लेख केला. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, त्या ठिकाणी 631 सदस्य उपस्थित होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे 1116 झोपडपट्टीधारक पात्र आहेत. माझा प्रश्न आहे की, जे बैठकीला हजर होते त्याच्या 70 टक्के उपस्थिती मोजण्यात आली काय ? त्या बैठकीची सी.डी.आहे. त्यामध्ये हे सर्व रेकॉर्ड झाले

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

असेल. तेथील रहिवाशांच्या तक्रारी आहेत. 70 टक्के पात्र झोपडपट्टीधारकांची संमती असावी असा नियम आहे. त्या नियमाप्रमाणे 1116 च्या 70 टक्के उपस्थिती असली पाहिजे हा साधा नियम आहे. जे झोपडपट्टीधारक अपात्र ठरत नाहीत तोपर्यंत आपण 70 टक्के उपस्थितीचा क्रायटेरिया कसा लावू शकता, त्या आधारावर जागा कशी देऊ शकता ? लोकांनी कोणता विकासक ठरवावा याच्याशी आमचे काही देणेघेणे नाही. आम्हाला त्यांच्या नावाशी काही देणेघेणे नाही. लोकांनी विकासक ठरविला असला तरी शासनाच्या प्रचलित कायद्यानुसार पात्र झोपडपट्टीधारकांच्या 70 टक्के उपस्थिती असली पाहिजे. मंत्री महोदयांनी उल्लेख केला की, घाटकोपरमध्ये असे अपात्र भरपूर होते. आपणच त्यांना योग्य रितीने अनेकदा पात्र करुन घेतलेले आहे. तुम्ही करुन घेतले नसाल तर तुम्ही लोकप्रतिनिधी कसे हा देखील प्रश्न निर्माण होईल. आम्ही देखील पात्रतेसाठी भांडतो. कारण त्यांची काही डॉक्युमेन्टस वेळेवर न मिळाल्यामुळे ते अपात्र होतात आणि कालांतराने ते पात्र होतात. अशी शंभर उदाहरणे आहेत. या प्रकरणी हाय कोर्टाची हाय पॉवर कमिटी आहे असे त्यांनी सांगितले. उच्च न्यायालयाने सांगितले की, या प्रकरणी चार आठवड्यामध्ये निर्णय घ्यावा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला नाही. तो साबूत ठेवला आहे. तेव्हा उच्च न्यायालयाची भीती बाळगण्याचे काही कारण नाही. उच्च न्यायालयाने समिति नियुक्ती केली नसेल तर शासनाला पूर्ण अधिकार आहे...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना माननीय न्यायालयाने हाय पॉवर कमिटी नेमलेली आहे असे सांगितले. आपण ते वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे...

**सभापती** : मी ते तपासून घेतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण ते वाक्य तपासून रेकॉर्डवरुन काढून टाकावे. कारण शासनाने हाय पॉवर कमिटी नेमलेली आहे. न्यायालयाचा याच्याशी काहीही संबंध नाही. मी हे जबाबदारीने सांगत आहे. मंत्री महोदयांनी येथे 1116 झोपडपट्टीधारकांचा विषय मांडला तो सन 1995 च्या अगोदरच्या झोपडपट्टीचा आहे, परिशिष्ट-2 प्रमाणे पात्र असलेल्या झोपडपट्टीधारकांचा आहे. त्यानंतर शासनाने निर्णय बदलून सन 2000 च्या अगोदरच्या सर्व झोपडपट्टयांना संरक्षण दिलेले आहे. नेमकी येथेच अडचण आहे. या ठिकाणी सर्वसाधारण सभेला

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

लाभार्थी बोलाविले गेले त्याची संख्या 1100 सांगण्यात आली. निवेदनामध्ये सांगितले की, सभेला 70 ऐवजी 71 टक्के उपस्थिती होती. एकूण 631 जण उपस्थित होते. सन 2000 पूर्वीच्या झोपड्यांना संरक्षण दिल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या वाढते. असे असताना ती संख्या ग्राह्य कशी धरायची ? मी आपणास त्या सभेची व्हिडिओ रेकॉडींग दिलेली आहे. त्या ठिकाणी किती अनियमितता झालेली आहे, किती लोक उपस्थित होते ते दिसून येईल. माननीय मंत्र्यांनी यामध्ये पारदर्शकता दाखवावी. मी आपणाकडे कोर्टाचा निर्णय देखील दिलेला आहे. पुन्हा नव्याने बैठक बोलाविण्यात यावी असा कोर्टाने निर्णय दिलेला आहे. तेथील झोपडपट्टीधारकांचे म्हणणे आहे की, आताची कार्यवाही स्थगित करुन नव्याने बैठक बोलवावी. जर ओमकार बिल्डरला बोलाविले असेल आणि तेथील लाभार्थ्यांचे म्हणणे आहे, आताची कार्यवाही स्थगित करुन ती नव्याने बोलवावी. परिशिष्ट-2 मध्ये सन 2000 पर्यंतचे लाभार्थी आहेत त्यांना देखील त्या बैठकीची नोटीस पाठवावी. त्यानंतर त्यांना जो विकासक ठरवावयाचा असेल तो ठरवू द्यावा. पण तोपर्यंत ही कार्यवाही थांबवावी आणि त्यास स्थगिती द्यावी. ज्यांनी कोणी हे काम केले आहे त्याची चौकशी झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, मुंबईतील अगदी मोक्याच्या ठिकाणी असलेला हा भूखंड आहे. तेव्हा माझी आपणास नम्र विनंती आहे की, आपण या प्रकरणी लक्ष घालावे. माननीय मंत्रीमहोदयांनी या प्रकरणाची चौकशी लावावी.

**सभापती** : आता या विषयावर जास्त चर्चा नको. आपण या संदर्भात दिनांक 2 किंवा 3 तारखेला निर्णय घेऊ. स्टे द्यायचा किंवा नाही यास चार दिवसांनी काही फरक पडणार नाही. आपण ॲडव्होकेट जनरलपासून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलावावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, एसआरएचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. झोपडपट्टीवासीयांना घरे मिळवून देणे हे एसआरएचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही योजना जेव्हा पासून राबविण्यात आली तेव्हापासून मुंबई शहर आणि उपनगरामध्ये मोक्याचे प्लॉटस घ्यायचे आणि जे झोपडपट्टीधारक आहेत त्यांना ते अपात्र आहेत म्हणून तेथून हुसकावून लावायचे असे प्रकार सुरु आहेत. अशा झोपडपट्टीमध्ये जे सेक्रेटरी आणि चेअरमन नियुक्त केले जातात ते विकासकच ठरवितो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

पावसाळ्यामध्ये जशा कावळ्याच्या छत्र्या उगवतात तशाच प्रकारे मुंबईत जेथे झोपडपट्टया आहेत त्या ठिकाणी विकासक येतात. तसेच दुसरी बाब अशी की, अधिकारी खूप बदमाश आहेत. मग ते एसआरएतील असोत, महापालिकेतील असोत किंवा म्हाडाचे असोत. हे अधिकारी एकत्र येऊन संगनमत करतात आणि नंतर लोकांना मजबूर करतात. न्याय मिळत नाही म्हणून त्यांना न्यायालयात जाण्यास सांगितले जाते. परंतु ज्यावेळी ते न्यायालयात जातात त्यावेळी सर्व दरवाजे बंद होतात. परिणामी, या योजनेचा झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याचा उद्देश साध्य होत नाही. आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांनी भ्रष्टाचाराच्या संदर्भातील प्रश्नाला उत्तर दिले. मी तर म्हणेन की, एसआरए ही योजना भ्रष्टाचाराचे मोठे कुरण आहे. गरीब लोकांना या योजनेतून घरे मिळत नाहीत. रियल इस्टेट एजंट यांनी तर दुकाने उघडली असून, ते या योजनेतील घरे विकतात. हे मी बघितलेले आहे. मी अनेक वर्षे झोपडपट्टी भागात काम करीत आहे. ज्या उद्देशाने ही योजना सुरु केली त्यानुसार या योजनेचे उद्दिष्ट साध्य होत नाही. एसआरए योजना अधिकाऱ्यांसाठी भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे. गरीब लोकांना घर न देता त्यांना नाडले जात आहे. त्यांना न्यायालयात जाण्यास सांगितले जाते. न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर विकासकांना नामवंत वकील देणे शक्य होते, परंतु गरिबाला वकील देणे सुध्दा शक्य होत नाही. तद्‌नंतर कोर्टामध्ये त्यांना तुम्ही अपात्र आहात, तुम्ही काही बोलू नका असे सांगितले जाते. नियमानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरे प्रथम बांधावयास पाहिजेत. परंतु तसे न करता सेलचे मोठेमोठे टॉवर उभे राहतात आणि गरीब व पात्र लोकांना घरे मिळत नाहीत. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, या संपूर्ण योजनेतील भ्रष्टाचार पूर्णपणे दूर करण्यासाठी काही अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी व्यथा मांडली आहे. संपूर्ण मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात गेल्या 10-20-25 वर्षांपासून डेव्हलपमेंटमध्ये गुंतागुंत वाढल चालली आहे. त्यामुळे या योजनेतील कार्यपध्दतीला सरळ करुन, झोपडीधारकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ही पध्दती अधिक सुलभ करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. महोदय, झोपडपट्टीवासीयांच्या संदर्भात एखादी चर्चा घेतली तर मला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता....

मुंबईतील जनरल प्रश्नांचे सविस्तर उत्तर देणे शक्य होईल. त्या माध्यमातून मला झोपडपट्टीवासीय आणि लोकप्रतिनिधींसमोर जाता येईल. महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की,....

**सभापती** : मला वाटते माननीय मंत्री महोदय आपण उत्तर वाढवू नका. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेवटचा प्रश्न विचारावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, यातील वस्तुस्थिती अशी आहे की, माहितीच्या अधिकारात मिळालेली सविस्तर माहिती माझ्याकडे आहे. मी सभागृहात जबाबदारीने बोलत आहे. या झोपडपट्टीतील 800 लाभधारकांना लाभ मिळावयास पाहिजे, परंतु ते लाभापासून वंचित राहतात म्हणून मी तळमळीने हा विषय मांडत आहे. श्री साईबाबा सहकारी गृहनिर्माण संस्थेची कागदपत्रे बघितली तर त्या संस्थेचे मुख्य प्रवर्तक आणि समिती अद्यापपर्यंत गठीत करण्यात आलेली नाही. माझी विनंती आहे की, या 800 लाभार्थ्यांना सरकारच्या 2000 सालातील नियमानुसार परिशिष्ट-2 मध्ये समाविष्ट करुन हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे आणि सध्याच्या प्रक्रियेला स्थगिती दिली पाहिजे. या संदर्भातील कार्यवाही चार आठवड्यात करावी की एक आठवड्यात करावी, हा प्रश्न नाही. मला वाटते सरकारने या प्रकरणी 1 तारखेची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. यामध्ये कोठेही न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन होत नाही. माझी विनंती आहे की, आपण अगोदर स्थगिती देऊन व चौकशी करुन या विषयी नव्याने प्रक्रिया सुरु करावी. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, या विषयी उचित निर्णय घेऊन माननीय मंत्री या लक्षवेधी सूचनेला आणि झोपडपट्टीवासीयांना न्याय देतील काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सदरहू पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या मुद्यांची काटेकोरपणे तपासणी करुन अहवाल तयार करण्यात येईल. यामध्ये जर काही चूक आढळून आली तर प्रस्ताव परत मागविण्यात येईल. या योजनेमध्ये एकूण 1600 लोक आहेत. त्यापैकी 1116 पात्र आहेत. याचा अर्थ उर्वरित लोक अपात्र आहेत असे नाही. त्यामुळे ही बाब तपासून घेण्यात येईल. झोपडीधारकांचे जितके परिशिष्ट असते त्यातील 70 टक्क्याच्या धर्तीवर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एसआरए योजनेला मान्यता दिली जाते. मी स्वतः हे तपासून घेतले आहे आणि त्या जागेवर जाऊन सुध्दा आलो आहे.

..3..



श्री.प्रकाश महेता....

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या निदर्शनास आणून देतो की, न्यायालयाच्या निर्णयानुसारच एचपीसी गठीत झालेली आहे आणि त्या समितीला ज्युरिस्डिक्शन पॉवर्स दिलेल्या आहेत. त्यामुळे 1 तारखेला न्यायालयात काय होते ते बघू या. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या विषयी शासन गंभीर असल्यामुळे, त्याला ग्राह्य धरुन या संदर्भात पूर्ण चौकशी करण्यात येईल. जर आपल्या सर्वांचे पुन्हा प्रस्ताव मागविण्याबाबत मत झाले तर निश्चितपणे परत प्रस्ताव मागविण्यात येईल.

--------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा ठराव करुन सुध्दा त्या दृष्टीने कार्यवाही न होणे

**मु.शी.** : अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा ठराव करुन सुध्दा त्या दृष्टीने कार्यवाही न होणे, या संबंधी श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 10 जून, 2012 मध्ये अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा ठराव करणे, प्राधिकरणाच्या दिनांक 26 फेब्रुवारी, 2013 च्या संचालक मंडळाच्या 127 व्या बैठकीत अकोला शहर पाणीपुरवठा योजना 30 वर्षासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हस्तांतरित करुन घेण्यावर एकमत होणे, आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी पम्पींग मशीनकरिता 4 कोटी व वितरण व्यवस्थेकरिता 6 कोटी असे एकूण 10 कोटी रुपये देण्याचे मान्य करुनही अद्यापी या योजनेबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, उक्त योजनेबाबत शासनाची भूमिका उदासीन असल्यामुळे शहराला अनियमित पाणी पुरवठा होत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अकोला महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबतची आहे. महोदय, या विषयावरील लक्षवेधी सूचना मी गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने मांडत आहे. परंतु प्रत्येक वेळी या लक्षवेधी सूचनेला एकच उत्तर येत असते. महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जबदरस्तीने अकोला महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेली ही योजना आहे. महोदय, अकोला महानगरपालिका क्षेत्रात 15-15 दिवसांच्या आड पाणी मिळत होते. परंतु आता त्या ठिकाणी चांगले नवीन आयुक्त आल्यामुळे त्यांनी 15 दिवसांचा कालावधी 7 दिवसांवर आणलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 127 व्या बैठकीत असे ठरले की, या विषयी विचार करु परंतु लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात "संचालक मंडळाने सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक हिताची नसल्यामुळे देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरित करुन देणे योग्य ठरणार नाही." असे नमूद केले आहे. महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे हेच धोरण आहे काय ? पाणी पुरवठा योजनेतून लोकांना पाणी मिळावयास पाहिजे. एखादी पाणी पुरवठा योजना आर्थिक हिताची आहे की नाही, ही बाब शासन किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित नाही. अकोला महानगरपालिकेची गेल्या 5 वर्षांपासून सदरहू योजना चालविण्याची आर्थिक स्थिती नाही. 15-15 दिवस त्या भागातील लोकांना पाणी मिळत नाही. डॅममध्ये सुध्दा पाणी नाही. अकोल्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा संपूर्ण स्टाफ कार्यान्वित आहे. परंतु तरी सुध्दा ते सदरहू योजना हस्तांतरित करुन घेत नाहीत. शिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कामी अकोला महानगरपालिकेला मदत करीत नाही. महोदय, ही योजना हस्तांतरित करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अकोला महानगरपालिकेकडे 11 कोटी रुपयांची मागणी केली आहे. डीपीसी आणि आयुक्तांनी 11 कोटी रुपये भरण्यास मंजुरी दिली आहे. शिवाय महापालिकेच्या सभागृहाने सुध्दा या संदर्भात मंजुरी दिली आहे. महोदय, या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, अकोला महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास 11 कोटी रुपये देणार असेल तर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही योजना तातडीने हस्तांतरित करुन घेणार काय, जर हे शक्य नसेल तर महाराष्ट्र



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया....

जीवन प्राधिकरणाकडे असलेले एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंता आणि चार शाखा अभियंता, हा संपूर्ण स्टाफ आजच्या आज महानगरपालिकेला उपलब्ध करुन देणार काय ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन 2006 पासून ही पाणीपुरवठा योजना अकोला मनपाच्या वतीने चालविण्यात येते. मनपा ही योजना चालविते. ही गोष्ट खरी आहे की, मनपा चालवित असलेली ही योजना तोट्यात आहे. जीवन प्राधिकरण विभागाची 317 कोटी रूपयांची थकबाकी मनपाकडे आहे. ही थकबाकी न भरल्यामुळे जीवन प्राधिकरण विभागाने ही पाणीपुरवठा योजना सन 2006 ला हस्तांतरित केली आहे. अकोला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी वारंवार ही योजना मनपाने चालविण्याच्या संदर्भात जीवन प्राधिकरण विभागाला विनंती केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे या संदर्भात बैठक झाली आणि बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. ही पाणीपुरवठा योजना मनपाने चालवावी असा माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय झाला. जीवन प्राधिकरण विभागाच्या संचालक मंडळाची बैठक झाली आणि त्याही बैठकीमध्ये निर्णय झाला की, ही योजना मनपाने चालविली पाहिजे. योजना तोट्यात आहे याचे कारण असे आहे की, अकोला मनपाला 34613 नळ कनेक्शन्स आहेत. पाण्याचे मीटर बसविलेली नाहीत. अतिशय कमी नळ कनेक्शन्स आहेत, याची संख्या दुप्पट होऊ शकते. तांत्रिकदृष्ट्या मीटर बसवून, नळ कनेक्शन्स तपासून, चोरी थांबवून नीट योजना चालविली तर ही योजना नफ्यामध्ये येऊ शकते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मनपाकडे तांत्रिक मनुष्यबळ नाही. मी सांगू इच्छितो की, हाच प्रश्न मागच्या वेळीही उपस्थित झाला होता. सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, पांडुरंग फुंडकर यांनी सातत्याने सभागृहात हा विषय चर्चेला आणला आहे. मनपाने मागणी केली आहे. त्यामध्ये कार्यकारी अभियंता, उप अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता आहेत. आजच्या आज आदेश काढण्यात येतील आणि मनपाच्या मागणीप्रमाणे तांत्रिक मनुष्यबळ त्यांना पुरविण्यात येईल.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***सोलापूर जिल्ह्यातील विविध गावांना उजनी धरणातून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्या भागात विविध आजारांचे रुग्ण आढळून येणे.***

**मु.शी.** : ***सोलापूर जिल्ह्यातील विविध गावांना उजनी धरणातून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्या भागात विविध आजारांचे रुग्ण आढळून येणे*** यासंबंधी श्री. दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूरसह जिल्ह्यातील सांगोला, पंढरपूर, बार्शी, माहोळ, माढा, करमाळा शहरासह तालुक्यातील विविध गावांना उजनी धरणातून पाणीपुरवठा होणे, साधारणत: 100 टीडीएस असणारे पाणी पिण्यासाठी वापरता येते, परंतु पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा टीडीएस 300 ते 500 असणे तर काही ठिकाणी 700 ते 900 असणे, हे पाणी शहरांना व तालुक्यात गावांना पुरविले जात असतांना पाणी शुध्दीकरण होणे, परंतु पाण्याच्या शुध्दतेवर त्यांचा परिणाम होत नसणे, त्यामुळे किडनी स्टोन, जुलाब, पोटदुखी, त्वचा विकार, उच्च रक्तदाब असे विविध आजारांचे रुग्ण जिल्ह्यामध्ये आढळून येणे, यामुळे जिल्ह्यातील नागरीकांमध्ये शासन संतापाची भावना निर्माण होणे, या शहरांसह तालुक्यातील विविध गावांना शुध्द पाणी मिळणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव लोणीकर (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यात भीमा नदी आहे, तिचे नाव चंद्रभागा आहे आणि या नदीवर कै. यशवंतरावजी चव्हाण साहेबांनी परंपरेने दुष्काळी असलेल्या सोलापूर जिल्ह्याचा पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून उजनी धरण बांधले. धरण बांधण्यापूर्वी दुष्काळी भागातील जनतेला बैलगाडीने, पखालीने पिण्याचे पाणी पुरवावे लागत होते. उजनी धरण झाल्यावर सोलापूर शहर, बार्शी, कुर्डुवाडी, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, करमाळा, मोहोळ, माढा यांना पाणी मिळू लागले. मागच्या वर्षी उन्हाळ्यामध्ये मराठवाड्यातील उस्मानाबाद शहराला पिण्याच्या पाण्यासाठी झगडावे लागले. उजनीच्या धरणावरून पिण्याच्या पाण्याच्या सर्व सोयी आहेत. साधारणपणे रोज 20-25 लाख लोक उजनी धरणावरून पिण्याच्या पाण्याच्या योजनेतील पाणी पितात आणि अशा या धरणात सातत्याने अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवड, पुणे मनपा आणि कुरकुंभ एमआयडीसी यांचे अतिशय विषारी पाणी, मैला मिश्रीत पाणी मिसळत आहे. माननीय मंत्र्यांना याची कल्पना आहे. मी पार्श्वभूमी सांगत आहे. साधारणपणे पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याचा टीडीएस म्हणजेच क्षाराचे प्रमाण 100 असावे लागते. आमच्या उजनी धरणातील पाण्याच्या टीडीएसचे प्रमाण 700 ते 900 झाले आहे आणि हे पाणी प्यायल्यामुळे आता आमच्या संबंध जिल्ह्यातील लोक किडनी स्टोन, उच्च रक्तदाब, त्वचारोग, जुलाब अशा प्रकारच्या रोगाने हैराण झाले आहेत. रुग्णालयात रुग्णांना जागा मिळत नाही अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. सातत्याने 2-3 वेळा हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. वरचे घाण पाणी, क्षारयुक्त पाणी या धरणात न मिसळण्यासाठी शासन काय योजना करणार आहे ? सोलापूर जिल्हयात या पाण्यामुळे रोगाची सुरुवात झाली आहे. पिंपरी-चिंचवड, पुणे मनपा, कुरकुंभ एमआयडीसी यांचे पाणी धरणामध्ये न मिसळण्यासाठी शासन काय उपायोजना करणार आहे ? उजनी धरणतील सर्व मासे क्षारयुक्त पाण्यामुळे मेले आहेत. आपण हे सर्व थांबविण्यासाठी काही वेगळ्या प्रकारची योजना करणार का ? सोलापूर जिल्ह्यातील लोकांना प्रदूषित पाणी प्याल्यामुळे रोग होऊ लागले आहेत. आपण त्यांना त्यातून मुक्त करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात ?

श्री. बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, उजनी धरणामध्ये दूषित पाणी आहे, धरणामध्ये साखर कारखान्यांची मळी,



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर ....

ड्रेनेजचे पाणी सोडले जाते. तेथील पाणी वेगवेगळ्या माध्यमांतून दूषित झाले आहे. साखर कारखान्यांच्या किंवा इतर माध्यमांतून दूषित पाणी उजनी धरणात येते ही गोष्ट खरी आहे. सोलापूर मनपा, सांगोला, पंढरपूर, बार्शी, करमाळा, माढा या नगरपालिका आणि महापालिका यांच्याकडे दूषित पाणी फिल्टर करून लोकांना स्वच्छ पाणी देण्यासाठी शुध्दीकरण केंद्रे आहेत. शुध्दीकरण करूनच हे पाणी दिले जाते. टीडीएसचे अपेक्षित प्रमाण 500 ते 2000 असले पाहिजे. मात्र आता शुध्दीकरण केलेल्या पाण्यातील टीडीएसचे प्रमाण साधारणपणे 350 ते 920 टीडीएस असे आहे. तपासणी अंती केलेला अहवाल माझ्याकडे आला आहे. हे पाणी पिण्यालायक आहे, शुध्द आहे. पाण्याची तपासणी केल्यानंतरचा अहवाल माझ्याकडे आला आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सोलापूर शहर, सांगोला, पंढरपूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा येथे हा पाणीपुरवठा होतो. निवेदनात मानांकने दिली आहेत, त्यामध्ये व्हेरिएबल फॅक्टर आहे, म्हणजे 2 हजार पीपीएम हे पर्मिसेबल लिमिट एकदम वरच्या टोकाचे आहे आणि 500 पीपीएम हे पर्मिसेबल लिमिट एकदम खालच्या टोकाचे आहे. आपल्याला यामध्ये दिसत आहे की, 350 ते 920 पर्यंत हे प्रमाण आढळून आले आहे. म्हणजेच याचा अर्थ असा आहे की, या ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यांची जलशुध्दीकरण केंद्रे आहेत, त्यांचे काही ठिकाणी व्यवस्थित काम होत असेल तर काही ठिकाणी व्यवस्थित काम होत नसेल आणि त्याअर्थी तो इतका मोठा जातो. पाण्याच्या तपासणीच्या नंतरचा अहवाल आपल्याकडे आहे असे आपण म्हणता. आपल्याला पाण्यामुळे रोग झाले असल्याचेही आढळून आलेले नाही. आपण या संदर्भातील पाहणी अशा पध्दतीने केली पाहिजे. पंढरपूर शहरात आषाढी एकादशीनिमित्त किंवा इतर माध्यमातून मोठ्या प्रमाणात लोक येत असतात. त्यामुळे त्या काळात तेथील पाणी अशुध्द होण्याचे प्रमाण नक्की वाढते. सोलापूर महापालिकेकडे किंवा नगरपालिकांकडे जी यंत्रणा आहे, त्या यंत्रणांची पात्रता काय आहे, त्यांचा किती काळापासून वापर सुरूआहे, किती काळानंतर त्यांची देखभाल व दुरूस्ती झाली आहे किंवा नाही हेही पाहणे गरजेचे आहे. सर्वसाधारणपणे असे लक्षात येते की, या सर्व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

योजनांसाठी जी मशिनरी आवश्यक आहे ती तेथे असते पण ती बऱ्याच वेळा सुरू नसते. आता त्याची कारणे अनेक आहेत. त्यामुळे ज्यावेळी आपण तपासणी केली असेल त्यावेळी कदाचित हे पाण्याचे निकाल मिळाले असतील.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.......

परंतु अनेक वेळा असे लक्षात येते की, यंत्रणा नादुरूस्त असतात, बंद असतात. त्यामुळे त्या परिसरातील लोकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो. आपल्या तपास यंत्रणेमार्फत, आपल्या खात्यामार्फत तेथे कशा प्रकारे काम केले जात आहे, याची तपासणी केल्यास आणि नियमित टेबल निश्चित करुन ठराविक कालावधीत पाण्याचा गुणवत्ता अहवाल घेतला तर खरी परिस्थिती आपल्यासमोर येण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे नागरिकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी या योजनेत आवश्यक असणारे बदल करण्यासाठी तांत्रिक आणि उच्च अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करणार का ? अशी चौकशी केल्यास आपल्याला या प्रश्नाचे उत्तर मिळेल. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करणार आहात का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी टीडीएस जास्त आहे, अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एक महिन्यापूर्वी मी स्वत: कुरकुम एमआयडीसीला भेट दिली होती. त्यावेळी काही सन्माननीय सदस्यही उपस्थित होते. आमच्या असे लक्षात आले की, अनेक कारखान्यांमधून थेट नदीमध्ये पाणी सोडले जात आहे. सिप्ला सारख्या काही चांगल्या कंपन्याही त्या ठिकाणी आहेत. काही कंपन्यांकडून असे सांगण्यात आले की, त्यांच्याकडे अशुध्द पाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रसामुग्री आहे. प्रत्यक्षात त्या कंपन्यांकडून मैदानात पाणी सोडले जात होते आणि ते पाणी आसपासच्या परिसरात मुरत होते.

सभापती महोदय, महानगरपालिका किंवा नगरपालिकांना पाणी शुध्द करण्याबाबत सांगण्यात आल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु, जे उद्योग अशा प्रकारे प्रक्रिया न केलेले अशुध्द पाणी बिनदिक्कतपणे सोडतात त्यांच्याविरुध्द जोपर्यंत पाणी पुरवठा विभाग आणि पर्यावरण विभाग एकत्रितपणे एखादी कार्यप्रणाली निश्चित करीत नाही किंवा ताबडतोब कृती करीत नाही तोपर्यंत यामध्ये काहीही सुधारणा होणार नाही. कारण, वर्षानुवर्षे हा प्रश्न तसाच पडून आहे. यापूर्वीही सरकारने असे सांगितले होते की, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या महापालिका वेळ पडल्यास आम्ही रद्द करु. पुणे महानगरपालिकेने स्वत:ची यंत्रणा बसविलेली आहे. परंतु अनेक

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गो-हे........

ग्राम पंचायती ग्रामीण भागात आहेत. त्यांना या संदर्भात अनुदान दिले जात नाही, त्यांच्याकडे कोणतीही व्यवस्था नाही. त्या कशा प्रकारे पाणी शुध्द करणार आहेत ? त्यामुळे केवळ नगरपालिका आणि महानगरपालिकांचा विचार करुन चालणार नाही. हे सर्व प्रदूषण रोखण्यासाठी दोन्ही विभाग एकत्रितपणे पावले उचणार आहेत का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, पर्यावरण मंत्री आणि मी एकत्रितपणे या संदर्भात बैठक घेऊ. दूषित पाणी सोडणाऱ्या कंपन्यांची माहिती घेऊन, चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यातील हा प्रश्न आहे. प्रत्यक्ष परिस्थिती बघितली तर त्या ठिकाणी पुणे महानगरपालिकेचे आणि कुरकुम एमआयडीसीचे पाणी सोडले जाते. मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात तथ्य नाही. कारण, अनेक ठिकाणी जलशुध्दीकरण यंत्रणा कार्यान्वित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी सांगितले ते 99 टक्के खरे आहे. तेथील लोकांना अनेक आजार जडले आहेत. देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी गंगा नदी शुध्दीकरण प्रकल्प सुरु केला आहे. त्याच धर्तीवर या परिसरातील प्रश्न सोडविण्यासाठी भीमा नदी शुध्दीकरण प्रकल्पासाठी केंद्र शासन काही निधी देणार आहे का ? पुणे महानगरपालिका आणि कुरकुम येथील केमिकल इंडस्ट्रियल झोनमधील दूषित पाणी या नदीत सोडले जात आहे. मी परवा भिगवण येथे गेलो होतो. तेथे मेलेल्या माशांचा सड पडल्याचे मी पाहिले आहे. मंत्री महोदय येथे सरकारी उत्तर देत आहेत. तथापि, ते याबाबतचीही चौकशी करतील का ? गंगा नदीप्रमाणे भीमा नदी शुध्दीकरणासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळाल्यास 30 लाख लोकांच्या जीविताचा प्रश्न सुटणार आहे. असा प्रयत्न शासन करणार आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. चर्चा करुन प्रश्न सोडविण्यात येईल.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. प्रदूषित पाण्यामुळे होणारी रोगराई या संबंधीचा हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सोलापूर शहर, सोलापूर जिल्हा, सांगोला, पंढरपूर, मोहोळ, माढा, करमाळा येथील औद्योगिक सांडपाणी धरणामध्ये किंवा नदीमध्ये सोडले जाते व त्यामुळे पाणी प्रदूषित होते. दूषित पाणी पिण्यासाठी पुरविले जाते व त्यामुळे किडनी स्टोन, जुलाब, त्वचा विकार, हाय ब्लड प्रेशर यासारख्या रोगांना सर्वसामान्य लोकांना सामोरे जावे लागत आहे.

सभापती महोदय, जलशुध्दीकरण केंद्र स्थापन करण्यात आल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. नगरपालिकांमध्ये अशा प्रकारची केंद्रे आहेत किंवा नाहीत, याची मला कल्पना नाही. परंतु, महानगरपालिकांमध्ये ती असतात. मी उल्लेख केलेल्या शहरांमध्ये अशा प्रकारची जलशुध्दीकरण केंद्रे आहेत का ?

सभापती महोदय, पाण्याचे नमुने घेऊन त्याची तपासणी करण्यात येत असल्याचेही मंत्री महोदयांनी सांगितले आहे. नागपूर येथे राष्ट्रीय स्तरावरील नीरी ही संस्था आहे. या संस्थेकडून पाण्याची तपासणी शासन करुन घेणार आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, होय.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन आणि मंत्री महोदयांनी दिलेली तोंडी उत्तरे गोलमाल स्वरुपाची आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वस्तुस्थिती कथन केली आहे. मंत्री महोदयांनी साखर कारखान्यांचा उल्लेख केला आहे. परंतु, या साखर कारखान्यांचे पाणी नदीत सोडले जात नाही.

श्री.बबनराव लोणीकर : मी माझ्या उत्तरात दुरुस्ती केली आहे.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, कुरकुम एमआयडीसीतील औद्योगिक कारखान्यांमधील पाणी थेट नदीमध्ये जाते. या दूषित आणि विषारी पाण्यामुळे उजनी धरणातील मासे मृत पावली आहेत, हे खरे आहे का ?

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे....

सभापती महोदय, केवळ नगरपालिकांच्याच नाही तर गावोगावी नदीच्या काठांवर पाणी पुरवठा योजना आहेत. त्या गावांमधील परिस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणी वॉटर प्युरिफायर कंपन्यांनी नवीन धंदा सुरु केला आहे. तेथील पाणी घ्यायचे, ते पाणी किती घाण आहे, हे दाखवायचे आणि आपले वॉटर प्युरिफायर खपवायचे. दूषित पाणी पिऊन रोगाला आमंत्रण देण्यापेक्षा प्युरिफायरवर खर्च केलेला परवडेल, या भावनेने लोकही प्युरिफायर खरेदी करीत आहेत. ही वस्तुस्थिती खरी आहे का ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, पर्यावरण विभाग आणि पाणी पुरवठा विभाग येत्या 15 दिवसात सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे आणि त्या जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधींबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयात एकत्रितपणे बैठक घेईल आणि या संदर्भात चर्चा करण्यात येईल.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, ही बैठक पुणे विभागीय कार्यालयात आयोजित करावी, अशी विनंती आहे.

------------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी टोकरे कोळी समाजातील व्यक्तींना नंदूरबार जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र देण्यात होत असलेली टाळाटाळ

**मु.शी.** : जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी टोकरे कोळी समाजातील व्यक्तींना नंदूरबार जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र देण्यात होत असलेली टाळाटाळ यासंबंधी श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जातीच्या नागरिकांना शिक्षण, नोकरी तसेच शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीच्या दाखल्याची असलेली आवश्यकता, मात्र सदर जातीचे दाखले देण्यासाठी संबंधित विभागाकडून होत असलेली चालढकल, यासंदर्भात मार्च, 2015 मध्ये लक्षवेधी सूचनेवर चर्चेच्यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्री महोदयांनी सदर माहिती खरी असल्यामुळे निलंबित करतो असे आदेश दिले असतांनाही अद्यापी सदर आदेशाची पूर्तता झालेली नसणे, तसेच जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी टोकरे कोळी हा समाज मोठ्या प्रमाणात असून ही जात शासनाच्या अनुसूचित जमाती या प्रवर्गामध्ये समाविष्ट असतांना या जमातीच्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्यास नंदूरबार जात पडताळणी समितीने गेल्या काही वर्षापासून केलेली टाळाटाळ, परिणामी या जमातीमधील विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना शैक्षणिक व इतर सवलती व सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, जात पडताळणी प्रमाणपत्राविषयी सभागृहात चर्चा होऊन अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश होऊनही अद्यापी जैसे थे परिस्थिती असणे, शासन अधिकाऱ्यांना देत असलेला पाठिंबा, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन पूर्वीप्रमाणेच जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ : सभापती महोदय, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जातीच्या नागरिकांना शिक्षण, नोकरी तसेच शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीच्या दाखल्यांची आवश्यकता असते. परंतु, संबंधित विभागांकडून टाळाटाळ केली जाते.

सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात ठाकुर समाज आहे. एका पालकाकडे स्वतःचा जातीचा दाखला असताना मुलाच्या प्रवेशासाठी त्यांना मागील वर्षी प्रांताधिकाऱ्याने दाखला दिला होता. पण या वर्षी मुलीचा प्रवेश घेताना जातीचा दाखला दिला नाही. 70 वर्षापूर्वी आपण भुसावळ तालुक्यात रहात होता, त्या ठिकाणाहून दाखला आणावा, असे त्यांना सांगितले गेले. पहिल्या मुलाला जातीचा दाखला अमळनेरमधून दिला जातो, दुसऱ्या मुलासाठी मात्र भुसावळहून दाखला आणावा, असे सांगितले जाते. नियम सर्वांनाच सारखे असले पाहिजेत. हा विभाग अशा प्रकारे टाळाटाळ करीत आहे, हे योग्य नाही. याबाबत शासन कार्यवाही करणार आहे का ?

सभापती महोदय, जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यात आदिवासी टोकरे कोळी समाजाची संख्या मोठी आहे. हे लोक अनुसूचित जाती प्रवर्गात मोडतात. या जमातीच्या लोकांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यास नंदूरबार विभाग टाळाटाळ करीत आहे.

यानंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे )**

श्रीमती स्मिता वाघ.........

तेथे श्री.भालेराव नावाचे अधिकारी कार्यरत आहेत. त्यांची वागणूक बरोबर नाही, ते शिवीगाळ केल्याशिवाय बोलत नाहीत, ते लोकांना सहकार्य करीत नाहीत. मागील अधिवेशनात विधानसभेत या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. तेथे श्री.डी.पी.साळुंखे नावाचे एसपी आहेत. ते कोळी समाजाचे आहेत. त्यांनी मुलाच्या जातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी तीन-चार महिन्यांपूर्वी अर्ज केला होता. परंतु, त्यांच्या मुलाला देखील जात प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यांच्याकडे स्वतःच्या जातीचा दाखला होता. परंतु, त्यांच्या मुलाला जातीचा दाखला देण्यात आला नाही. शेवटी, त्यांनी कोर्टात जाऊन जातीचे प्रमाणपत्र मिळविले आणि मुलाची ॲडमिशन करुन घेतली. मंत्री महोदयांनी विधानसभेत सांगितले होते की, या अधिकाऱ्याच्या निलंबनाचे आदेश त्वरित जारी करण्यात येतील. परंतु, अद्याप त्या अधिकाऱ्याचे निलंबन झालेले नाही आणि आता त्या अधिकाऱ्याकडे नाशिक विभागाचा देखील चार्ज देण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशासनुसार जस्टिस गाणो समिती घटित करण्यात आली आणि श्री.भालेराव यांची त्या समितीचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तो अधिकारी लोकांना त्रास देतो, त्यांची वागणूक बरोबर नाही. मंत्री महोदयांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिलेले आहेत. मग अद्याप त्या अधिकाऱ्याला निलंबित का करण्यात आले नाही ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, उप विभागीय अधिकारी यांच्यामार्फत जातीचे दाखले दिले जातात. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित ज्या विभागीय समित्या आहेत त्या समित्यांकडून दिलेल्या दाखल्यांची सत्यता पडताळून पाहण्याचे काम केले जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी सांगितल्याप्रमाणे श्री.भालेराव नावाच्या अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात येईल असे विधानसभेत सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. त्यांच्या निलंबनाच्या मान्यतेची फाईल मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. त्या अधिकाऱ्याला तातडीने निलंबित करण्यात येईल.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, खरे म्हणजे जात प्रमाणपत्र पडताळणी समिती लोकांच्या सोयीसाठी आहे, का लोकांना त्रास देण्यासाठी आहे, हा देखील संशोधनाचा भाग आहे. मध्यंतरी त्यांनी असा जावई शोध लावला होता की, हिंदू भिल्ल लिहिलेले असेल तर त्यांना देखील ते दाखला देत नव्हते. शेवटी, भिल्ल समाजाचे लोक एकत्र आले आणि ते त्यांच्याकडे गेले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, आम्ही दाखले देतो. कारण, पूर्वी हिंदू भिल्ल असे लिहिले जात होते. हिंदू भिल्लमध्ये असंख्य जाती, पोट जाती आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी सांगितल्याप्रमाणे खान्देशात कोळी, ठाकूर समाज आहे. जे बोगस असतील त्यांना दाखले देऊ नका. जे बोगस आहेत त्यांना दाखले द्यावेत, असे आम्ही कधीही म्हणत नाही. परंतु, आपण त्यांना कोठे तरी बाईंडिंग केले पाहिजे. कारण, ते वडिलांना दाखला देतात, भावाला दाखला देतात. परंतु, दुसऱ्या भावाला दाखला देत नाहीत. आता असेच सुरु आहे. मग यांनी दाखले द्यावेत किंवा देऊ नयेत, याबाबत निर्णय घेतला पाहिजे. कारण, संबंधित माणूस हायकोर्टात जाऊ शकत नाही. ते अनेक प्रकरणे प्रलंबित ठेवतात. अमूक एवढ्या दिवसात त्यावर निर्णय व्हावयास पाहिजे, असा आपण निर्णय केलेला आहे. जातीचे दाखले 30 दिवसाच्या आत दिलेच पाहिजेत, Yes किंवा No जे काही असेल त्याबाबत शासन त्यांना सक्त आदेश देणार आहे काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, जातीच्या दाखल्याच्या संदर्भातील विषय संवेदनशील आहे. जे एससी आहेत, जे खरे आदिवासी आहेत, त्यांना दाखले मिळण्यास अडचणी येत नाहीत. परंतु, आडनावात साम्य असेल तर त्याचा आधार घेऊन मध्यंतरीच्या काळात काही बोगस दाखले किंवा व्हॅलिडिटी दिल्याचे समोर आल्यामुळे किंवा कोर्टात विशेषतः माधुरी पाटील या खटल्यात कोर्टाने सांगितले की, यामध्ये उच्च स्तरीय अधिकारीच असले पाहिजेत, तीन सदस्यांची समिती असली पाहिजे आणि जरी दाखला मिळाला असला तरी त्याची व्हॅलिडिटी करुन घेतली पाहिजे. म्हणून शासनाची अशी धारणा आहे की, जे खरे आदिवासी आहेत किंवा अनुसूचित जातीचे लोक आहेत त्यांना न्याय मिळाला पाहिजे. जे बोगस असतील त्यांनी यामध्ये अतिक्रमण करु नये. म्हणूनच व्हॅलिडिटी समित्या आहेत. परंतु, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला मुद्दा देखील महत्वाचा आहे की, जे आदिवासी आहेत, त्यांना दाखला मिळाला पाहिजे आणि वेळेत व्हॅलिडिटी करुन घेण्याच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे.........

संदर्भात देखील काही तरी नियम केला पाहिजे. मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना एवढेच सांगू इच्छितो की, समितीकडे प्रकरण दाखल झाल्यानंतर किमान महिन्याभराच्या आत जो काही निर्णय असेल तो संबंधितांना देण्यात येईल.

-------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झाले आहे. आम्ही सकाळ पासून सभागृहात उपस्थित आहोत. आता मध्यंतरासाठी सभागृह स्थगित करावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी 2.45 ते 3.15 वाजेपर्यंत मध्यंतर )

--------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलतात)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 3.15 ते 3.25 पर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी माननीय सदस्यांनी चर्चेच्या माध्यमातून या सभागृहात केली होती. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आजच सभागृहामध्ये महिला व बालविकास मंत्री यांच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना मांडली आहे. आज सदनामध्ये विरोधी पक्षाच्या वतीने याच विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्यात आली होती.

अशा परिस्थितीत सभागृहाचे उर्वरित कामकाज घेतल्यास नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेला महत्व राहणार नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव विरोधी पक्षाकडून देण्यात आला आहे, त्या प्रस्तावावर प्रथम चर्चा घेण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभापती** : प्रथम नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा घेता येणार नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. शासकीय विधेयके मंजूर करावयाची आहेत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक गुरुवार, दिनांक 30 जुलै, 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 27 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 30 जुलै, 2015 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION